# श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०९/२००५.** **दिनांक ०९.०७.२००५**

**स्थळ - शिर्डी कार्यालय.** **वेळ दुपारी-२.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शिर्डी येथे शनिवार दिनांक ०९ जुलै, २००५ रोजी आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील एसएसएस -वशी-०४-६९२०-२००५ ,दिनांक १ जुलै,२००५ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविणेत आले होते. त्यानुसार सदरहू सभा शनिवार दिनांक ०९ जुलै, २००५ रोजी दुपारी २.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात मा. अध्यक्ष श्री. जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | मा. श्री. जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष | ०२. | मा. श्री शंकरराव गेणूजी कोल्हे,उपाध्यक्ष |
| ०३. | मा. श्री. राधाकृष्ण एकनाथ विखे पाटील | ०४. | मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग |
| ०५. | मा. श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे | ०६. | मा. श्रीमती उर्मिला प्रदीप जाधव |
| ०७. | मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे | ०८. | मा. डॉ. एकनाथ भागचंद गोंदकर |
| ०९ | मा. कॅप्टन सुरेश वासुदेवा | १०. | मा. श्री. अशोक भिमाशंकर खांबेकर |
| ११. | मा. श्री. कृष्णचन्द्र श्यामसुन्दर पाण्डेय | १२. | मा. डॉ. पी. एल. तिवारी |
| १३. | मा.श्री.कैलास गोविंदराव कोते | | |

मा. श्री. भाऊसाहेब रा. वाकचौरे
कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा. अध्यक्ष श्री. जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबतच्या मा.श्री.प्रकाश रामदास काळे, मा.श्रीमती रिम्पल लोहिया, मा.श्री. रमाकांत गणेश कर्णिक यांचे दूरध्वनी निरोपाची तसेच मा.श्री.समि खतिब यांचे पत्राची नोंद घेण्यात आली व समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१.** **व्यवस्थापन समितीचे दि.०३.०५.२००५ व दि.०८.०५.२००५ रोजी अनुक्रमे मुंबई व शिर्डी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.२४५.** व्यवस्थापन समितीचे दि.०३.०५.२००५ व दि.०८.०५.२००५ रोजी अनुक्रमे मुंबई व शिर्डी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, ते वाचून कायम करतांना खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

**०१.** व्यवस्थापन मंडळाची सभा प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शनिवारी आयोजित करण्यात यावी. या सभेचा अजेंडा मा.कार्यकारी अधिकारी यांनी मा.अध्यक्षांचे मान्यतेने सर्व मा.सदस्यांना सभेपूर्वी किमान ७ दिवस अगोदर पाठवावा.

(कार्यवाही-अधिक्षक-सभा कामकाज विभाग)

**०२** संस्थानला आवश्यक असणारे कुशल-अकुशल व सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पद्धतीने ठेकेदारांमार्फत पुरविण्यात येतात. या कर्मचाऱ्यांना किमान वेतन दराप्रमाणे वेतन दिले जाते. तसेच त्यांचा प्रा.फंड ठेकेदारांमार्फत प्रा.फंड कार्यालयाकडे भरणा केला जातो. परंतू काही ठेकेदार कर्मचाऱ्यांच्या प्रा.फंडाची रक्कम वेळेत भरणा करीत नाही. याकरिता ठेकेदाराने कर्मचाऱ्यांचे प्रा.फंडाची रक्कम भरणा केल्याचे चलन मिळाल्यानंतरच कंत्राटदाराचे पेमेंट करण्यात यावे. तसेच ठेकेदाराने प्रा. फंडाची रक्कम प्रा.फंड कार्यालयात भरली आहे किंवा नाही याची खातरजमा करणेकामी संस्थान प्रतिनिधींनी प्रा.फंडाचे नागपूर येथील कार्यालयात समक्ष जाऊन शहानिशा करावी.

(कार्यवाही-कामगार अधिकारी)

यानंतर सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

**विषय नं.०२.** **व्यवस्थापन समितीचे दिनांक १३.०३.२००५ व दिनांक १७.०४.२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या सभेच्या इतिवृत्तावर करण्यात आलेली कार्यवाही.**

**निर्णय क्र. २४६.** व्यवस्थापन समितीचे दिनांक **१३.०३.२००५** व दिनांक **१७.०४.२००५** रोजी शिर्डी येथे झालेल्या सभेच्या इतिवृत्तावर करण्यात आलेल्या व होत असलेल्या कार्यवाहीच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**विषय नं.०३.** **नोंद घेण्याचे विषय.**

**०१. जमाखर्च तक्ता एप्रिल -मे, २००५**

**निर्णय क्र.२४७. (A).** माहे मार्च,२००५ मधील जमा-खर्चाचे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्यांची नोंद घेण्यात आली.

**०२. माहे एप्रिल -मे, २००५ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाबाबत.**

**निर्णय क्र. २४७. (B).** माहे **एप्रिल -मे, २००५** मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाबाबतचा तक्ता, ज्याच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०३. एप्रिल -मे, २००५ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. २४७. (C).** माहे **एप्रिल -मे, २००५** मध्ये संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या कर्मचाऱ्यांच्या /कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारा तक्ता, ज्याच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०४. माहे एप्रिल-मे, २००५ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. २४७. (D).** माहे **एप्रिल -मे, २००५** मध्ये दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीचे तपशीलवार विवरण, ज्याच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०५. गुंतवणूक तक्त्याची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. २४७. (E).** माहे १६ मे, २००५ अखेरीस गुंतवणूकीची परिस्थिती दर्शविणारा तक्ता, ज्याच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०६. बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेणे**

**निर्णय क्र. २४७. (F).** बांधकाम प्रगती अहवाल दर्शविणारा तक्ता, ज्याच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली. तसेच जुना पिंपळवाडी रस्ता काँक्रीटीकरण करणे, नविन पिंपळवाडी रस्ता डांबरीकरण, साईनाथ छाया नविन इमारत बांधणे व शिर्डी नगरपंचायत हद्दीतील आठ रस्ते डांबरीकरण करणे या कामांची अंतिम बीले अदा करणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**०७. पाणी तपासणी अहवाल.**

**निर्णय क्र. २४७. (G).** माहे **एप्रिल -मे, २००५** मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजनेअंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमुने (सॅम्पल्स) मे. एनव्हायरो लॅब, नाशिक व आरोग्यप्रयोगशाळा, अहमदनगर यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात येतात. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्याच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०८. माहे एप्रिल-मे, २००५ मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. २४७. (H).** माहे **एप्रिल -मे, २००५**मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या लिलावाव्दारे होणा-या विक्रीच्या अहवालाची, ज्याच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०९. माहे एप्रिल -मे,२००५ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने रुपये २५,०००/- चे मर्यादेत करण्यात आलेल्या खर्चाच्या तक्त्याची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. २४७. (I).** माहे **एप्रिल -मे, २००५** मध्ये रुपये २५, ०००/- चे मर्यादेत मा. कार्यकारी अधिकारी, यांचे मान्यतेने विविध आवश्यक बाबींवर करण्यात आलेल्या खर्चाची माहिती दर्शविणारा तक्ता, ज्याच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**१०. रुग्णालयातील रुग्णांना माहे एप्रिल-मे, २००५ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. २४७. (J).** माहे **एप्रिल -मे, २००५** मध्ये रुग्णालयातील रुग्णांना वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतींची माहिती दर्शविणारा तक्ता, ज्याच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**विषय नं.०४. गुंतवणूकी विषयी निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र. २४८.अ)** माहे जून,२००५ मध्ये मुदत पूर्ण होणाऱ्या व इतर उपलब्ध गुंतवणूकपात्र रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | बँकेचे नांव | दिनांक | मुदतीअंती उपलब्ध रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | युटीआय बँक, नाशिक | १३ /०६/२००५ | १,३१,५६,६२१.०० |
| ०२. | अहमनगर जिल्हा को.ऑप.बँक, लि.शिर्डी | १९/०६/२००५ | २६,६६,५०४.०० |
| ०३. | माहे जुन,२००५ मध्ये दैनंदिन खर्च वजा जाता गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी रक्कम | | १,००,००,०००.०० |
| | | एकूण | **२,५८,२३,१२५.००** |

**ब)** तसेच माहे जुलै, २००५ मध्ये मुदत पूर्ण होणाऱ्या व इतर उपलब्ध गुंतवणूकपात्र रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | बँकेचे नांव | दिनांक | मुदतीअंती उपलब्ध रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | युनियन बँक ऑफ इंडिया, राहाता | ०१ /०७/२००५ | ७९,१९,३०१.०० |
| ०२. | डेव्हलपमेंट क्रेडीट बँक, मुंबई | ०५/०७/२००५ | २,६३,१३,२४२.०० |
| ०३. | आंध्र बँक, शिर्डी | ११/०७/२००५ | ३५,००,७३६.०० |
| ०४. | एच.डी.एफ.सी.लि., नाशिक | ११/०७/२००५ | ६,४०,४१,२०३.०० |
| ०५. | एच.डी.एफ.सी.लि., नाशिक | ११/०७/२००५ | ६,४०,४१३.०० |
| ०६. | डेव्हलपमेंट क्रेडीट बँक, मुंबई | १३/०७/२००५ | २,६३,१३,२४२.०० |
| ०७. | बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी | १४/०७/२००५ | ७१,५६,१६५.०० |
| ०८. | स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शिर्डी | १५/०७/२००५ | २,५५,५१,९८०.०० |
| ०९. | आंध्र बँक, शिर्डी | १५/०७/२००५ | ८३,०८,०४४.०० |
| १०. | बँक ऑफ महाराष्ट्र, शिर्डी | १७/०७/२००५ | १,८५,२९,३५८.०० |
| ११. | आंध्र बँक, शिर्डी | १८/०७/२००५ | ८०,२७,९५६.०० |
| १२. | आंध्र बँक, शिर्डी | १८/०७/२००५ | १,१५,३२,२८१.०० |
| १३. | आंध्र बँक, शिर्डी | १८/०७/२००५ | ३,१९,८४,९१९.०० |
| १४. | आंध्र बँक, शिर्डी | २५/०७/२००५ | २,११,५१,५६३.०० |
| १५. | अहमदनगर जिल्हा को-ऑप बँक, लि. शिर्डी | २८/०७/२००५ | १६,०७,७८९.०० |
| १६. | एच.डी.एफ.सी.लि., नाशिक | २९/०७/२००५ | १,२८,०८,२४१.०० |
| १७. | एच.डी.एफ.सी.लि., नाशिक | २९/०७/२००५ | १,२८,०८३.०० |
| १८. | बँक खात्यामध्ये शिल्लक असलेली गुंतवणूक योग्य रक्कम | | २,००,००,०००.०० |
| १९. | माहे जून, २००५ अखेर दैनंदिन खर्च वजा जात गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी रक्कम | | १,५०,००,०००.०० |
| | | एकूण | ३१,०५,१४,५१६.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त "अ" व "ब" नुसार उपलब्ध होणारी रक्कम, ५०% मर्यादेपर्यन्त आर.बी.आय.बॉण्डस व उर्वरित रक्कम अधिकाअधिक व्याजदर व संस्थानला सेवा देणाऱ्या स्थानिक बँकांमध्ये गुंतविण्यात यावी. यासाठी मा.अध्यक्ष महोदयांच्या सूचना विचारात घेतल्या जाव्यात असे ठरले.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.०५. संस्थान मालमत्ता विमा पॉलीसी नुतनीकरणाबाबत.**

**निर्णय क्र.२४९.** (अ) दरवर्षी संस्थानच्या इमारती, फर्निचर, इत्यादी (वाहनांशिवाय) चल-अचल मालमत्ता, कॅश इन ट्रॅन्झीट, कॅश इन सेफ इत्यादींचा विमा एकत्रितपणे उतरविण्यात येतो. मागील वर्षी दिनांक २४ जुन, २००४ ते २३ जुन, २००५ या कालावधीसाठी मे. न्यु इंडीया इन्शुरन्स कंपनी, शाखा श्रीरामपूर यांचेकडे स्पर्धात्मक दरानुसार प्रिमियम स्वरुपात रुपये ५,९६,६६१/- इतकी प्रिमियम रक्कम अदा करुन इतर सर्व चल, अचल मालमत्ता व कामगार नुकसान भरपाई कायदा, १९२३ चे कलम ३ नुसार सर्व संस्थान कर्मचा-यांचा समुह विमा उतरविण्यात आलेला आहे. या विम्याची मुदत दिनांक २३ जुन, २००५ रोजी पूर्ण होत आहे. त्यापुढील दिनांक २३ जुन,२००६ अखेरपर्यन्तच्या एका वर्षासाठी पॉलिसीज घेण्यासाठी मा.व्यवस्थापन समिती चे आजचे सभेसमोर प्रस्तावित करण्यात येत आहे.

**(ब)** यासाठी सार्वजनिक व खाजगी, अशा एकुण ०९ सर्वसाधारण विमा कंपन्यांना पॉलीसीजसाठी आवश्यक सर्व माहितीसह पत्र देऊन या कंपन्यांच्या प्रतिनिधींना आजचे सभेसमोर अंतीम दरपत्रके सादर करण्यासाठी उपस्थित राहण्याची विनंती करण्यात आली आहे. या कंपन्या खालील प्रमाणे :

०१. दि न्यू इंडिया एश्योरन्स कंपनी, शाखा श्रीरामपूर (राष्ट्रीयकृत)
०२. युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी, शाखा श्रीरामपूर (राष्ट्रीयकृत)
०३. ओरीएंटल इन्शुरन्स कंपनी, शाखा संगमनेर (राष्ट्रीयकृत)
०४. नॅशनल इंन्शुरन्स कंपनी, शाखा कोपरगांव (राष्ट्रीयकृत)
०५. बजाज अलाइंझ कंपनी, शाखा नाशिक (खाजगी)
०६. आय.सी.आय.सी.आय. लुम्बार्ड, शाखा पुणे (खाजगी)
०७. रिलायन्स जनरल इंन्शुरन्स कंपनी, शाखा पुणे (खाजगी )
०८. चोलामंडलम जनरल इन्शुरन्स कंपनी , शाखा मुंबई (खाजगी)
०९. इफको - टोकीओ जनरल इन्शुरन्स कंपनी , शाखा नाशिक (खाजगी )

उपरोक्त कंपन्यांचे प्रतिनिधींना आजचे सभेपुढे समक्ष चर्चेसाठी बोलाविण्यात आले होते. त्यानुसार खालील कंपन्यांचे प्रतिनिधी समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी उपस्थित होते.

०१. दि न्यू इंडिया एश्योरन्स कंपनी, शाखा श्रीरामपूर
०२. युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी, शाखा श्रीरामपूर
०३. ओरीएंटल इन्शुरन्स कंपनी, शाखा संगमनेर

०४. नॅशनल इंन्शुरन्स कंपनी, शाखा कोपरगांव
०५. बजाज अलाइंन्झ कंपनी, शाखा नाशिक
०६. आय.सी.आय.सी.आय. लुम्बार्ड, शाखा पुणे
०७. रिलायन्स जनरल इंन्शुरन्स कंपनी, शाखा पुणे
०८. इफको - टोकीओ जनरल इन्शुरन्स कंपनी , शाखा नाशिक

उपरोक्त सर्व प्रतिनिधींना सभेने समक्ष बोलावून बंद पाकिटांत आपले सुधारित दर देणेबाबत सांगणेत आले, त्यांनी देऊ केलेले दर खालीलप्रमाणे-

| अ.नं. | नांव | देऊ केलेला एकत्रित दर (रु.) |
|---|---|---|
| ०१. | दि न्यू इंडिया एश्योरन्स कंपनी, शाखा श्रीरामपूर | ८,०९,२२६/- |
| ०२. | युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी, शाखा श्रीरामपूर | ७,६३,७६९/- |
| ०३. | ओरीएंटल इन्शुरन्स कंपनी, शाखा संगमनेर | ९,००,०७३/- |
| ०४. | नॅशनल इंन्शुरन्स कंपनी, शाखा कोपरगांव | ११,१७,४७१/- |
| ०५. | बजाज अलाइंन्झ कंपनी, शाखा नाशिक | १२,३०,६१३/- |
| ०६. | आय.सी.आय.सी.आय. लुम्बार्ड, शाखा पुणे | ९,८३,७२३/- |
| ०७. | रिलायन्स जनरल इंन्शुरन्स कंपनी, शाखा पुणे | १२,८०,३८०/- |
| ०८. | चोलामंडलम जनरल इन्शुरन्स कंपनी , शाखा मुंबई | अनुपस्थित |
| ०९. | इफको - टोकीओ जनरल इन्शुरन्स कंपनी , शाखा नाशिक | १२,७४,६२७/- |

यावर सविस्तर चर्चा होऊन, युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी, शाखा श्रीरामपूर यांचे निम्नतम दर मान्य करण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असें ठरलें.

(कार्यवाही- मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.०६. ऑन लाईन डोनेशनची सुविधा आंध्र बँकेच्या एटीएम वर उपलब्ध करविणेबाबत.**

**निर्णय क्र.२५०.** संस्थानला दक्षिणा पेटीशिवाय देणगीदार भक्तांकडून देणगी काऊंटरवर रोख स्वरुपात जमा होणाऱ्या, तसेच टपालाद्वारे प्राप्त होणारे चेक्स, डी.डी., मनिऑर्डर्स, पोस्टल ऑर्डर्स आदी माध्यमांद्वारे, देणग्या प्राप्त होत असतात. हे देणगीदार भक्त देशाच्या विविध राज्यातील असून त्याशिवाय परदेशस्थ (विशेषतः अनिवासी भारतीय एनआरआय) भक्तांचाही त्यामध्ये सहभाग आहे. या सर्व माध्यमांद्वारे मिळणाऱ्या देणग्यांमध्ये मोठी वाढ होत असून, विशेषतः परकीय चलनाचे स्वरुपात मिळणाऱ्या देणग्यांमधील वाढ लक्षणीय आहे.

मात्र टपालाद्वारे प्राप्त होणाऱ्या देणग्या जमा करण्याच्या सध्याच्या कार्यपध्दतीअंतर्गत देणगीदाराने देणगी पाठविल्यानंतर ती रक्कम संस्थानखाती जमा होऊन त्याची पावती देणगीदाराला मिळेपर्यंत बराचसा कालावधी लागतो. काही वेळेस, देणगीचा चेक/डी.डी./मनिऑर्डर गहाळ टपालात होणे, विहित मुदतीत संस्थानखाती जमा न होणे, देणगीची पावती गहाळ होणे, भक्तांनी व्यक्त केलेल्या इच्छेशिवाय दुसऱ्याच उद्देशासाठी देणगी जमा होणे आदी त्रुटी उदभवतात. या त्रुटींमुळे देणगीदार भक्ताला नाहक त्रास होतो. या कार्यपध्दतीमुळे बहुतांशी परदेशस्थ व काही उच्चशिक्षित भारतीय साईभक्त देणगीदारांनी वेळोवेळी अशा सूचना केल्या आहेत की, संस्थानने इलेक्ट्रॉनिक फंड ट्रान्सफर पद्धतीने देणगी स्वीकारावी, जेणे करुन वरील बहुतांशी त्रुटी कमी होतील.

माहिती तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे, इंटरनेटच्या माध्यमातून होणाऱ्या आर्थिक व्यवहारांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. यापैकी विशेषतः "ई-बँकींग" या प्रगत तंत्र ज्ञानाचा वापर करुन जगातील कुठल्याही ठिकाणच्या भक्तांकडून देणगी स्वीकारण्याची सुविधा टप्प्याटप्प्याने निर्माण करता येईल. या अनुषंगाने पुर्वीच्या मा. विश्वस्त मंडळाने दिनांक २९ ते ३१ मार्च २००४ रोजीच्या सभेतील निर्णय क्र. १२४ अन्वये निर्देशित केल्याप्रमाणे "ऑन लाईन डोनेशनची" सुविधा संस्थानला उपलब्ध करुन घेण्यासाठी आय.सी.आय.सी.आय. बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया, कॅनरा बँक, आंध्र बँक, सिंडीकेट बँक, एच.डी.एफ.सी. बँक आदि. बँकांकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. यापैकी ऑनलाईन डोनेशन सुविधा उपलब्ध करणेबाबत स्टेट बँक ऑफ इंडिया, आय.सी.आय.सी.आय. बँक व आंध्र बँकेने प्रस्ताव सादर केले आहेत. यापैकी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या एटीएमव्दारे देणगी स्वीकारण्याचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक २७ डिसेंबर, २००४ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्र. १३९ व्दारे स्वीकारण्यात आला आहे.

भक्तांना एटीएमव्दारे ऑन लाईन डोनेशनची सुविधा विस्तृत प्रमाणात मिळणेसाठी आता आंध्र बँकेनेही प्रस्ताव सादर केला आहे. या प्रस्तावातील तरतुदी साधारणतः स्टेट बँक ऑफ इंडिया यांचे प्रस्तावाप्रमाणेच सर्वसाधारणतः पुढीलप्रमाणे आहेत.

(१) आंध्र बँकेच्या देशातील सर्व एटीएमवर संस्थानसाठी देणगी स्वीकारण्याची सुविधां उपलब्ध करण्यात येईल.

(२) एटी एम च्या देशव्यापी जाळ्याद्वारे प्राप्त होणाऱ्या देणग्या आंध्र बँकेच्या शिर्डी शाखेतील संस्थानच्या स्वतंत्र बचत खात्यावर दररोज जमा करण्यात याव्यात.

(३) जमा झालेल्या सर्व देणगी संबंधित देणगीदार भक्ताचे नांव, खाते नंबर, पत्ता व देणगीची रक्कम, आदि तपशील आठवड्यातून एकदा संस्थानला उपलब्ध करुन दिली जाईल.

(४) आयकरामध्ये सूट मिळण्यासाठीचे प्रमाणपत्र संस्थानकडून उदी प्रसादासहीत भक्ताच्या पत्त्यावर पाठविण्यात येईल.

(५) उपरोक्त प्रस्तावासह आंध्र बँकेने एटीएम बसविण्यासाठी मंदीर परिसर अथवा संस्थानच्या साईनाथ छाया इमारतीतील जागा मागीतलेली आहे. उपरोक्त प्रस्तावासह जागा देण्यास विचार होणेबाबत मा. सदस्य डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर यांनी सूचना केली आहे.

सध्या आंध्र बँकेच्या सर्व शाखांमध्ये नित्य प्रसादालय अन्नदान योजनेअंतर्गत भक्तांकडून देणगी स्वीकारली जाते. या जमा झालेल्या देणगीचा हिशोब शिर्डी येथील त्यांच्या शाखेमध्ये नियमितपणे मिळत आहे. या योजनेअंतर्गत अद्यापपर्यंत रुपये १.१५ कोटी मात्र, देणगी स्वरुपात प्राप्त झाले आहेत.

तरी आंध्र बँकेने सादर केलेल्या प्रस्तावानुसार, त्यांचे एटीएम जाळयाव्दारे देणगी स्वीकारण्याच्या प्रस्तावास व संस्थानच्या जागेत त्यांना एटीएम साठी जागा देण्यास, स्टेट बँक ऑफ इंडियास लागू केलेल्या अटी-शर्तीनुसार, मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही -मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.०७. मे.मोहन देशमुख, चार्टर्ड अकौंटंट, पुणे यांची संस्थानचे अंतर्गत लेखापरिक्षक म्हणून कार्यकक्षा व मानधन निश्चित होणेबाबत.**

**निर्णय क्र.२५१. अ)**मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१७ एप्रिल, २००५ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.१४३ अन्वये, संस्थानच्या आर्थिक कार्यपध्दती व लेख्यांचे अंतर्गत लेखापरिक्षण अशा एकूणच कामकाजासाठी प्रशासनाअंतर्गत पुरेशा मनुष्यबळाअभावी सक्षम संस्थेची नियुक्ती होणे आवश्यक असल्याने, मा.सदस्य श्री.राधाकृष्ण विखे पाटील यांचे मार्गदर्शनानुसार अशा सक्षम संस्थेची नेमणूक तातडीने करण्यात यावी, असे ठरले आहे.

त्यास अनुसरुन सदरील कामकाजासाठी मा.सदस्य श्री.विखे पाटील महोदय यांनी, मे.मोहन देशमुख ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौंटंट, पुणे यांच्या नावाची सूचना केलेली आहे. त्या अनुषंगाने श्री देशमुख यांनी आतापर्यंत दोन वेळा शिरडी येथे प्रत्यक्ष भेट देऊन, कामकाजाविषयी माहिती घेतलेली आहे. सदरील भेटीत त्यांचे कार्यकक्षेबाबतही समक्ष चर्चा करण्यात आलेली आहे. सदरील कामकाजासाठी त्यांना अपेक्षित असलेल्या मानधनाबाबत लेखी पत्र देणेबाबत सांगणेत आले होते. त्यास अनुसरुन त्यांनी दि.०२ जून, २००५ रोजी लेखी पत्र दिलेले असून, अपेक्षित मोबदला रु.६०,०००/- मात्र प्रतिमहा, त्याशिवाय त्यांचा होणारा प्रत्यक्ष खर्च व यासर्वावरील टॅक्स संस्थानने आदा करावा असे कळविलेले आहे. सदरील कामकाजाच्या कार्यकक्षेशी अपेक्षित मोबदल्याची तुलना करता, मागणी खूपच अधिक आहे, असे नम्र मत आहे.

**(ब)**सध्या संस्थानअंतर्गत एक स्वतंत्र कार्यगट स्थापन करण्यात आलेला असून, त्याचेमार्फत सादील व चल मालमत्ता पडताळणीचे कामकाज करण्यात येत आहे. परंतु संस्थानचे वैधानिक लेखापरिक्षक मे.नंदू रेडीज ॲण्ड कंपनी, मुंबई यांचेशी गेल्या तीन वर्षात वेळोवेळी झालेल्या चर्चेदरम्यान, त्यांनी सदरील कामकाजाचे महत्त्व पटवून देऊन, या कामकाजासाठी सध्या अंतर्गत लेखापरिक्षण विभागात उपलब्ध असलेले मनुष्यबळ हे खूपच कमी असून, त्याखेरीज संस्थानमध्ये उपलब्ध असलेल्या मनुष्यबळापैकी आणखी काही अनुभवी व तज्ञ मनुष्यबळ उपलब्ध करुन देऊन, सदरील कामकाज होणे गरजेचे आहे, अशा सूचना केलेल्या आहेत. मात्र, त्यासाठी आवश्यक कर्मचा-यांची नियुक्ती होणे वा उपरोक्तप्रमाणे बाहेरील संस्थेकडून काम करवून घेणे असे दोन पर्याय आहेत.

**(क)** उपरोक्त परिच्छेद "अ" मध्ये नमूद केल्याप्रमाणे मे.मोहन देशमुख ॲण्ड कंपनी, पुणे यांचेशी चर्चेव्दारे कार्यकक्षा ठरविण्यात आली आहे. मात्र, त्या कार्यकक्षेअंतर्गत त्यांचे कामाचे स्वरुप- संस्थानचे अंतर्गत लेखापरिक्षण करुन तृटींची पूर्तता करण्यासाठी/निकोप सुरक्षित व कार्यक्षम कार्यपध्दती तयार करणे आणि प्रशासनाच्या व संबंधित विभागाच्या सहकार्याने ती कार्यपध्दती राबविण्यास, तसेच संस्थानच्या विविध वैधानिक पूर्तता (वैधानिक लेखापरिक्षकाच्या पूर्तता अहवालासह) करण्यास सक्रिय सहाय्य करणे अशा स्वरुपाचे असावे, असे नम्र मत आहे.

तरी उपरोक्त परिच्छेद "अ" व "क" नुसार, मे.मोहन देशमुख ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौंटंट, पुणे यांचे नियुक्तीचा कालावधी, मानधन व कार्यकक्षेविषयी निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान अंतर्गत विविध लेखापरिक्षण आर्थिक व नियोजनासंबंधीत कामकाजासाठी मा.सदस्यांनी सनदी लेखापाल संस्थांची नावे सुचवावीत. अशी नावे आलेनंतर मा.व्यवस्थापन समितीसमोर प्रस्तावित करण्यात यावीत, जेणेकरुन अंतर्गत लेखापरिक्षकांचे पॅनेल बनविता येईल, असें ठरले. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.०८. संस्थान मालमत्तेच्या विमा पॉलिसीची मुदत अल्पकालासाठी वाढविलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२५२.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या चल- अचल मालमत्ता, सोने-चांदी व इतर आर्थिक जबाबदा-या तसेच संस्थान कर्मचा-यांसाठी कामगार नुकसान भरपाई कायदा -१९२३ नुसार समूह विमा योजना आदिसाठी दिनांक २४ जुन, २००४ ते २३ जुन, २००५ या कालावधीसाठीचा विमा "न्यु इंडिया एश्योरन्स कंपनी, शाखा श्रीरामपूर ", यांचेकडून उतरविण्यात आला होता. त्याकरीता एकूण रक्कम रुपये ५,९६,६६१/- मात्र, वार्षिक प्रिमीयम म्हणून त्यांना अदा करण्यात आलेली होती. त्यानूसार विमा पॉलिसीजही प्राप्त झालेल्या होत्या.

उपरोक्त विमा पॉलिसींची मुदत दिनांक २३ जुन, २००५ रोजी संपली आहे. दिनांक २४ जुन, २००५ पासुन पुढील कालावधीसाठी संस्थान मालमत्तेच्या विमा पॉलिसीजचे नुतनीकरण करणे आवश्यक असल्याने याबाबत प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवण्यात आला आहे. उचित स्पर्धात्मक दर मिळावेत यादृष्टीने चार राष्ट्रीयकृत व पाच खाजगी कंपन्याची दरपत्रके सभेसमोर मागविण्यात आली आहेत. परंतु मा.व्यवस्थापन समितीची सभा त्यापुर्वी न झाल्याने, वार्षिक नुतनीकरणाविषयी निर्णय होऊन शकला नाही. त्यामुळे मा. अध्यक्ष महोदय यांचे मान्यतेने दिनांक २४ जुन, २००५ ते दिनांक ०८ जुलै, २००५ या अल्पकालासाठी उपरोक्त सर्व विमा पॉलिसींचे , आहे त्या सर्व प्रकारच्या धोकाविषयक गुणांसह (All the risk facter coverages as it is ), आाणि त्यासोबतच संस्थानचे प्रसादालयासाठी लागणा-या एल पी जी गॅसच्या उरण-शिर्डी वाहतूकीसाठी घेण्यात आलेल्या विमा पॉलिसीचेही उपरोक्त कालावधीसाठी नुतनीकरण करण्यात आले आहे.

न्यु इंडिया एश्योरन्स कंपनी लि., शाखा श्रीरामपूर यांना उपरोक्तप्रमाणे दिनांक २४ जुन, २००५ ते दिनांक ०८ जुलै, २००५ या १५ दिवसांकरिता उपरोक्त सर्व पॉलिसीजसाठी रुपये ६२,१९५ /- इतकी प्रिमीयम रक्कम, मा.अध्यक्ष महोदय यांचे पूर्व परवानगीने, जा.नं.एसएसएस/वशी-लेखा/६५६८ / २००५ दिनांक २३ जुन,२००५ अन्वये अदा करण्यात आलेली आहे.

तरी, उपरोक्त वाढीव अल्पकालावधीसाठी न्यु इंडिया एश्योरन्स कपंनी लि., श्रीरामपूर शाखा यांना अदा करण्यात आलेल्या विमा प्रिमीयम रक्कम रुपये ६२,१९५ /- च्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.०९. प्रसादालयाचे नवीन इमारत बांधकामाबाबत.**

**निर्णय क्र.२५३.** शेती महामंडळाकडून ताब्यात घेतलेल्या मौजे निमगांव-को-हाळे येथील जमिनीवर प्रसादालयासाठी सर्व सोयीसुविधायुक्त अशी प्रशस्त नवीन इमारत बांधकामास व्यवस्थापन समितीचे दि. ०३/०५/२००५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१८२ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर प्रकल्पासाठी आर्किटेक्ट शक्ती परमार, मुंबई व किचनसाठी संजीव देशमुख, मुंबई यांची कन्सल्टंट म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.

प्रसादालयाचे प्रकल्पासाठी आर्किटेक्ट शक्ती परमार यांचेमार्फत नवीन आराखडा तयार करण्यात येत आहे. सदर प्रकल्पासाठी अंदाजे रु.१८ कोटी रकमेचे ढोबळ एस्टिमेट सादर केलेले आहे. व्यवस्थापन समिती सदस्या मा.श्रीमती उर्मिला जाधव व मा.श्रीमती रिम्पल लोहिया यांची आर्किटेक्ट श्री.शक्ती परमार यांचे समवेत दि.२५/०४/२००५ रोजी चर्चा झाली. त्यावेळेस सदर प्रकल्प लवकर पूर्ण करण्याचे दृष्टीने साधारणपणे खालील कार्यवाही करण्याचे चर्चेत ठरले आहे.

१. आर्किटेक्ट यांनी प्लॅन व एस्टिमेट सादर करणे

२. संस्थानने ठेकेदार निवडीसाठी वर्तमानपत्रात निविदा सूचना प्रसिध्द करणे.

३. संस्थानकडून प्लॅनचा अभ्यास करुन आर्किटेक्ट यांना प्लॅनचे सूचनेसह सहमती देणे.

४. आर्किटेक्ट यांनी अंतिम प्लॅन सादर करणे.

५. आर्किटेक्ट यांनी डिटेल्ड टेंडर डॉक्यूमेंट तयार करणे.

६. सिलबंद निविदा मागविणे.

७. निविदा स्विकारणे.

तरी वरील प्रमाणे पुढील कार्यवाही करणेसाठी प्रथम ठेकेदारांचे पुर्वपात्रतेसाठी जाहिरातीव्दारे अर्ज मागविता येतील व त्यानंतर केवळ पूर्वपात्र ठरलेल्या ठेकेदारांकडून निविदा मागविता येतील.

**किंवा**

वर्तमानपत्रात निविदा सूचना प्रसिध्द करुन किमान पात्रतेच्या अटी नमूद करुन दोन लिफाफा पध्दतीने निविदा मागविता येतील.

आर्किटेक्ट श्री.शक्ती परमार यांनी सदर प्रकल्पासाठी २% फी मिळणेस विनंती केली आहे. तसेच या प्रकल्पासाठी प्रोजेक्ट मॅनेजमेंट सर्व्हीस वेगळी नेमण्यात यावी व त्यांची फी वेगळी ठरविण्यात यावी, असे त्यांनी दि.२५/०४/२००५ चे चर्चेत सांगितले आहे.

सदर प्रकल्पाचे किचन कन्सल्टंट श्री.संजीव देशमुख, मुंबई यांनी दि.१९/०५/२००५ चे पत्राव्दारे किचन डिझाईनचे कामासाठी एकूण रु. ७,३०,०००/- मात्र अधिक सर्व्हीस टॅक्स १०.२% इतक्या फीची मागणी केलेली आहे. सदर फी पैकी रु. २,००,०००/- मात्र अधिक १०.२% सर्व्हीस टॅक्स इतकी फी नेमणूक पत्रासोबत, रु.३,००,०००/- मात्र अधिक १०.२% सर्व्हीस टॅक्स इतकी फी ड्रॉईंग दिल्यानंतर व उर्वरीत रु.२,३०,०००/- मात्र अधिक १०.२% सर्व्हीस टॅक्स इतकी फी प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर अदा करण्यात यावी, असे त्यांनी वरील पत्रात नमूद केलेले आहे.

तरी निविदा मागविणेबाबत व आर्किटेक्ट तसेच किचन कन्सल्टंट यांची फी निश्चित करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

आजचे सभेत आर्किटेक्ट श्री.शक्ती परमार व किचन कन्सल्टंट श्री.संजीव देशमुख, मुंबई हे उपस्थित होते. सभेने त्यांचेशी चर्चा केली.

यावर चर्चा होऊन असें ठरले की, आर्किटेक्ट श्री.शक्ती परमार यांनी सादर केलेल्या रु.१८.० कोटी मात्र खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच त्यांनी सादर केलेल्या आराखड्यानुसार डिटेल एस्टिमेट तयार करुन वर्तमानपत्रात निविदा सूचना प्रसिद्ध करुन किमान पात्रतेच्या अटी नमूद करुन दोन लिफाफा पद्धतीने निविदा मागविण्यात याव्यात.

आर्किटेक्ट शक्ती परमार यांचेशी झालेल्या चर्चेप्रमाणे त्यांना सदरहू प्रकल्पासाठी २% फी व खर्चाची प्रतिपुर्ती देण्यात यावी. वेगळी प्रोजेक्ट मॅनेजमेंट सेवा नेमण्याची आवश्यकता नाही. ठेकेदार, आर्किटेक्ट यांचेमध्ये समन्वय ठेवण्याचे काम संस्थान वरिष्ठ मुख्य अभियंता यांनी करावे. बांधकाम विभागाकडे मनुष्यबळ (अभियंता) संख्या कमी आहे. करिता सदर प्रकल्पासाठी तीन अभियंत्यांची कंत्राटी पद्धतीने मासिक वेतनावर नेमणूक करावी. तसेच किचन कन्सल्टंट श्री.संजीव देशमुख यांना सध्या पुरविण्यात येणाऱ्या सोयी-सुविधांचा अभ्यास व त्यानुसार नविन प्रस्ताव तयार करणे, किचन इक्विपमेंटस, मशिनरी प्रस्तावित करणे, त्यांचे ले-आऊट तयार करणे, किचन ले-आऊटस, प्रसादभोजन बैठक व्यवस्था, कर्मचारी ट्रेनिंग, किचन इक्विपमेंटस् व मशिनरी खरेदीसाठी स्पेशीफिकेशनसह कोटेशन फॉर्म्स तयार करणे, आलेल्या कोटेशन्सचे तक्ते तयार करणे, योग्य पुरवठाधारक नेमणेसाठी शिफारस करणे, खरेदी करण्यात येणारी मशिनरी, इक्विपमेंटस् योग्य असल्याबाबत अभिप्राय देणे इत्यादी कामांसाठी त्यांना एकत्रित रुपये ५,००,०००/- (अक्षरी रुपये पांच लक्ष) फी देण्यात यावी, असें ठरलें.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१०. किरकोळ कामे करणेसाठी स्थानिक आर्किटेक्ट यांचा पॅनल तयार करणेबाबत.**

**निर्णय क्र.२५४.** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०५/२००५ रोजीचे बैठकीत झालेल्या चर्चेनुसार संस्थानचे नियोजीत लहान स्वरुपातील कामांसाठी आर्किटेक्ट पॅनल तयार करणेकामी स्थानिक वृत्तपत्रात दि.१४/०५/२००५ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. अर्ज करण्याची शेवटची मुदत दि.२३.०५.२००५ होती. त्यानुसार खालील आर्किटेक्ट यांनी मुदतीत अर्ज सादर केलेले आहेत.

| अ.नं. | नांव |
|---|---|
| ०१. | आर्किटेक्ट काबरे चौधरी, नाशिक |
| ०२. | आर्किटेक्ट येवले विजयसिन्हा बाळासाहेब, राहुरी (लॅण्ड मार्क कन्सल्टंट) |
| ०३. | आर्किटेक्ट अरविंद वैद्य, संगमनेर |
| ०४. | आर्किटेक्ट शितल पी. जोशी, श्रीरामपूर |
| ०५. | आर्किटेक्ट निकम पा.असो., श्रीरामपूर |
| ०६. | आर्किटेक्ट काबरे कन्सल्टंट, नाशिक |
| ०७. | आर्किटेक्ट भूतडा असोसिएटस, श्रीरामपूर |

संस्थानचे नियोजीत लहान स्वरुपातील कामांसाठी उपरोक्त आर्किटेक्ट पॅनल तयार करण्यात यावा. या आर्किटेक्टना कामाच्या रकमेवर २% इतकी आर्किटेक्ट फी देण्यात यावी. तसेच वरील आर्किटेक्ट यादीमध्ये अ.नं.०१ व अ.नं.०६ सलग्न फर्म असल्याने अ.नं.०६ वगळता उर्वरित सहा अर्किटेक्टची पॅनलवर नेमणूक करण्यास मान्यता देण्यात आली.

| अ.नं. | नांव |
|---|---|
| ०१. | आर्किटेक्ट काबरे चौधरी, नाशिक |
| ०२. | आर्किटेक्ट येवले विजयसिन्हा बाळासाहेब, राहुरी (लॅण्ड मार्क कन्सल्टंट) |
| ०३. | आर्किटेक्ट अरविंद वैद्य, संगमनेर |
| ०४. | आर्किटेक्ट शितल पी. जोशी, श्रीरामपूर |
| ०५. | आर्किटेक्ट निकम पा.असो., श्रीरामपूर |
| ०६. | आर्किटेक्ट भूतडा असोसिएटस, श्रीरामपूर |

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.११. विविध कामांसाठी नेमण्यात आलेल्या आर्किटेक्टसची फी ठरविणेबाबत.**

**निर्णय क्र.२५५.** सध्या चालू असलेल्या संस्थानचे काही बांधकामांसाठी नव्याने आर्किटेक्टस्‌ची नेमणूक करण्यात आलेली आहे. तथापि, सदर आर्किटेक्टस्‌ची फी ठरविण्यात आलेली नाही. याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

**अ)** व्यवस्थापन समिती निर्णय क्र. १०६ दिनांक १३/०३/२००५ अन्वये नगर- मनमाड रस्त्याचे आर्किटेक्ट लाटकर यांचेकडून घेण्यात येणारी व्यावसायिक सेवा बंद करण्यात यावी व उर्वरित कामाचे पर्यवेक्षण व मुल्यांकन मे. निकम पाटील असोसिएटस्, श्रीरामपूर यांचेमार्फत करुन घेण्यात यावे असे ठरले. तसेच रथ पालखी रस्त्यासाठी व जुना पिंपळवाडी रस्त्याचे उर्वरित कामासाठी आर्किटेक्ट निकम पाटील असोसिएटस्, श्रीरामपूर यांची नेमणूक करण्यात यावी असेही ठरले. त्यानुसार आर्किटेक्ट लाटकर यांचेकडून सेवा घेणे बंद करण्यात आले व आर्किटेक्ट निकम पाटील असो. यांना खालील कामांसाठी जा.नं. ३४२५ दि. ०२/०३/२००५ अन्वये सल्लागार म्हणून नेमणूकपत्र देणेत आले.

०१.नगर- मनमाड रस्ता रुंदीकरण व डांबरीकरण करणे.

०२.जुना पिंपळवाडी रस्ता रुंदीकरण व कॉंक्रीटीकरण करणे.

०३.रथ- पालखी रस्ता कॉंक्रीटीकरण करणे.

निकम पा. असो. यांनी दि. १८/०६/२००५ चे पत्राव्दारे उपरोक्त कामांसाठी त्यांना कामाचे किंमतीचे १% इतकी फी मिळावी अशी विनंती केली आहे. निकम पा.असो. हे पूर्वीपासून तसेच सध्या चालू असलेल्या इतर बांधकाम प्रकल्पांसाठी १% इतक्या फी मध्ये सेवा देत आहेत. परंतू उपरोक्त कामांसाठी यापुर्वी आर्किटेक्ट लाटकर यांची २% इतक्या फी वर नेमणूक करण्यात आलेली होती.

**ब)** तसेच शिर्डी सर्व्हे क्र. ०६ (आरक्षण क्र. ८ ) मधील जागेत जि.प. शाळा इमारतीचे बांधकामासाठी व्यवस्थापन समिती निर्णय क्र. ४० दिनांक २१/१०/२००४ अन्वये नेमणूक करणेत यावी असे ठरले आहे. त्यानुसार आर्किटेक्ट चंद्रकांत कदम यांना जा.नं. १२३७८ दि. ०७/१२/२००४ अन्वये सदर कामासाठी नेमणूक पत्र देण्यात आले आहे. तथापि, सदर कामासाठी त्यांना अदा करावयाची फी ठरविण्यात आलेली नाही.

आर्किटेक्ट चंद्रकांत कदम यांनी दि. १६/१२/२००४ चे पत्रान्वये सदर कामासाठी ३.५०% इतकी फी मिळावी अशी विनंती केली आहे. यापुर्वी निरनिराळ्या बांधकाम प्रकल्पांसाठी निकम पा. असो. यांची १% इतक्या फीवर नेमणूक करण्यात आली आहे. तसेच रुग्णालय व प्रसादालय क्र. २ नूतनीकरण कामांसाठी काबरे चौधरी आर्किटेक्ट, नाशिक यांची २% इतक्या फीवर नेमणूक करण्यात आलेली आहे.

तरी उपरोक्त बांधकामासाठी आर्किटेक्ट मे.निकम पाटील असोसिएटस्,श्रीरामपूर व श्री.चंद्रकांत कदम, नाशिक यांचे फी ची रक्कम ठरविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकरी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.निकम पाटील असोसिएटस्, श्रीरामपूर यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांना बांधकाम प्रकल्पाचे ०१ % व श्री.चंद्रकांत कदम, नाशिक यांना २ % आर्किटेक्ट फी म्हणून देण्यात यावी, असें ठरलें.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१२. संस्थानचे चालू असलेल्या विविध इमारतींचे रंगकामाबाबत.**

**निर्णय क्र.२५६.** संस्थानचे विविध इमारतींना रंगकाम करण्याचे काम ठेकेदार मे. के.बी. पाथरीकर औरंगाबाद यांना जा.नं. एसएसएस/वशी-बांध/ ७६९९/२००३ दि. १३/०९/२००३ चे कार्यादेशान्वये निविदा दरापेक्षा २७.८८ टक्के कमी दराने रु. ३१,९८,१७२.०० मात्र रकमेचे कंत्राट देण्यात आलेले आहे. निविदा शर्ती नुसार काम पूर्ण करण्याची मूदत सहा महिने (दि. ०९-०४-२००४ अखेर) होती. ठेकेदार यांना प्रथम तिन महिने मुदतवाढ दि. ०९/०७/२००४ पर्यंत देण्यात आली होती. त्यानंतर पुन्हा जानेवारी २००५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. रंगकाम वेळेवर पूर्ण करणेचे दृष्टीने ठेकेदार यांना सूचना देउनही त्यांनी पेंटरची संख्या वाढविलेली नाही. दि.१५/०१/२००५ पासून ठेकेदार यांनी कसलीही पूर्व सूचना न देता रंगकाम बंद ठेवले आहे.

ठेकेदार यांनी आज अखेर खालीलप्रमाणे इमारतींचे रु.१६,८१,३३२/- मात्र रकमेचे काम पूर्ण केले. आहे.

| **अ.नं.** | **इमारतीचे नांव** | **पूर्ण करण्यात आलेले रंगकाम खोल्या** |
|---|---|---|
| ०१ | भक्तनिवास | १८ व्ही.आय.पी.खोल्या व्यतिरिक्त सर्व खोल्यांचे रंगकाम पूर्ण |
| ०२ | साईप्रसाद नं. १ | रंगकाम पूर्ण |
| ०३ | साईनाथ माध्यमिक विद्यालय | आतील रंगकाम पूर्ण |
| ०४ | मंदिर परिसर | ६०% रंगकाम पूर्ण |

ठेकेदार यांचे आजअखेर खालीलप्रमाणे रंगकाम करणे बाकी आहे.

| अ.नं. | इमारतीचे नांव | अपूर्ण रंगकाम खोल्या |
|---|---|---|
| ०१ | भक्तनिवास | १८व्ही.आय.पी.खोल्या<br>०८ स्टोअर<br>०९ जिना हेड रुम व ४ जिना लांबी<br>१९ दुकान गाळे<br>०१ भक्तनिवास ऑफीस व कॅन्टीन |
| ०२ | मंदिर परिसर | ०१ शांतीनिवास व भक्तनिवास कार्यालय इमारत<br>०२ समाधी मंदीर |
| ०३ | स्टाफ क्वार्टर्स | जुनी ए टाईप क्वार्टर्स<br>जुनी बी टाईप क्वार्टर्स<br>वर्ग-१ अधिकारी निवासस्थाने (५०० रुम जवळील) |
| ०४ | कनकुरी तळे येथील इमारत | |
| ०५ | साईनाथ हायस्कूल | इमारत बाहेरील रंगकाम |

उर्वरीत काम पूर्ण करण्यासाठी दंड आकारणी आकारल्यास त्यांचे फार मोठे आर्थिक नुकसान होउ शकते तरी अपूर्ण असलेले रंगकाम लवकर पूर्ण करणेचे दृष्टीने ठेकेदार यांनी ३० मे २००५ पर्यंत तिस-यांदा मुदतवाढ मागितली होती. ठेकेदार यांना खालीलप्रमाणे जा.नं. एसएसएसटी/वशी-बांध/४०५३/२००५ दि.२२/०४/२००५ अन्वये कळविण्यात आले होते.

"अपूर्ण असलेले रंगकाम लवकरात लवकर पूर्ण करावे तसेच दंड आकारणीबाबत आपणास कळविण्यात येवूनही आपण रंगकामाची गती वाढविली नाही. उलट आपण दि.१५/०१/२००५ पासून कोणतीही पूर्व सूचना न देता रंगकाम बंद ठेवले आहे. तरी आपणास कळविण्यात येते की निविदेतील शर्तीनुसार व करारानुसार वाढीव मुदतीत म्हणजे जानेवारी २००५ अखेर रंगकाम पूर्ण न झाल्यामुळे प्रती दिवस रु.५००/- प्रमाणे दंड आकारणी करण्यात येत आहे. वाढीव मुदत देवूनही आपण रंगकाम पूर्ण करु शकला नाही. तसेच अद्यापही रंगकामाची गती वाढविलेली नाही. रंगकाम वेळेवर करण्याचे गांभीर्याने घेतलेले दिसून येत नाही. रंगकाम करण्याची आपली इच्छा दिसून येत नाही. त्यामुळे आपणास निविदाशर्तीनुसार दंड आकारणी करुन डिपॉझीट जप्त का करु नये? याचा खुलासा करावा. तसेच संस्थानच्या होणा-या नुकसानीस आपणास जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी " असे कळविण्यात आले होते.

दि. ०७/०५/२००५ चे पत्रान्वये ठेकेदार यांनी खालीलप्रमाणे खुलासा कळविला आहे.

जानेवारी २००५ पासून अपूर्ण राहीलेले रंगकाम जलद गतीने करण्याचा प्रयत्न केला होता. त्यासाठी त्यांनी औरंगाबाद, नाशिक व हरेगांव येथील पेंटर कारागीर लावून गती वाढविण्याचा प्रयत्न केला असता, हरेगांव येथील एका पेंटर कारागीराने तेथील कारागीरांना भडकावून कामावर येण्यास मज्जाव केला होता. त्यामुळे तुलनेने जास्त संख्येने असणाऱ्या हरेगांवच्या पेंटर कारागीरांनी त्यांच्याकडील काम बंद करुन दुसरीकडे कामाला गेले. तद्नंतर औरंगाबाद व नाशिक येथील पेंटर कारागीरांमध्ये वाढ करण्यास अवधी लागला त्यामुळे काम बंद ठेवावे लागले.

मार्च महिना हा आर्थिक वर्षाचा अखेरचा महिना असल्याने व त्यानंतरच्या नवीन अर्थिक वर्षाच्या सुरुवातीपासून व्हॅट कायद्यामुळे अंबलबजावणी होत असल्याचे संकेत मिळत असल्याच्या कारणामुळे त्यांना नेरोलॅक पेटंस् कंपनीने उत्पादन बंद केले होते. त्यामुळे त्यांना पेंट मिळाला नाही. इत्यादी कारणांमुळे ठेकेदार यांनी अंतिम तिस-यांदा पाच महिन्यांची मुदतवाढ मागितली आहे व सदर मुदतीत रंगकाम पूर्ण करु न शकल्यास विलंबाबाबत त्यांना दंड आकारणी मान्य राहील, असे कळविले आहे. म्हणजेच ठेकेदार यांनी फेब्रुवारी २००५ पासून पाच महिन्यापर्यंत म्हणजेच जून २००५ अखेर मुदतवाढ मिळण्यास विनंती केली आहे.

ठेकेदार यांना यापुर्वी दोनवेळा मुदतवाढ देवून काम पूर्ण करणेसाठी संधी देण्यात आली होती. मात्र तरीही त्यांनी वाढीव मुदतीत काम पूर्ण केले नाही.

याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करता येईल. त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

अ) ठेकेदार यांचेकडून लेखी हमी घेवून येत्या तीन महिन्यांचे कालावधीत उर्वरीत काम पूर्ण करुन दिल्यास त्यांचे विनंतीनुसार त्यांना तिस-यांदा मुदतवाढ देवून काम पूर्ण करुन घेणे. **अथवा**

ब) ठेकेदार यांना दोन वेळेस मुदतवाढ देऊनही ठेकेदार यांनी रंगकाम पूर्ण केलेले नाही. त्यामुळे निविदा शर्तीनुसार संस्थानकडे जमा असलेली इ.एम.डी. व सिक्यूरिटी डिपॉझिट जप्त करणे व उर्वरित कामाकरीता नव्याने निविदा मागविणे.

आजचे सभेत ठेकेदार श्री.के.बी.पाथरीकर यांचे प्रतिनिधी श्री.देशमुख उपस्थित होते. त्यांचेशी झालेल्या चर्चेप्रमाणे त्यांना दिनांक ३१ ऑगष्ट,२००५ पर्यंत काम पूर्ण करणेस मुदतवाढ देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१३. नवीन भांडार इमारतीसाठी सर्व्हे नं.१२४/१ अ मधील जागेत अंतर्गत रस्ता तयार करणेबाबत.**

**निर्णय क्र.२५७.** संस्थानचे सर्व्हे नं. १२४/१ अ मध्ये संस्थानचे नवीन मध्यवर्ती भांडार इमारतीचे काम पूर्ण होत आले आहे. या ठिकाणी संस्थानच्या मालकीची १ हे.०९ आर. इतकी जागा आहे. सदर जागेलगत चारी नं. १२ लगतचा रस्ता आहे. हा रस्ता अलीकडेच संस्थानतर्फे डांबरीकरण करण्यात आला आहे. या रस्त्यापासून भांडार इमारतीपर्यंत जाण्यासाठी चारीवर सी.डी. वर्क व पक्का अंतर्गत रस्ता करण्याची आवश्यकता आहे.

चारी नं. १२ वर सि.डी. वर्क करणेसाठी दि. १५/०५/२००५ रोजी कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. नियोजीत कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

अ) चारीवर १२०० mm व्यासाचे आर.सी.सी. पाईपमध्ये २० मिटर रुंदीचे सी.डी. वर्क करणे.

ब) खडीकरण व डांबरीकरणामध्ये करावयाचे रस्ते -

५.५० मि. रुंद - लांबी - ७५.०० मि.

३.७० मि. रुंद - लांबी - २५०.०० मि.

वरीलप्रमाणे चारीवर सी.डी.वर्क करणे व अंतर्गत पक्के डांबरी रस्ते करणेसाठी प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

०१.नवीन भांडार इमारतीसाठी अंतर्गत रस्ते तयार करणे. - रु. ६,५०,०००.००

०२.चारी नं. १२ वर सि.डी. वर्क करणे - रू. ७०,०००.००

------------------------------

एकूण - रु. ७,२०,०००.००

वरील कामांसाठी तपशिलवार एस्टीमेट, नकाशा व निविदा भांडार इमारतीसाठीचे आर्किटेक्ट मे. निकम पा. असो. श्रीरामपूर यांचेकडून तयार करुन घेता येतील. तरी वरील कामासाठी स्थानिक वर्तमानपत्रातील जाहीरातीद्वारे निविदा मागविणेसाठी मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१४. संस्थानचे चालू असलेल्या विविध बांधकामांना मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.२५८. अ) नांदुर्खी रस्ता रुंदीकरण, खडीकरण व डांबरीकरण कामाबाबत :-**

विषयांकीत रस्त्याचे काम हे शिर्डी नगरपंचायत हद्दीतील असून ते संस्थानतर्फे करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| कामाचे नांव | शिर्डी नांदुर्खी रस्ता रुंदीकरण, खडीकरण व डांबरीकरण करणे. |
| ठेकेदाराचे नांव | मे. पॅसो इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, कोपरगांव |
| व्यवस्थापन मंडळ निर्णय | क्रमांक ५७३ दि. १३/१२/२००३ |
| मंजूर निविदा रक्कम | रु. ११,५४,६२५/- |
| कार्यादेश क्रमांक | जा.नं. एसएसएस/वशी- बांधकाम/३०११/०४ दिनांक १९/०३/२००४ |
| काम पूर्ण करण्याची मूदत | डांबरीकरणासह दि. ३०/११/२००४ पर्यंत |
| कामाची सद्यस्थिती | खडीकरण बी बी एम व कारपेटींगचे काम पूर्ण. सिलकोट, डीव्हायडर व विद्युतीकरणाचे काम बाकी |

सदर रस्त्याचे उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी ठेकेदार यांनी दि. १७/०६/२००५ चे पत्राव्दारे दि. ३०/०६/२००५ पर्यंत मुदतवाढीची मागणी केलेली आहे. सुरुवातीला रस्त्याच्या बाजूस असलेल्या अतिक्रमणामुळे व ते काढण्यासाठी विलंब झाल्यामुळे. तसेच विद्युतखांब हलविण्यास वेळ लागल्यामुळे दिलेल्या मुदतीत काम पूर्ण करता आले नाही. असे ठेकेदार यांनी नमूद केले आहे. प्रत्यक्षात सदर कामासाठी खालील अडचणी निर्माण झाल्या होत्या.

०१. नगरपंचायत यांनी साईट उपलब्ध करुन दिल्यानंतर पुन्हा काही ठिकाणी असलेली अतिक्रमणे काढण्यास वेळ लागला.

०२. रस्त्याच्या रुंदीत असलेले विद्युत खांब नगरपंचायत यांचेमार्फत हलविण्यास विलंब लागला.

०३. नगर- मनमाड रस्त्यावरुन काढावयाचे कॉंक्रीट डिव्हायडर्स या रस्त्यावर ठेवता येतील असे दि. ११/०८/२००४ रोजीचे चर्चेत मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांनी सांगितले. त्यानंतर दि. १७/०६/२००५ रोजीचे चर्चेत मुख्याधिकारी यांनी डिव्हायडरमुळे या रस्त्यावर अडचण निर्माण होईल. त्यामुळे डिव्हायडर्स करु नयेत. तसेच रस्त्यालगत असलेल्या विद्युत खांबांना पथदीप बसविण्यात आले असल्याने मध्यभागी नवीन पथदीप करण्याची आवश्यकता नसल्याचे सांगितले. अशाप्रकारे डिव्हायडर व पथदीप याबाबत निर्णय घेणे आवश्यक असल्याने सिलकोटचे काम करण्यात आलेले नाही.

तरी सदर कामाचे निविदेतील डिव्हायडर व पथदिप (विद्युतीकरण) कामे वगळणेस व ठेकेदार यांना दि. ३०/०६/२००५ पर्यंत सिलकोटचे काम पूर्ण करणेसाठी मुदतवाढीस मंजूरी देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली. तसेच सध्या पावसाळा सुरु झाल्यामूळे दिनांक ३०.०६.२००५ अखेर सिलकोटचे (डांबरीकरण) काम पुर्ण करता आलेले नाही. करीता सिलकोटचे कामास मुदतवाढ देण्यात आली.

**ब) संस्थानचे नवीन मध्यवर्ती भांडार इमारत बांधकामाबाबत :-**

श्री साईबाबा संस्थानचे सर्व्हे नं. १२४/१ अ मध्ये नवीन मध्यवर्ती भांडार इमारतीचे बांधकाम सध्या चालू आहे. सदर कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| कामाचे नांव | नवीन मध्यवर्ती भांडार इमारतीचे बांधकाम करणे |
| ठेकेदाराचे नांव | मे. पवार पाटकर कन्स्ट्रक्शन, नाशिक |
| व्यवस्थापन मंडळ निर्णय | क्रमांक ५३ दि. २१-२२/०२/२००४ |
| मंजूर निविदा रक्कम | रु. ६९,८१,६०८.०० |
| कार्यादेश क्रमांक | जा.नं. एसएसएस/वशी- बांधकाम/२४३८/०४ दिनांक ०३/०४/२००४ |
| काम पूर्ण करण्याची मूदत | दि. २१/०६/२००४ ते २०/०३/२००५ एकूण नउ महिने |
| कामाची सद्यस्थिती | ट्रेमिक्स कॉंक्रीट करणे, आतील व बाहेरील रंगकाम करणे, कोटा बसविणे दरवाजे व रोलींग शटर बसविणे इत्यादी कामे बाकी आहेत. |

सदर काम करण्यासाठी साईटवर ॲप्रोच रोड नसल्यामुळे पावसाळ्यात काम करण्यासाठी अडचणी आल्या व नगर जिल्हयात वाळू उपशावर शासनाने बंदी आणल्यामुळे वाळू मिळण्यास अडचणी आल्या. या कारणास्तव ठेकेदार यांनी दि. ०४/०४/२००५ रोजीचे पत्राव्दारे मे. २००५ अखेर मुदतवाढ मागणी केली आहे. तसेच दि. १८/०६/२००५ रोजीचे पत्राव्दारे दि. ३१ जुलै २००५ अखेर मुदत वाढीची मागणी केली आहे.

प्रत्यक्षात ठेकेदार यांनी नमूद केलेल्या कारणांमुळे काम करण्यास काही प्रमाणात विलंब झालेला आहे. तथापि, या व्यतिरिक्त दुसरे ठोस असे कारण नाही. ठेकेदार यांनी अगोदर दि. ३१/०५/२००५ अखेर व त्यानंतर ३१/०७/२००५ अखेर मुदतवाढीची मागणी केली आहे. यापुर्वी त्यांना एकही मुदतवाढ मंजूर करण्यात आलेली नाही. तरी उर्वरित काम पूर्ण करणेसाठी ठेकेदार यांना मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

**क) नगर- मनमाड रस्ता विकसीत करणे :-**

शिर्डी शहरातून जाणारा नगर- मनमाड रस्ता (लांबी - १६०५ मि.) रुंदीकरण व डांबरीकरणाचे काम ठेकेदार मे. न्यू महावीर कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांचे मार्फत चालू आहे. सदर कामाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| कामाचे नांव | शिरडी शहरातून जाणारा नगर-मनमाड रस्ता (लांबी १६०५ मि.) विकसीत करणे. |
| ठेकेदाराचे नांव | मे. न्यू महावीर कंन्स्ट्रक्शन, औरंगाबाद |
| व्यवस्थापन मंडळ निर्णय | क्रमांक ५२ दि.२१-२२/०२/२००४<br>क्रमांक २२७ दि. २९-३०/०५/२००४<br>क्रमांक १४९ दि. २७/१२/२००४ |
| मंजूर निविदा रक्कम | रु. २,०७,१६,२००/- |
| मंजूर सुधारीत एस्टीमेट क्र. १ | रु. २,५६,४०,८५०/- |
| मंजूर सुधारीत एस्टीमेट क्र. २ | रु. २,९७,४०,३००/- |
| कार्यादेश क्रमांक | जा.नं. एसएसएस/वशी- बांधकाम/ ४७३८ /०४ दिनांक ०६/०५/२००४ |
| काम पूर्ण करण्याची मूदत | पाच महिने ०८/१०/२००४ अखेर |
| कामाची सद्यस्थिती | डांबरीकरण काम पूर्ण. फूटपाथ स्लॅब व डिव्हायडचे काम प्रगतीपथावर, पेव्हींग ब्लॉकचे काम बाकी. |

मूळ निविदा शर्तीनुसार सदर काम पूर्ण करण्यासाठी दि. ०८/१०/२००४ अखेर मूदत देण्यात आलेली होती. परंतू सदर कामामध्ये काही सुधारणा करण्यात आल्यामुळे अपेक्षित खर्चात वाढ झालेली आहे. व्यवस्थापन समिती निर्णय क्र. १४९ दि. २७/१२/२००४ अन्वये रस्त्याचे कामासाठी होणा-या वाढीव खर्चासह एकूण अपेक्षित रु. २,९७,४०,३००/- मात्रचे सुधारीत खर्चास मान्यता देणेत आलेली आहे.

सदर रस्त्याचे डांबरीकरण काम पूर्ण झालेले असून फूटपाथ स्लॅब आणि डिव्हायडरचे काम प्रगतीपथावर आहे. ठेकेदार यांनी दि. १८/०६/२००५ चे पत्राव्दारे पेव्हिंग ब्लॉकसह उर्वरीत काम पूर्ण करण्यासाठी दि. ३०/०८/२००५ अखेर मुदत वाढीची मागणी केलेली आहे. स्लॅबचे क्युरिंगसाठी २१

दिवस वेळ द्यावा लागतो त्यासाठी ३० ऑगस्ट २००५ अखेर पर्यत मुदतवाढ मिळावी असे ठेकेदार यांनी नमूद केलेले आहे.

तरी रस्त्याचे कामातील सुधारणांमुळे व खर्चात वाढ झाल्यामुळे ठेकेदार यांना काम पूर्ण करण्यासाठी दि. ३०/०८/२००५ अखेर पर्यंत मूदतवाढीस मंजुरी देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१५. नवीन भक्तनिवास परिसराचे पूर्वेकडील हद्दीत कंम्पाऊंड भिंत बांधकामाबाबत.**

**निर्णय क्र.२५९.** शिर्डी सर्व्हे क्र.१०७, १०८ व १०९ पै. मधील जागेत भक्तनिवास इमारत, शैक्षणिक संकूल, क्वॉर्टर इत्यादी इमारती बांधण्यात आलेल्या आहेत. सदर जमिनीचे दक्षिणेस पक्क्या स्वरुपातील कंम्पाउंड भिंत बांधण्यात आलेली आहे. पश्चिम बाजूस काही भागात कॉक्रीट ब्लॉकची भिंत व काही भागात काटेरी तारेचे कुंपण बांधण्यात आले आहे. उत्तर बाजूस (लांबी- ३७१.७० मी.) खाजगी शेतक-यांचे अतिक्रमण असल्याने न्यायालयीन वाद चालू आहे. त्यामुळे तेथे काटेरी तारेचे कुंपण बांधण्यात आले आहे.

पूर्व बाजूची कंम्पाउंड भिंत बांधणे बाकी आहे. सोबत लेआउट प्लॅनमध्ये दाखविलेप्रमाणे पूर्व बाजूकडील ३२०.१० मीटर पैकी १९८.६० लांब अंतराची कंम्पाउंड भिंत बांधकामासाठी अंदाजे रु. ४,५४,७९४/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तरी कंम्पाउंड भिंत बांघणेस व त्यासाठी येणा-या खर्चास मंजुरी मिळणेस तसेच सदर कामासाठी आर्किटेक्ट नेमणूकीस व वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे निविदा मागविणेसाठी मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, याकामासाठी आर्किटेक्ट निकम पाटील असोसिएटस्, श्रीरामपूर यांची नेमणूक करणेस व निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली. तसेच नगराध्यक्ष मा.श्री कैलास कोते यांचे विनंतीवरुन सदर परीसरातील नागरिकांसाठी येण्या जाणेकरीता एक लहान गेट ठेवण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१६. सर्व्हे नं.१४८ मध्ये निवासी खोल्या बांधकाम करणेबाबत.**

**निर्णय क्र.२६०.** संस्थानचे स.नं.१४८/२ मधील धर्मशाळा परिसरात साईभक्तांसाठी निवासी खोल्या बांधकामासाठी यापुर्वी तत्कालीन व्यवस्थापन मंडळाने निविदा मागविल्या होत्या. याकरीता आर्किटेक्ट मे.काबरे चौधरी, नाशिक यांनी पार्किंगसाठी स्टिल्ट फ्लोअर व त्यावरील तीन मजल्यावर एकूण २२८ स्वयंपूर्ण निवासी खोल्यांचा प्लॅन व रु.८,६०,४१,७००/- मात्र इतक्या रकमेचे अपेक्षित खर्चाचे एस्टिमेट तयार केले होते. याबाबत व्यवस्थापन समितीच्या सभेत दि. २१/१०/२००४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१४३ अन्वये वरील कामासाठी आलेल्या सर्व निविदा रद्द करण्यात याव्यात व सदर प्रकल्पासाठी आर्किटेक्ट श्री.दिपक देशपांडे, औरंगाबाद यांची नेमणूक करावी, असे ठरले.

आर्किटेक्ट श्री.दिपक देशपांडे, (मॉडयूल आर्किटेक्ट), औरंगाबाद यांनी सदर प्रकल्पाकरीता आराखडा सादर केला होता. सदर पहिल्यांदा सादर केलेल्या आराखडयामध्ये खालील कामांचा समावेश होता.

| अ.नं. | तपशील |
|---|---|
| ०१ | तळमाळा - पार्किंग (stilt floor), कार्यालय, लॉकर रुम, स्टोअर |
| ०२ | पहिला माळा - ५६ स्वयंपूर्ण खोल्या - बाल्कनीसह |
| ०३ | दुसरा माळा - ५६ स्वयंपूर्ण खोल्या - बाल्कनीसह |
| ०४ | तिसरा माळा - ५६ स्वयंपूर्ण खोल्या - बाल्कनीसह |
| ०५ | चौथा माळा - ५६ स्वयंपूर्ण खोल्या - बाल्कनीसह |
| एकूण | २२४ स्वयंपूर्ण खोल्या - बाल्कनीसह |

या कामाकरीता आर्किटेक्ट यांनी अंदाजे **रु.१३४०.०० लक्ष** इतक्या रकमेचे प्लॅन व एस्टिमेट सादर केले होते.

त्यानंतर आर्किटेक्ट श्री. दिपक देशपांडे यांनी सुधारीत आराखडा सादर केला. सदर सुधारित आराखडयामध्ये खालील कामांचा समावेश आहे.

| TYPE OF ROOMS | SIZE | NO OF ROOMS | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | GF | FF | SF | Total |
| 2/3 Bed | 3.65 x 3.60m | -- | 24 | 48 | 72 |
| Deluxe Suit | 3.65 x 3.60m ( 2 Rooms Combined) | -- | -- | 2x4=8 | 08 |
| Deluxe suit A/C | 3.65 x 3.60m ( 2 Rooms Combined) | -- | -- | 2x4=8 | 08 |
| 4 Bed | 3.65 x4.80 | -- | 44 | 16 | 60 |
| 8 Bed | 3.65 x4.80 ( 2 Rooms Combined) | -- | 2x4= | - | 08 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 6 Bed | 3.65 x 6.0m | 4 | 8 | 12 | 24 |
| 12 Bed | 3.65 x 6.0m<br>( 2 Rooms Combined) | 2x4=8 | 2x4= | - | 16 |
| **Total** | | **12** | **92** | **92** | **196** |

एकूण १९६ खोल्यांमध्ये अंदाजे ७०० व्यक्तींची निवासव्यवस्था होवू शकेल.

याकामी आर्किटेक्ट यांनी **रु.७४०.०० लक्ष** मात्र रकमेचे प्लॅन व एस्टिमेट सादर केले होते. सदरचा प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे दि.०३/०५/२००५ रोजी मुंबई येथे झालेल्या बैठकीत सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवून त्याप्रमाणे सुधारीत आराखडा तयार करण्यात यावा असे ठरले.

साईभक्तांसाठी निवासी खोल्यांचे इमारत बांधकामासाठी वरीलप्रमाणे मे.काबरे चौधरी आर्किटेक्ट, नाशिक यांचेकडून एक व मे. मॉडयूल आर्किटेक्ट (श्री.दिपक देशपांडे), औरंगाबाद यांचेकडून दोन असे एकूण ०३ आराखडे प्राप्त झालेले आहेत.

आर्किटेक्ट मे.काबरे चौधरी, नाशिक हे आजचे सभेत समक्ष उपस्थित होते, त्यांनी तयार केलेला आराखडा सभेस दाखविला, तसेच सभेने विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे दिली. श्री काबरे यांनी तयार केलेल्या खोल्या या ४ बेडच्या असल्याचे सांगितले. यावर सभेने त्यांना या खोल्यांमध्ये दोन बेडच्या २५% ते ३०% खोल्या ठेवणेबाबत सांगितले त्यानुसार सुधारित प्लॅन तयार करुन त्यामूळे वाढ होणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.

तसेच वर्तमानपत्रात निविदा सुचना प्रसिद्ध करुन किमान पात्रतेसाठी अटी नमुद करुन दोन लिफाफा पद्धतीने निविदा मागविण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.१७. मंदिर परिसर, प्रसादालय, साईउद्यान व मंगल कार्यालय कंम्पाऊंड भिंत बांधकामांचे वाढीव खर्चाबाबत.**

**निर्णय क्र.२६१.** मंदिर व प्रसादालय परिसरातील जुन्या असलेल्या कंम्पाउंड भिंत रोड फूटपाथ लेव्हल पर्यंत काढून त्यावर मंदिर परिसरात सुसंगत असे विट बांधकाम, बाजूने स्टोन क्लायडींग व त्यावर कास्ट आयर्न ग्रील असलेली कंम्पाउंड भिंत बांधकाम करणे असे नियोजित होते. सदर बांधकामाकरीता ठेकेदार मे. नितीन बी. औताडे, पोहेगांव यांची रु. ९५,५६,९३१.०० ची निविदा मा. व्यवस्थापन समितीचे दि. १७/०४/२००५ निर्णय क्र. १४२ अन्वये स्विकारण्यात आली आहे.

नगर-मनमाड रस्त्यालगत असलेल्या कंम्पाउंड भिंत प्रसादालय पार्कींग गेट पासून लेंडीबाग धबधब्या पर्यंत, रोड लेव्हल पर्यंत जुने फौडेंशन आहे ते तसेच ठेवून त्यावर नविन कंम्पाउंड भिंत करण्याचे मुळ निविदेमध्ये आर्किटेक्ट यांनी धरले होते. नगर-मनमाड रस्ता रुंदीकरणामध्ये धबधबा ते व्ही.आय.पी. गेट पर्यंत कंम्पाउंड भिंत तुटलेली असल्याने तसेच जूना पिंपळवाडी रस्ता ते प्रसादालय पार्कींग पर्यंत सध्याचे कंम्पाउंड भिंती पासून २ फूटापर्यंत रस्ता रुंदीकरणामध्ये शिफ्ट झाल्यामुळे नव्याने फौडेशन घेवून कंम्पाउंड भिंतीचे बांधकाम करावे लागणार आहे. तसेच साईटवर कास्ट आयर्न रेलींगला भक्कमपणे आधार येण्यासाठी ठराविक अंतरावर कॉलम व फूटींगचे डिझाईन घेतले आहे. त्यामुळे मंजूर एस्टीमेटमध्ये रु. ९,७२,७१४.०० इतकी वाढ होणार असून, त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१८. वार्षिक औषधे खरेदीकामी आलेल्या निविदा उघडणेबाबत.**

**निर्णय क्र.२६२.** श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २००५-२००६ या वर्षासाठी खरेदी करावयाची वार्षिक औषधे खरेदीकामी अंदाजे रु. १,३१,१२,९०५.७१ मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचा विषय हा मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १७/०४/२००५ रोजीच्या सभेपूढे आयत्या वेळचा विषय म्हणून मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. त्यावर चर्चा होऊन वैद्यकिय अधिक्षिका यांनी सुचविलेल्या मागणीस व रु.१,३१,१२,९०५.७१ चे खर्चास मान्यता देण्यात येऊन सदरचे खरेदीकामी दरवर्षाप्रमाणे वर्तमान पत्रात जाहिरात देण्यात येऊन थेट उत्पादक कंपन्यांना पत्र पाठवून त्यांना निविदा फॉर्म विकत घेऊन दर भरण्याबाबत कळविण्यात यावेत असे ठरले होते.

त्यानुसार वार्षीक औषधे खरेदीकामी दैनिक सकाळ, महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता, लोकमत इत्यादी वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती त्यानुसार संस्थानचे शिरडी व मुंबई येथील कार्यालयात निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या व दि. १४/०५/२००५ अखेर निविदा विक्री व स्विकारण्याची अंतिम मुदत ठेवण्यात आली होती. त्यानुसार एकुण ११० निविदा प्राप्त झालेल्या आहेत त्या खालीलप्रमाणे -

| अ.नं. | निविदाधारकांचे नाव |
|---|---|
| ०१ | मे. सुप्रिया सर्जिकल्स, नाशिक |
| ०२ | मे. सुर्या सर्जिकल्स, नाशिक |
| ०३ | मे. अल्फा मेडीकेअर, अहमदाबाद |
| ०४ | मे. कार्पो लॅब प्रा. लि. बँगलोर |

| अ.नं. | निविदाधारकांचे नाव |
|---|---|
| ०५ | मे. स्पार्क मार्केटींग, अहमदनगर |
| ०६ | मे. सनवेज इं. प्रा.लि. मुंबई |
| ०७ | मे. औषधी भवन, नाशिक |
| ०८ | मे. रोहन सर्जिकल ॲन्ड फार्मा., औरंगाबाद |
| ०९ | मे. आयसीपीए हेल्थ प्राडक्टस लि. मुंबई |
| १० | मे. नागार्जुन, नाशिक |
| ११ | मे. मनोज सर्जिकल इंडस्ट्रिज लि. इंदौर |
| १२ | मे. ब्लीस इन्फ्युजन ॲन्ड सर्जि प्रा.लि. नाशिक |
| १३ | मे. जेसीपील फार्मा प्रा. लि. जळगाव |
| १४ | मे. पंकज फार्मा, पुणे |
| १५ | मे. एस.एस मार्केटींग, औरंगाबाद |
| १६ | मे. एन्टोड फार्मासिटीकल्स, लि. मुंबई |
| १७ | मे. भारत सिरम ॲन्ड व्हक्सीन्ज लि. मुंबई |
| १८ | मे. एस. के. एजन्सीज, धुळे |
| १९ | मे. गौरव सर्जिकल्स, नाशिक |
| २० | मे. माऊली फार्मा ॲन्ड सर्जि. डिस्ट्री. कोपरगाव |
| २१ | मे. नवदुर्गा मेडीकल, नाशिक |
| २२ | मे. फार्मासिया लिंक, पुणे |
| २३ | मे. वैष्णवी डिस्ट्रीब्युटर्स, नाशिक |
| २४ | मे. श्रीजी एजन्सीज, श्रीरामपुर |
| २५ | मे. भागीरथ मेडीको एजन्सीज, जळगाव |
| २६ | मे. प्रेसी एंटरप्रायजेस, नाशिक |
| २७ | मे. निऑन लॅबोरॅटरीज लि. मुंबई |
| २८ | मे. सिध्दी मेडीकल डिस्ट्री. औरंगाबाद |
| २९ | मे. आयव्हीईएस इं. प्रा. लि. इंदौर |
| ३० | मे. मिलन एंटरप्रायजेस, अहमदनगर |
| ३१ | मे. अंबिका सर्जिकल्स, संगमनेर |
| ३२ | मे. कुंदन सर्जिकल्स, अहमदनगर |
| ३३ | मे. युनीर्व्हसल केमीकल्स, नाशिक |
| ३४ | मे. लाईफ लाईन सर्जिकल्स, कोपरगाव |
| ३५ | मे. विन फार्मा इं. प्रा. लि. औरंगाबाद |
| ३६ | मे. आनंद एंटरप्रायजेस, पुणे |
| ३७ | मे. विजय ट्रेडींग कार्पोरेशन, श्रीरामपुर |
| ३८ | मे. निकोलस पिरामल इं. प्रा. लि. मुंबई |
| ३९ | मे. पायोनियर एंटरप्रायजेस, अहमदनगर |
| ४० | मे. मिना एजन्सीज, नाशिक |
| ४१ | मे. महेश सर्जिकल्स ॲन्ड फार्मा, चिंचवड-पुणे |
| ४२ | मे. स्विटी सर्जिकल्स, नाशिक |
| ४३ | मे. हेल्थ केअर फार्मा, पुणे |
| ४४ | मे. श्वेता ड्रग्ज, अहमदनगर |
| ४५ | मे. डी. विजय फार्मा, नाशिक |
| ४६ | मे. एव्हरेस्ट लॅबोरॅटरीज, मेरट |
| ४७ | मे. दास एजन्सीज, नाशिक |
| ४८ | मे. आनंद फार्मा, कोपरगाव |
| ४९ | मे. रत्नप्रभा मेडीकल एजन्सीज, श्रीरामपुर |
| ५० | मे. मॉरीन सर्जिकल को. औरंगाबाद |
| ५१ | मे. कॉक्स रिसर्च सेंटर प्रा. लि. नाशिक |
| ५२ | मे. संदीप एजन्सीज, कोपरगाव |
| ५३ | मे. गौरव मेडीकल ॲन्ड जनरल्स, श्रीरामपुर |
| ५४ | मे. मंत्री एजन्सीज, अहमदनगर |
| ५५ | मे. जे.एस.पी. सर्जिकल्स, नाशिक |
| ५६ | मे. श्रेया एंटरप्रायजेस, अहमदनगर |
| ५७ | मे. ममता एजन्सीज / एंटरप्रायजेस, श्रीरामपुर |
| ५८ | मे. निर्मल एजन्सीज, अहमदनगर |
| ५९ | मे. बीडीएच इंडस्ट्रीज लि., मुंबई |
| ६० | मे. इंडोको रेमीडीज लि. मुंबई |

| अ.नं. | निविदाधारकांचे नाव |
|---|---|
| ६१ | मे. पर्क फार्मा. सर्व्हीसेस, मुंबई |
| ६२ | मे. वासु फार्मा प्रा. लि., वदोदरा |
| ६३ | मे. जिवोदया नेत्रप्रभा, मुंबई |
| ६४ | मे. इंडीयन ड्रग्ज प्रा. लि., मुंबई |
| ६५ | मे. नेहा एंटरप्रायजेस, पुणे |
| ६६ | मे. दिना एंटरप्रायजेस, मुंबई |
| ६७ | मे. विशात सायंटीफीक कार्पोरेशन, ठाणे |
| ६८ | मे. ग्लेनमार्क फार्मा. लि., मुंबई |
| ६९ | मे. सन फार्मा इंडस्ट्रिज लि., मुंबई |
| ७० | मे. नवशक्ती आयुर्वेदालय, भुसावळ |
| ७१ | मे. रमन ॲन्ड वेल प्रा. लि., मुंबई |
| ७२ | मे. सेंटॉर फार्मासिटीकल्स प्रा.लि., मुंबई |
| ७३ | मे. मेकर्स लॅबोरॅटरीज लि., मुंबई |
| ७४ | मे. गल्फा लॅबोरॅटरीज लि., मुंबई |
| ७५ | मे. रजत सेल्स प्रा. लि. मुंबई |
| ७६ | मे. जॉनसन ॲन्ड जॉनसन लि., मुंबई |
| ७७ | मे. बी. ब्राउन मेडीकल इं. प्रा. लि., मुंबई |
| ७८ | मे. संजय मेडीकल ॲन्ड जन.स्टोअर्स, पुणे |
| ७९ | मे. एमआरके हेल्थकेअर, मुंबई |
| ८० | मे. वैभव एजन्सी, पुणे |
| ८१ | मे. बायोलॉजिकल इन्युनोलॉजिकल, हैद्राबाद |
| ८२ | मे. युनीकेम लॅबोरॅटरीज लि., मुंबई |
| ८३ | मे. थेमीस मेडीकेअर, मुंबई |
| ८४ | मे. खंडेलवाल लॅबोरॅटरीज प्रा. लि. मुंबई |
| ८५ | मे. इमक्युअर फार्मासिटीकल्स लि., पुणे |
| ८६ | मे. केईपीएस फार्मा, मुंबई |
| ८७ | मे. चंद्रा भगत फार्मा प्रा. लि., मुंबई |
| ८८ | मे. हिंदुस्थान फोटो फिल्म्स, मुंबई |
| ८९ | मे. फ्रसेनीयस काबी इं. प्रा. लि., पुणे |
| ९० | मे. बायोकेम फार्मासिटीकल्स इंड., मुंबई |
| ९१ | मे. जर्मन रेमीडीज लि., मुंबई |
| ९२ | मे. ॲस्ट्राझेनेका फार्मा इं. लि., मुंबई |
| ९३ | मे. हिमालया ड्रग्ज कंपनी, बॅंगलोर |
| ९४ | मे. झायडस कॅडीला हेल्थकेअर, अहमदाबाद |
| ९५ | मे. ईसकॉन सर्जिकल्स लि., मुंबई |
| ९६ | मे. ॲनालिटीकल ऑटोमेशन प्रा.लि. मुंबई |
| ९७ | मे. जॉनसन ॲन्ड जॉनसन लि., मुंबई |
| ९८ | मे. फ्रान्को इंडीयन फार्मा प्रा.लि. मुंबई |
| ९९ | मे. क्वालीजेन्स फाईन केमीकल्स, मुंबई |
| १०० | मे. एन.पी. एजन्सीज, मुंबई |
| १०१ | मे. साई फार्मासिटीकल्स, पुणे |
| १०२ | मे. इंगा लॅबोरॅटरीज, मुंबई |
| १०३ | मे. तांबे मेडीकल हाऊस, नगर (सिलबंद निविदा) |
| १०४ | वालेस फार्मासिटीकल,मुंबई (सिलबंद निविदा) |
| १०५ | फरसिनेस काबी,पुणे (प्रशा.मार्फत उघडुन आलेली निविदा ) |
| १०६ | टोरेंट फार्मा,अहमदाबाद(प्रशा.मार्फत उघडुन आलेली निविदा ) |
| १०७ | मे. ओमनी लेन्स प्रा.लि.अ.बाद (सिलबंद निविदा) |
| १०८ | जॉन फ्वॉवलर इं.लि.मुंबई (सिलबंद निविदा) |
| १०९ | रुबी सर्जी.जळगांव (प्रशा.मार्फत उघडुन आलेली निविदा ) |
| ११० | बेल फार्मा,मुंबई (प्रशा.मार्फत उघडुन आलेली निविदा ) |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेपूढे उघडणेत येऊन सदर निविदासादरकर्त्यांना चर्चा/ वाटाघाटीसाठी आजचे सभेपुढे समक्ष बोलविण्यात आले होते. ११० पैकी एकूण ५७ निविदासादरकर्ते वाटाघाटीसाठी उपस्थित होते. सर्व उपस्थित निविदासादरकर्त्यांना व्यवस्थापन समितीचे सभेपूढे एकत्रित बोलावून त्यांचे मूळ निविदेत देऊ केलेल्या दरात संस्थानचे रुग्णालय हे धर्मादाय आहे म्हणून जी काही अंतिम सूट देता येईल ती त्यांनी लिखित स्वरुपात बंद पाकिटात द्यावी असे त्यांना सांगणेत आले. निविदासादरकर्त्यांनी

देऊ दराची पाकिटे, मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग, मा. श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे, मा. डॉ. एकनाथ भागचंद गोंदकर यांचे समितीस उघडण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले.

यावर सविस्तर चर्चा होऊन, खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

**(अ)** उपरोक्त निविदासादरकर्त्यांनी देऊ केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन नामांकित कंपन्यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावे.

**(ब)** एकूण प्राप्त झालेल्या ११० निविदामध्ये ज्या निविदासादरकर्त्यांनी निविदांसोबत अनामत रक्कम भरलेली नाही मात्र त्या थेट उत्पादक कंपन्या असल्यास तुलनात्मक तक्त्यात त्यांचा विचार करण्यात यावा.

**(क)** ज्या निविदाधारकांनी आपण मागणी केलेल्या कंपन्यांची औषधे दिलेली नाहीत. तसेच यापुर्वी ज्यांचे नाव काळया यादीत घेण्यात आलेले आहे अशा निविदासादरकर्त्यांचा तुलनात्मक तक्त्यात विचार करण्यात येऊ नये

**(ड)** मागणी केलेल्या औषधांपैकी ज्या औषधांकरीता एकाच निविदासादरकर्त्याचे दर प्राप्त झालेले आहेत. दरवर्षीप्रमाणे स्वीकारणेत येऊन त्यांनाही पुरवठा आदेश देण्यात यावा.

**(इ)** मागणी केलेल्या औषधांपैकी ज्या औषधांकरीता कोणत्याही निविदासादरकर्त्यांचे दर प्राप्त झालेले नाहीत. ती औषधे मा.कार्यकारी अधिकारी व प्रशासकीय अधिकारी यांचे समितीने कोटेशन्स मागवून आवश्यकतेनुसार निम्नतम दराने खरेदी करण्यात यावी.

**(ई)** वरील खरेदीमध्ये सलाईन हे आपण मागील वर्षी मे. ब्लीस इन्फ्युजन, नाशिक यांचेकडून घेतले होते. यावर्षीही त्यांचे दर आपणास प्राप्त झालेले आहे. तथापि; सदर कंपनीबाबत दि.०८.०५.२००५ चे नाशिक लोकमत या वर्तमान पत्रात "सदर कंपनीच्या सलायनच्या बाटल्यात बुरशी आढळून आल्याने महाराष्ट्र शासनच्या विधान सभेत लक्षवेधी सूचना करण्यात आलेली होती. त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या अन्न व औषध प्रशासन विभागाने सदर कंपनीचा परवाना रद्द केलेला आहे असे प्रसिद्ध झालेले आहे. त्यामुळे सदर कंपनीची औषधे न स्वीकारता तेथे क्र.०२ चे दर असलेल्या निविदासादरकर्त्याकडून खरेदी करण्यात यावी.

**(उ)** ज्या औषधांसाठी दोन निविदाधारकांचे सारखेच दर प्राप्त झालेले आहे तेथे सदरची मागणी दोनही निविदाधारकांना समप्रमाणात विभागून देण्यात यावी.

तसेच प्रवरा हॉस्पिटल, लोणी हे औषधे खरेदीकामी अवलंबित असलेल्या पद्धतीची देखील माहिती घेण्यात यावी. (कार्यवाही- वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय)

**विषय नं.१९. जुने रुग्णालय व प्रस्तावित नवीन रुग्णालय प्रकल्प अहवालाबाबत.**

**निर्णय क्र.२६३.** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ८.०५.२००५ चे सभेतील निर्णय क्र.२१५ अन्वये सुपर स्पेशालिटी रुग्णालयाचा प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम डॉ.विनय कोठारी,मुंबई यांचेवर सोपविण्यात आले होते. त्यानुसार डॉ.विनय कोठारी यांनी संस्थानचे दोन्ही रुग्णालयासंबंधी तपशीलवार प्रकल्प अहवाल सादर केला होता. तो सर्व सदस्यांना जा.नं.एसएसएस-वशी-०४-६७४३-२००५, दि.२८/०६/२००५ अन्वये पाठविण्यात आला होता, तो सोबत **परिशिष्ट "अ"** म्हणून ठेवणेत आलेला आहे. तसेच या अहवालाबाबत सविस्तर टिपणी तयार करुन ती आजचे सभेत सर्व सदस्यांना पुरविण्यात आली आहे. तिची नोंद घेण्यात आली. आजचे सभेत डॉ.विनय कोठारी हे समक्ष उपस्थित होतें. सुपर स्पेशालिटी रुग्णालयाचे प्रकल्प अहवालाबाबत सविस्तर माहिती त्यांनी सभेस दिली. तसेच सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी समर्पक उत्तरे दिली.

या विषयावर चर्चा होत असताना, सध्या सुरु असलेल्या (धर्मशाळेतील) रुग्णालयातील मेडिकल, सर्जिकल व आर्थोपेडिक या विभागातील ७० खाटा नुतनीकरण केलेल्या नवीन रुग्णालयात स्थलांतरीत करणेबाबत मा.श्री.शंकरराव गेणूजी कोल्हे, उपाध्यक्ष, मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.श्री.कैलास गोविंदराव कोते यांनी निर्णय घ्यावा, असें ठरलें.

(कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये/वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय)

**विषय नं.२०. संस्थान कर्मचारी जादा वैद्यकीय बीलाबाबत.**

**निर्णय क्र.२६४.** संस्थान कर्मचारी व त्यावर अवलंबीत असलेल्या त्यांचे अवलंबीतांना कर्मचारी वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये जादा बीलाचा परतावा देण्यात येतो. त्याप्रमाणे ज्या कर्मचाऱ्यांची बीले एका वर्षात रुपये ५०००/- चे आत असतील त्यांचा परतावा मा.कार्यकारी अधिकारी यांचे स्वाक्षरीने मंजूर होतो. पण ज्या बीलांची रक्कम रुपये ५०००/- पेक्षा अधिक आहे त्यांचे बीलास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागते. यापूर्वी व्यवस्थापन समितीचे दिनांक ११.०९.२००४ चे सभेतील निर्णय क्र.१९ अन्वये येथून पुढे अशा प्रकारची कर्मचाऱ्यांची वैद्यकीय बीले वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ मा.सदस्य सर्वश्री डॉ.एकनाथ भा.गोंदकर व डॉ.पी.एल.तिवारी यांनी तपासून त्यांचे शिफारशीनुसार बीले अंतिम मंजूरीसाठी व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावीत, असें ठरलें आहे.

त्यानुसार खालीलप्रमाणे कर्मचाऱ्यांची बीले मा.डॉ.एकनाथ भा. गोंदकर व मा.डॉ.पी.एल. तिवारी यांना दाखवून घेतली आहेत. त्यानुसार खालील देयके आदा करण्याची शिफारस केली आहे, ज्यास मान्यता देण्यात आली.

| अ.नं. | कर्मचाऱ्याचे नांव | मागणी केलेली रक्कम (रुपये ) | शिफारशीनुसार परताव्याची मान्य केलेली रक्कम (रुपये ) |
|---|---|---|---|
| ०१. | डॉ.आशा श्रीराम पेंडसे | ६११.०० | ६११.०० |
| ०२. | श्री.किशोर के. क्षीरसागर | ४२००.०० | ४२००.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ०३. | श्री.सतिष गंगाधर बकरे | ३५७१.९५ | ३५१२.०० |
| ०४. | श्री.अनंत मनोहर लाड | ४६७.०० | ४६७.०० |
| ०५. | डॉ.प्रफुल्ल पोरवाल | १६०४.०० | १६०४.०० |
| ०६. | श्रीमती आशा तुळशीराम रोकडे | २८२.०० | २८२.०० |
| ०७. | श्री.बाबासाहेब कारभारी गोंदकर | १९८५३.०० | १९८५३.०० |
| ०८. | श्री.गणपत मुरलीधर गोंदकर | १६३७९४.६१ | १३३५९३.०० |
| ०९. | श्री.मधुकर बाबुराव दाभाडे | १६७३०.०० | १५७४९.०० |
| १०. | श्री.बाळू नाथा शेज्वळ | ९४१६.०० | --- |

तसेच श्री.दिलीप विश्वंभर सुलाखे, पुजारी, मंदीर विभाग यांचे बीलाबाबत चर्चा होऊन, श्री.सुलाखे यांचे वैद्यकीय बील मागील व्यवस्थापन मंडळाने नामंजूर केलेले आहे.व्यवस्थापन समितीचे दिनांक १७.०४.२००५ चे सभेमध्ये श्री सुलाखे यांचे बीलावर चर्चा होऊन सदर बिलाची तपासणी करुन ते व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे ठेवावे असे ठरले होते. त्यानुसार सदरचे बिलाची फेरतपासणी केली असता सदरहू बिलही रुपये ९९,१०३/- अदा करण्यात यावे, असें ठरलें.

(कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षक)

विषय नं.२१. श्री साईनाथ रुग्णालयात आय.यु.आय सुविधा सुरु करणेबाबत.

**निर्णय क्र.२६५.** श्री साईनाथ रुग्णालयातील स्त्रीरोग तज्ञ डॉ.संतोष गोंदकर व पॅथालॉजिस्ट डॉ.इरा भारव्दाज यांनी आय.यु.आय (Intra Uterine Insemination) ही सुविधा चालू करणेबाबत कळविले आहे. सदरची सुविधा सध्या आपल्या रुग्णालयात उपलब्ध नाही. ज्या दांम्पत्यास संतती होऊ शकत नाही अशा प्रकारच्या रुग्णांना सदर सुविधेचा फायदा होऊ शकेल.

सदर सुविधा रुग्णालयात चालू करणेसाठी खालील मशिनरी, उपकरणे व कर्मचारी वर्गाची आवश्यकता लागेल.

**अ) मशिनरी**

| Sr.No. | Name of Machinary /Equipment | Qtu | Approx Cost |
|---|---|---|---|
| 01. | Remi Compact clinical Centrifuge | 01 | 9205.00 |
| 02. | Cinex Carbon Dioxide (CO2) Incubator# CIC-73 | 01 | 210000.00 |
| 03. | Micro-Filt (India) Horizontal Laminar Flow Ultra Clean Air Unit | 01 | 48000.00 |
| 04. | Magrius Inclined Binocular Microscope Modle MLX-B | 01 | 21500.00 |
| 05. | Laboratory Incubator Mild Steel | 01 | 5500.00 |
| 06. | Automatic Micropet Pipettes | 02 | 1500.00 |
| 07. | Centrifuge Tubes Borosilicate Glass 15 ml | 50 | 900.00 |
| 08 . | Counting Chamber Improved Neuber Ruling with a pair of cover slip Brightline Robem Make | 01 | 700.00 |
| | Total Amount- | | 297305.00 |

**ब) कर्मचारी -**

१) स्त्रीरोग तज्ञ - १ उपलब्ध असलेले डॉक्टर्स
२) पॅथोलॉजिस्ट - १ हे काम पाहतील
३) प्रयोगशाळा तंत्रज्ञ - १ नवीन नियुक्त करावे
४) मदतनीस - १ लागतील

एक तंत्रज्ञ व एक मदतनीस या दोन कर्मचाऱ्यांचे पगारावर होणारा एका वर्षातील अंदाजे खर्च - रु.१,६८,६६२/-

**क)** सदर सुविधा चालू करण्यासाठी संस्थानचे नियोजित सुपर स्पेशालिटी रुग्णालयातील १०x१० इतक्या आकाराच्या ०२ खोल्या वापरता येतील. त्यातील एक रुमसाठी अे.सी. बसवावा लागेल त्यासाठी अंदाजे खर्च रुपये ५०,०००/- येईल.

तरी सदरची सुविधा चालू करण्यास व वरीलप्रमाणे याकामी येणाऱ्या एकूण अंदाजे रक्कम रुपये ५,१५,९६७/- चे खर्चास मंजूरी देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये/वैद्यकीय अधिक्षीका रुग्णालय)

**विषय नं.२२. श्री संजय सर्जेराव कवडे, रा.भेर्डापूर यांचे वैद्यकीय आर्थिक अनुदान अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.२६६.** श्री संजय सर्जेराव कवडे, रा.भेर्डापूर यांनी त्यांचा मुलगा चि.राहूल याचे वैद्यकीय उपचाराकरीता संस्थानकडे वैद्यकीय आर्थिक अनुदान मिळणेबाबत अर्ज केलेला आहे.

चि.राहूल हा शेतामध्ये पाईपलाईनचे काम करीत असतांना रॉकेलच्या टेंभ्याने भाजलेला आहे. त्याचेवर मसीना हॉस्पिटल, मुंबई या खाजगी रुग्णालयात उपचार चालू असून त्याकरीता रुपये २ लाख खर्च असल्याचे प्रमाणपत्र सदर रुग्णालयाने दिलेले आहे.

संस्थानचे वैद्यकीय आर्थिक अनुदान नियमावलीनुसार चि.राहूल याचे वैद्यकीय उपचाराकरीता अनुदान देता येत नाही. तसेच खाजगी रुग्णालयाचे नांवे अनुदान देण्यात येत नाही.

तथापि, श्री कवडे यांना अनुदान देणेकामी मा.खासदार श्री.बाळासाहेब विखे पाटील यांनी शिफारस पत्र दिलेले असून मा.अध्यक्ष महोदय यांनी सदरचे प्रकरण व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवणेबाबत दूरध्वनीव्दारे कळविलेले होते. त्यानुसार दिनांक १०.०६.२००५ रोजी रुग्णालयामार्फत टिपणी सादर केली असता सदर रुग्णास तातडीने रुपये २०,०००/- देऊन मा.व्यवस्थापन समितीची कार्योत्तर मंजूरी घ्यावी असे आदेश दिलेले होते.

सदरहू आदेशानुसार चि.राहूल यांचे वैद्यकीय उपचाराकरीता रुपये २०,०००/- चेक नं. ०४८५८८ दिनांक ११.०६.२००५ अन्वये मसीना हॉस्पिटल, मुंबई यांचेकडे दिनांक ११.०६.२००५ रोजी पाठविण्यात आला असून सदरहू खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय)

**विषय नं.२३. श्रीसाईलीला व्दैमासिकाचे स्वरुपाबाबत.**

**निर्णय क्र.२६७.** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे वतीने श्री साईलीला नियतकालीक हे प्रसिद्ध करण्यात येते. श्रीसाईलीला नियतकालीकाच्या मराठी व हिंदी/इंग्रजी अशा दोन आवृत्त्या काढण्यात येतात. हे नियतकालीक दर दोन महिन्यांनी प्रसिद्ध करण्यात येते. श्री साईलीला नियतकालीकाचा दसरा विशेषांक हा जादा अंक दर वर्षी प्रसिद्ध केला जातो. सध्याच्या साईलीला नियतकालीकाचे स्वरुप खालील प्रमाणे...

अ) श्री साईलीला अंक मराठी - ४० पेजेस + ४ कव्हर= ४४ पेजेस छपाई दर रू. ०६.२५ पैसे

ब) दसरा विशेषांक-मराठी - ८० पेजेस + ४ कव्हर= ८४ पेजेस छपाई दर रू.१०.८० पैसे

क) श्री साईलीला अंक हिंदी/इंग्रजी -४० पेजेस + ४ कव्हर= ४४ पेजेस छपाई दर रू. ०६.२२ पैसे

१) श्री साईलीला अंक-मराठी,इंग्रजी/हिंदी व श्री साईलीला दसरा विशेषांक-मराठी वर्गणी रु. ५०.००

२) श्री साईलीला अंक-मराठी व इंग्रजी/हिंदी अंकाची साईज- ८.२५'' X १०.७५''

३) श्री साईलीला अंक-मराठी व इंग्रजी/हिंदी अंकाचे वजन १०० ग्रॅम.व त्यासाठी पोस्टेज खर्च रू. २.००

४) श्री साईलीला दसरा विशेषांक-मराठी वजन अंदाजे १८० ग्रॅम. व त्यासाठी पोस्टेज खर्च अंदाजे रू. ३.००

५) श्री साईलीला अंक-मराठी व इंग्रजी/हिंदी अंक प्रति अंक विक्रीची किंमत रूपये ८.००

६) श्री साईलीला दसरा विशेषांक-मराठी विक्रीची किंमत रूपये १५.००

अ) श्री साईलीला अंक -मराठी ( ब ) दसरा विशेषांक-मराठी

वार्षिक सदस्य संख्या- ५,३६०

आजीवन सदस्य संख्या - १,५४२

परदेशस्त सदस्य संख्या - ०२

एकूण सदस्य संख्या - ६,९०४

सद्याची छपाई संख्या- ७,५००

**क) श्री साईलीला अंक ( इंग्रजी-हिंदी)**

वार्षिक सदस्य संख्या- ६,२५६

आजीवन सदस्य संख्या - २,९५८

परदेशस्त सदस्य संख्या - ५३

एकूण सदस्य संख्या - ९,२६७

सद्याची छपाई संख्या- १०,०४०

याप्रमाणे श्री साईलीला मराठी- हिंदी/इंग्रजी अंक व दसरा विशेषांक-मराठी छपाईची कामे करून घेतली जात आहेत.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीचे श्री साईलीला हे नियतकालीक असल्याने ते अत्यंत आकर्षक स्वरुपात त्याचप्रमाणे त्यात प्रसिद्ध होणारा मजकूर उच्च दर्जाचा असावा ह्या करीता साईभक्त श्री.टी.पी.पांडे डायरेक्टर, मे.मेग्ना ग्रॉफिक्स (इंडिया)लि.,मुंबई यांनी मौल्यवान सूचना त्यांचे दि.२७ मे,२००५ चे पत्राने संस्थानला लेखी कळविलेल्या आहेत. त्यात त्यांनी ते मासिक छपाई व

प्रकाशनाच्या क्षेत्रात गेल्या ३५ वर्षापासून काम करीत आहेत. आणि नियमितपणे आंतरराष्ट्रीय दर्जाची ओळखली जाणारी सोसायटी,सॅव्ही,स्टारडस्ट,इंटेरियर, सिटाडेल, हेल्थ,शोटाईम यांसारख्या मासिकांची ते छपाई करीत आहेत.

त्यांनी श्री साईलीला नियतकालीकाची प्रतवारी उंचविणेसाठी खालील प्रमाणे प्रस्ताव दिलेला आहे.

अ) मे मेग्ना ग्रॅफिक्स (इंडिया)लि.,मुंबई कडून संपादकीय संदर्भात मोफत सल्ला दिला जाईल.

ब) नियतकालीकाचा ले आऊट व डिझाईन मोफत करुन दिली जाईल.

क) मे मेग्ना ग्रॅफिक्स (इंडिया)लि.,मुंबई यांना साईलीला नियतकालीकाची छपाई दिल्यास ती ना नफा ना तोटा तत्वावर करण्यात येईल.

**श्री साईलीला नियतकालीका संबंधित त्यांनी काही बदलही सुचविलेले आहेत.**

**१) संपादकीय दृष्टिकोण**:-सध्याच्या नियतकालीकामध्ये स्पष्ट विचार अगर कल्पना दिसून येत नाही. ते पूर्णपणे दिशाहिन व संदिग्ध स्वरुपाचे आहे. प्रत्यक्षात ते साधकबाधक विचार मांडणारे, वाचण्यास सुलभ,विविध माहिती देणारे आणि धार्मिक स्वरुपाचे असावे. वाचक अगर भक्त यांना ते मनोरंजक वाटावे त्यातील काही विचारांचा त्यांनी त्यांच्या स्वत:च्या धार्मिक उन्नतीकरता उपयोग करुन घेण्यास हवा.

**२) लेआऊट आणि डिझाईन:-** मे मेग्ना ग्रॅफिक्स (इंडिया)लि.,मुंबई कडील आर्ट डायरेक्टर, व्हिजीयूलायझर,आर्टिस्ट ही टीम आंतरराष्ट्रीय दृष्टिकोण असलेली नियतकालीकाची पाने कव्हरसह व्यवस्थित डिझाईन करुन चांगल्या कलरमध्ये ते बदलू शकतात.

**३) नियतकालीकाची पाने ३२+कव्हर असे असावे.**

**४) कागद :-** श्री साईलीला नियतकालीकासाठी उत्तम दर्जाचा कागद वापरणे आवश्यक आहे.यासाठी नियतकालीकाच्या कव्हर करीता २५० जीएसएम लाइकेम आर्ट कार्ड पेपर व आतील पानाकरीता १०० जीएसएम लाइकेम आर्ट पेपर त्यांनी सुचविलेला आहे. सध्या कव्हरसाठी ९० जीएसएम व आतील पाना करता ६० जीएसएम कागद वापरला जातो. तो अत्यंत कमी दर्जाचा आहे असे त्यांचे म्हणणे आहे.

**५) मासिकाचा आकार :-** नियतकालीकाची साईज -८.००''x १०.५'' ही साईज अत्यंत योग्य आहे.

**६) नियतकालीच्या आवृत्त्या बाबत:-** श्री साईलीला नियतकालीक हिंदी/इंग्रजी व मराठी अशा स्वतंत्र आवृत्त्या सुरुवातीला काढण्यात याव्यात त्यानंतर तेलगू वगैरे इतर प्रांतिक भाषेत नियतकालीक काढण्याचा प्रयत्न करावा.सध्या काढण्यात येणाऱ्या हिंदी/इंग्रजी एकत्रित आवृत्तीमुळे संभ्रम निर्माण होतो.

**७) काल मर्यादा:-** श्री साईलीला नियतकालीक हे द्वैमासिक ऐवजी प्रत्येक महिन्यात प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्वात जास्त फायदा पोस्टाने पाठविलेले अंक हे अगदी कमी दराने पाठविणे शक्य होईल.

**८) कव्हरची किंमत :-** श्री साईलीला नियतकालीकाच्या निर्मितीची किंमत वाढणार आहे मात्र त्याचे स्वरुप अत्यंत आकर्षक असल्यामुळे ही वाढ अपेक्षित आहे. असे सर्वांग सुंदर नियतकालीकासाठी रु.२०/- प्रती नग भक्तांना देण्यास काहीच वाटणार नाही.

**९) छपाई संख्या :-** अशा प्रकारचे सर्वांग सुंदर असे नियतकालीक आपण उपलब्ध करुन देतांना हिंदी नियतकालीकाच्या २०,०००प्रती, इंग्रजी नियतकालकाच्या १५,००० प्रती व मराठी नियतकालीकाच्या १०,००० प्रती छापून घेणेस हरकत नाही.

**१०) अंकाची छपाई किंमत :-**

अ) २०,००० प्रती छपाई करीता प्रती नग दर रु.१४.०० मात्र

ब) १५,००० प्रती छपाई करीता प्रती नग दर रु.१५.०० मात्र

क) १०,००० प्रती छपाई करीता प्रती नग दर रु.१६.५० मात्र असा अंदाजित खर्च येऊ शकेल.

**११) प्रचार व प्रसार** :- नियतकालीकाच्या वर्गणीदारांची सभासद संख्या वाढविण्याकरीता नियतकालीकाचे होर्डींग्ज, पोस्टर्स तयार करुन जास्तीत जास्त ठिकाणी लावणे आवश्यक आहे. नियतकालीकाच्या विक्रीसाठी बुक स्टॉलची संख्या ही वाढविणे आवश्यक आहे.

**१२) जाहिरातद्वारा फंड उपलब्ध करणे :-** नियतकालीकातून जाहिराती प्रसिद्ध करुन पैसा उपलब्ध करण्यास काहीच हरकत नाही. जाहिरातीत प्रामुख्याने स्थानिक हॉटेल्स,प्रवासी कंपन्या, म्युझिक कंपन्या (भजने व भावगीते), धार्मिक पुस्तके प्रसिद्ध करणाऱ्या कंपन्या यांचा समावेश असावा.यातून फंड तर गोळा होईलच तसेच नियतकालीका संबंधी वाचक आणि भक्त यांना माहितीही मिळेल.

सन.२००४-२००५ या साईलीला नियतकालीक अंक छपाई वर्षाची मुदत जून २००५ अखेर संपत असून सन २००५-२००६ करीता छपाई कोटेशन्स बोलविणे त्यावर निर्णय घेणे आवश्यक आहे. श्री.टी.पी.पांडे डायरेक्टर, मे मेग्ना ग्रॉफिक्स (इंडिया)लि.,मुंबई यांनी केलेल्या सुचनांवर विचार विनिमय होणे आवश्यक आहे. त्यांच्या सुचनेप्रमाणे प्रामुख्याने हिंदी व इंग्रजी असे स्वतंत्र अंक प्रसिद्ध करावयाचे किंवा कसे हे ठरवावे लागेल ?

सध्या असलेले साईलीला नियतकालीक द्वैमासिक हे प्रत्येक महिन्यास छापून प्रसिद्ध करावयाचे किंवा कसे ते ठरवावे लागेल ?

सध्या साईलीला नियतकालीकाची असलेली वर्गणी,तहहयात सदस्य वर्गणी व परदेशी सदस्य वर्गणी ह्या मध्ये वाढ करावी लागेल याचाही निर्णय होणे आवश्यक आहे ?

नियतकालीकाचे वजनात होणारी संभाव्य वाढ लक्षात घेता पोस्टाने अंक पाठविणेकामी जास्त खर्च येणार आहे त्याचाही निर्णय घ्यावा लागेल ?

उपरोक्तबाबी संबंधी धोरणात्मक निर्णय व्यवस्थापन समितीने घेतल्यास श्री पांडे यांचे मार्गदर्शनाखाली छपाई कोटेशन तयार करुन व छपाई कोटेशन्स मागवून व्यवस्थापन समितीपुढे निर्णयासाठी ठेवता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

आजचे सभेत श्री टी.पी.पांडे, डायरेक्टर, मे. मेग्ना ग्राफिक्स ( इंडिया ) लि, मुंबई हे उपस्थित होते. त्यांनी तयार केलेल्या श्रीसाईलीला मासिक, दिनदर्शिका व दैनंदिनीचे नमुने सभेस दाखविले, त्यांनी तयार केलेले श्रीसाईलीला मासिक, दिनदर्शिका व दैनंदिनीचे नमुने उपस्थित मा. सदस्यांना पसंत पडले. श्री पांडे यांनी तयार केलेल्या नमुन्याप्रमाणे येथूनपुढे श्रीसाईलीला मासिक, दिनदर्शिका व दैनंदिनीची कोटेशन्स मागवून छपाई करुन घेण्यात यावी असे ठरले.

सध्या असलेले श्रीसाईलीला द्वैमासिकाचे दर हे कमी आहेत. परंतू, श्री.पांडे यांनी दाखविलेल्या नमुन्याप्रमाणे छपाई केल्यास श्रीसाईलीला व्दैमासिकाचे दर वाढवावे लागतील परंतू श्रीसाईलीला द्वैमासिकाचे प्रथम अंकास मिळणारा भक्तांचा प्रतिसाद पाहून दुसऱ्या अंकाची किंमत वाढविणेबाबत निर्णय घ्यावा असें ठरलें. सुरुवातीस प्रायोगिक तत्वावर श्रीसाईलीला मराठी व हिंदी-इंग्रजी अंकाच्या प्रतीमाह अंदाजे प्रत्येकी १५ हजार प्रती व मराठी व हिंदी-इंग्रजी विशेषांकाच्या अंदाजे प्रत्येकी १५ हजार प्रती छपाईकामी कोटेशन्स मागविण्यात यावीत, असें ठरलें. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.२४. श्री साई सच्चरित्र सार (हिंदी दोहावली) प्रकाशित करणेबाबत.**

**निर्णय क्र.२६८.** शिवनारायण टुवानी इंदौर यांनी दि.१६.०५.२००५ रोजीचे पत्राने श्री साई सच्चरित्र सार (हिन्दी दोहावली) या पुस्तकाचे हिंदी माध्यमातून पद्यात रुपांतर केले आहे. त्यांनी श्री गोविंदराव रघुनाथ दाभोलकर (हेमाडपंत) द्वारा रचित श्री साई सच्चरित्राचे शिवराम ठाकूर यांनी हिंदीत केलेल्या अनुवादाचे पद्यात रुपांतर करुन सदर पुस्तकाची रचना केली असल्याचे कळविले आहे. सदर काव्यात्मक श्री साई सच्चरित्र सार ह्या पुस्तकात ५१ अध्याय आहेत सदर पुस्तकातील काव्यात हिंदीतील लोकप्रिय छंदातून रचना केली असल्याचे सुचित केले आहे.श्री.शिवनारायण टुवानी यांनी त्यांचे व्दारा लिखित श्री साई सच्चरित्र सार (हिन्दी दोहावली) पुस्तकाचे संस्थानद्वारा खालीलप्रमाणे भक्तांसाठी हेतू साध्य होणेकामी प्रकाशित करणेबाबत इच्छा प्रकट केली आहे.

१) सामुदायिक पारायणासाठी भक्तांना चांगल्या प्रकारे उपयोग होऊ शकेल.

२) उपरोक्त पुस्तकातील काव्यांच्या सी.डी. तयार केल्यास त्याचा पुस्तक वाचण्याबरोबरच ऐकण्याचाही लाभ होऊ शकेल.

३) सदर पुस्तकातील हिंदी दोह्यांचे चित्रिकरण करुन ते भक्तांना दर्शनासाठी असलेल्या प्रतिक्षा हॉलमध्ये उपलब्ध करुन दिल्यास त्याचा भक्तांना वाचण्यासाठी उपयोग होवून भक्तांना आनंद होईल.

वरील प्रमाणे दर्शविलेले उद्देश श्री साई सच्चरित्र सार (हिन्दी दोहावली) पुस्तक संस्थानद्वारा प्रकाशित केल्यास सिद्ध होऊ शकतील.श्री साई सच्चरित्र सार (हिन्दी दोहावली) ह्या पुस्तकाचे पत्रासोबत संगणकीय प्रतीत दोहा क्र.१ ते २६७१ हे हिंदी आरतीसह सादर केले आहेत. सदर पुस्तक संस्थानद्वारा प्रकाशित करणेबाबत श्री.एस.के.भोजने अध्यक्ष, अध्यात्म+आरोग्य संस्थान, इन्दौर यांनी त्यांचे दि.०५.०५.२००५ चे पत्राद्वारे शिफारस केलेली आहे.

श्री साई सच्चरित्र सार (हिन्दी दोहावली) ह्या पुस्तकाचे प्रकाशन करणेबाबत संबंधित विशेषज्ञ साईभक्त डॉ. पद्मा सिंह, अध्यक्ष, हिन्दी अध्ययन परिषद,हिन्दी विभाग एवं शोध निदेशक तसेच डॉ.स्वाती तिवारी अध्यक्ष, लेखिका संघ, इंदौर यांचे शिफारस पत्रासह कळविले आहे. शिफारस पत्रांमध्ये श्री

साई सच्चरित्र सार (हिन्दी दोहावली) या पुस्तकात खालील बाबी समाविष्ट असलेबाबत सुचित केले आहे.

१) श्री साईबाबांची लीला, चैतन्यशक्ती तसेच अमुल्य उपदेशाचे वर्णन या पुस्तकातील काव्याद्वारा प्रकट केले आहे.

२) सदर पुस्तकाचे श्री गोविंदराव रघुनाथ दाभोलकर (हेमाडपंत) द्वारा रचित श्री साई सच्चरित्राचे शिवराम ठाकूर यांनी हिंदीत केलेल्या अनुवादाचे आधारे पद्यात रुपांतर करुन सदर पुस्तकाची रचना केली असल्याचे कळविले आहे.

३) सदर ग्रंथ प्रकाशित झाल्यास त्याचा भक्तांना चांगला उपयोग होईल.

४) सदर पुस्तकात हिंदीतील सर्व प्रकारच्या छंदांचा उपयोग केला असून, उपमा व अलंकार यांचा सुंदर प्रयोग केला आहे.

वरील पुस्तकाचे प्रकाशनाचे सर्व हक्क त्यांनी संस्थानला देण्याची तयारी दर्शविली आहे.

सध्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था ,शिर्डी द्वारा १) श्री साई सच्चरित्र २)श्री साईलीला अमृत ३) श्री साईनाथ सगुणोपासना आरती ४) श्री साई सगुणोपासना मराठी आरतीचा हिंदी अनुवाद ५) श्री साईनाथ स्तवन मंजरी ६) साईनाथ भजनमाला ७) मुलांचे साईबाबा ८) खापर्डे डायरी इत्यादी हिंदी भाषेतील पुस्तके प्रकाशित झाले असून भक्तांना विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

शिवनारायण टुवानी इंदौर लिखित श्री साई सच्चरित्र सार (हिंन्दी दोहावली) हे पुस्तक संस्थानद्वारा प्रकाशित करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, शिवनारायण टुवानी, इंदौर लिखित श्री साई सच्चरित सार (हिन्दी दोहावली ) हे पुस्तक संस्थानतर्फे प्रकाशित करण्यास मान्यता देण्यात आली. मात्र मा.विश्वस्त डॉ.एकनाथ बी.गोंदकर यांचेकडून सदरहू प्रत तपासून घेण्यात यावी, असें ठरले. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.२५. श्रींची आरती व्हीसीडी कोटेशन्सवरील केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२६९.** मा.व्यवस्थापन समितीचे दि.२९.०१.२००५ चे सभेतील विषय नं.१९ व निर्णय क्र.२० तसेच दि. १७.०४.२००५ चे सभेतील विषय नं.१३ निर्णय क्र.१५४ नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत श्री साई मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार व्ही.सी.डी. तयार करुन साईभक्तांना उपलब्ध करुन देणेबाबत मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय झालेला असून, त्यानुसार मुंबई येथील व्ही.सी.डी. तयार करणा-या नामांकित कंपनीकडून १०,००० संच (२ सी.डी.चा एक संच ) तयार करुन घेणेस व त्याकामी प्रती संचास अंदाजे दर रु.४०/- मात्र प्रमाणे खर्च गृहीत धरुन अंदाजे रुपये ४,००,०००/- मात्र चे खर्चास मान्यता देण्यात आली आहे. त्याप्रमाणे जा. न. एसएसएस / वशी / प्रकाशने/५३४६/२००५ दि.२०.०५.२००५ नुसार व्ही.सी.डी तयार करुन घेणेकामी खालील ९ नामांकित सी.डी. निर्मात्यांना कोटेशन पत्र पाठवून ती दि.०८.०६.२००५ अखेर दाखल करण्याविषयी कळविण्यात आले आहे.

| Sr.No | Name & Address |
|---|---|
| 01 | A.C.M.Enterprises, Goregaon (E) Mumbai |
| 02 | San-Van Enterprises, Khar (W) Mumbai |
| 03 | Dolby Music, Mumbai |
| 04 | Krunal Music Company, Mumbai |
| 05 | Sony Music Entertainment (India) Pvt. Ltd. Vikhroli (E) Mumbai |
| 06 | Sagarika Acoustronics Pvt.Ltd, Navi Mumbai |
| 07 | Vandana Electronics, Mumbai |
| 08 | Audio Vision, Mumbai |
| 09 | Mhir Agenceis (P) Ltd.Dahisar (E) Mumbai |

उपरोक्त ९ निर्मात्यांपैकी ६ निर्मात्यांची खालील प्रमाणे सिलबंद कोटेशन प्राप्त झाले आहेत.

| अ.नं | कंपनीचे नांव |
|---|---|
| ०१ | ऑडिओ व्हीजन,मुंबई |
| ०२ | महीर एजन्सी प्रा.लि. ,मुंबई |
| ०३ | सॅन व्हॅन एन्टरप्रॉईझेस ,मुंबई |
| ०४ | वंदना इलेक्ट्रॉनिक्स,मुंबई |
| ०५ | कृणाल म्युझिक कंपनी ,मुंबई<br>**(मुदतीनंतर प्राप्त)** |
| ०६ | सागरीका ॲकोस्ट्रॉनिक्स प्रा.लि. ,मुंबई<br>**(मुदतीनंतर प्राप्त)** |

साईभक्तांना श्री साईबाबा मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार व्ही.सी.डी. श्री गुरूपौर्णिमा उत्सव २००५ या उत्सव कालावधीत उपलब्ध करून देण्याचे प्रयोजन असल्याने वेळेत कार्यवाही होणे गरजेचे असल्याने वरील तपशिलाप्रमाणे दाखल झालेले ६ सिलबंद कोटेशन मा. श्री कॅप्टन वासुदेवा, सदस्य, श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व मा.कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष त्यांचे कक्षात दि.२३.०६.२००५ रोजी उघडण्यात आली आहेत. तत्संबंधित दि.२५.०६.२००५ चा तुलनात्मक तक्त्यातील सॅन व्हॅन एंटरप्राइझेस, मुंबई या सी.डी निर्मात्याचा तुलनात्मक दृष्टया व्ही.सी.डी. तयार करणेकामाचा निम्नतम दर प्रती संचास रू.२३.८७ पैसे असल्याने तसेच ते व्ही.सी.डी तयार करणेकामी पॉलिकॉर्बोनेट ग्रॅनल्स (इम्पॉर्टेड) मटेरियल वापरणार आहेत तरी त्यांचेकडून १०,००० संच व्ही.सी.डी (दोन सी.डी.चा एक संच) तयार करुन घेणेस व त्याकामी येणारे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.२६. श्री साईलीला छपाईबाबत.**

**निर्णय क्र.२७०.** सदरहू विषयाबाबत वर निर्णय क्र.२६८ अन्वये चर्चा झालेली आहे.

**विषय नं.२७. श्री साईबाबांचे जीवनावर आधारित कॉम्पॅक्ट डिस्क बाबत.**

**निर्णय क्र.२७१.** माहिती व तंत्रज्ञान विभाग यांचे दिनांक - ११.०४.२००५ रोजीचे मंजूर प्राप्त प्रस्तावानुसार प्रकाशने विभाग जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/५०८९/२००५दि.१३.०५.२००५ नुसार मे.वंदना इलेक्ट्रॉनिक्स, खार(वेस्ट), मुंबई यांचेकडून श्री साईबाबांच्या जीवनावर आधारित कॉम्पॅक्ट डिस्क (कॉम्प्युटर सी.डी.रोम) १,००० नग दर रू. १४.२५पैसे प्रमाणे तयार करून साईभक्तांना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. श्री साईबाबांच्या जीवनावर आधारित कॉम्पॅक्ट डिस्क विक्रीस साईभक्तांकडून चांगला प्रतिसाद मिळत असून, भरपूर प्रमाणात मागणी आहे. तथापि, सी.डी. रोमचा साठा हा एक महिना पुरेल एवढाच अल्पप्रमाणात शिल्लक असल्याने साईभक्तांना कॉम्पॅक्ट डिस्क उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याने खालील नामांकित सी.डी. निर्मात्यांकडून कोटेशन्स मागवून ५,००० सीडीज् तयार करून घेणे गरजेचे आहे.त्यासाठी ५,००० सीडीज् तयार करून घेणेसाठी प्रत्येक नगास अंदाजे दर रू.२०/- प्रमाणे रू.१,००,०००/- मात्र एकूण खर्च अपेक्षित आहे.

| Sr.No | Name & Address |
|---|---|
| 01 | A.C.M.Enterprises, Goregaon (E) Mumbai |
| 02 | San-Van Enterprises, Khar (W) Mumbai |
| 03 | Dolby Music, Mumbai |
| 04 | Krunal Music Company, Mumbai |
| 05 | Sony Music Entertainment (India) Pvt. Ltd. Vikhroli (E) Mumbai |
| 06 | Sagarika Acoustronics Pvt.Ltd, Navi Mumbai |
| 07 | Vandana Electronics, Mumbai |
| 08 | Audio Vision, Mumbai |
| 09 | Mhir Agenceis (P) Ltd.Dahisar (E) Mumbai |
| 10 | Sunrise Industries,Mumbai |
| 11 | S.S. Enterprises,Wadala- ( W ) Mumbai |

वरील नामांकित सी.डी. निर्मात्यांकडून ५,००० कॉम्पॅक्ट डिस्क (कॉम्प्युटर सी.डी.रोम) तयार करणेकामीचे कोटेशन्स मागविणेस व त्याकामी येणारे अंदाजे रू.१,००,०००/- (अक्षरी रूपये एक लाख) मात्र चे एकूण अपेक्षित खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

याचवेळी येथूनपुढे संस्थानमार्फत तयार करणेत येणाऱ्या सी.डी. व कॅसेटचा एक संच सर्व मा.विश्वस्तांना भेट म्हणून देण्यात यावा असें ठरले. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.२८. श्री साईसतचरित्र मराठी जादा छपाई कामाची रक्कम आदा करणेबाबत.**

**निर्णय क्र.२७२.** अजय ऑफसेट प्रा.लि.,पुणे यांना व्यवस्थापन मंडळाचे दि.२९-३०/०५/२००४ चे सभेतील विषय नं.४३ निर्णय २५१ नुसार जा.नं.एसएसएस/प्रकाशने/६०८९/२००४ दि.१६.०६.२००४ अन्वये श्री साईसच्चरित -मराठी २५,००० नग छपाई दर रुपये ५५.०० पैसे प्रमाणे निम्नतम दराने छपाई कामाचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.त्यानुसार त्यांनी छपाई कामाची पूर्तता पूर्ण केली आहे.

अजय ऑफसेट प्रा.लि.,पुणे यांनी श्री साईसच्चरित -मराठी २५,००० नग छपाईचे व्यतिरिक्त २,५६८ नगांची जादा छपाई करुन श्री साईसच्चरित -मराठीच्या जादा प्रती भांडार विभागात जमा केल्या आहेत. साईमंदिरामधून श्री साईसच्चरित -मराठीची मोठ्या प्रमाणावर मागणी आहे.मध्यंतरीच्या काळात मंदिरांचे मागणीमुळे मराठी चरित्र विक्रीस उपलब्ध नव्हते. त्यामुळे ग्रंथाची मागणी विचारात घेता जादा छपाई झालेल्या प्रतींची आवश्यकता असल्याने त्या स्वीकारण्यात आल्या आहेत.तसेच मराठी

साईसच्चरित्राची मागणीही भरपूर प्रमाणात असल्याने साईसच्चरित-मराठी विक्री करुन रक्कम वसूल होणार आहे. तरी अजय ऑफसेट प्रा.लि.,पुणे यांचे श्रीसाईसच्चरित-मराठी छपाई कामाचे दाखल झालेले व्हॅट बिल नं.७०/एलबीआर दि०६. ०६.२००५ मध्ये नमूद केलेप्रमाणे २,५६८ जादा नग छपाई दर प्रत्येकी रुपये ५५.०० पैसे प्रमाणे रुपये १,४१,२४०/- मात्र अदा करणे आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे जादा २,५६८ नगांची एकूण छपाईची रक्कम रुपये १,४१,२४०/- (अक्षरी रुपये एक लाख एक्केचाळीस हजार दोनशे चाळीस) मात्र रक्कम मंजूर होऊन संबंधित छपाई धारक अजय ऑफसेट प्रा.लि.पुणे यांना अदा करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख )

**विषय नं.२९. सन २००५-२००६ प्रसादालय किराणा माल खरेदीकामी निवडलेल्या नमुनासादरकर्त्यांसमवेत चर्चा/वाटाघाटी करुन खरेदीबाबत निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.२७३.** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २९.०१.२००५ चे सभेतील निर्णय क्र.१६ नुसार सन २००५-२००६ सालामध्ये प्रसादालय व कॅंटीनसाठी आवश्यक किराणा माल खरेदीकामी मागविण्यात आलेल्या निविदांचा लिफाफा क्र.०२ मा.स्थानिक विश्वस्त सभा दिनांक १६.०४.२००५ मध्ये उघडण्यात आलेला होता. त्यामध्ये खालील निविदांसोबत निविदातील शर्ती व अटींनुसार बयाणा रकमेचा डी.डी.अथवा लेखाशाखा पावती जोडलेली नव्हती.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव |
|---|---|
| ०१. | मे.श्रीरामपूर दूध जिल्हा मध्यवर्ती सह.संघ, बाभळेश्वर |
| ०२. | मे.जयकर छोटाझ, गुजरात |
| ०३. | शलाका ॲग्रो फूडस प्रॉडक्टस प्रा.लि.अहमदनगर |
| ०४. | औरंगाबाद जिल्हा सहकारी दूध संघ मर्या. औरंगाबाद |
| ०५. | वज्रेश्वरी डेअरी प्रॉ.प्रा.लि.सोमठाणे |
| ०६. | मार्केट मेकर्स,पुणे |

त्यानंतर मा.व्यवस्थापन समिती सभा दिनांक ०८.०५.२००५ मध्ये तांदूळा व्यतिरिक्त उर्वरित किराणा व इतर मालांचे स्वीकारार्ह नमूने निवडून बाजूला ठेवण्यात आलेले आहेत. तसेच सदर सभेमध्ये लिफाफा क्र.०१ उघडणेत आलेला आहे. लिफाफा क्र.०१ उघडलेनंतर मूळ निविदेसोबत वरील क्र.०३ ते ०६ यांची बयाणा रकमेची पावती/डी.डी. आढळून आलेले आहेत. त्यामुळे वरीलपैकी क्र.०१ चे मे.श्रीरामपूर दूध जिल्हा मध्य.सह.संघ.बाभळेश्वर व क्र.०२ चे जयकर छोटाझ, गुजरात यांनी बयाणा रक्कम भरलेली नसल्याने त्यांचे निविदेचा विचार केलेला नाही.

प्रत्येक मालाचे निवडलेल्या नमुन्यासाठी संबंधित निविदाधारकांनी दिलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता परिशिष्ट "अ" म्हणून व प्रत्येक निविदाधारकाच्या निवडलेल्या एकूण नमून्यांचा एकत्रित तक्ता परिशिष्ट "ब" म्हणून आजचे सभेत सादर करण्यात आलेला होता. तसेच संबंधित निविदाधारकांनी चर्चा तथा वाटाघाटीअंती निर्णय घेणेकामी सदर सभेमध्ये आमंत्रित करण्यात आलेले होते. त्यानुसार संबंधित निविदाधारकांना मा.व्यवस्थापन समिती सभेसमोर एकत्रित पाचारण करण्यात येऊन त्यांनी दिलेल्या नमुन्यांपैकी प्रत्येकी निवडून बाजूला ठेवलेल्या नमुन्यांची यादी वाचून दाखविण्यात आली. त्यानंतर त्यांनी निविदेमध्ये दिलेल्या दरामध्ये काही सूट द्यावयाची अथवा बदल करावयाचा असल्यास तसे लेखी पत्र देणेबाबत सांगणेत आले.

उपरोक्त सुधारित दरपत्रकाचे पाकिटे उघडून कागदपत्रांची छाननी करुन निम्नतम दराने खरेदी करण्याचे अधिकार मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग, मा. श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे, मा. डॉ. एकनाथ भागचंद गोंदकर यांना प्रदान करण्यात आले.

( कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग)

**विषय नं.३०. सन २००५-२००६ प्रसादालयासाठी बासमती तांदूळ खरेदीबाबत निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.२७४.** व्यवस्थापन समितीचे दिनांक २९.०१.२००५ चे सभेतील निर्णय क्र.१६ अनुसार सन २००५-०६ करिता प्रसादालय कॅन्टीन साठी आवश्यक किराणा व इतर माल खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहीरात देऊन निविदा मागणी करण्यात आलेल्या होत्या. त्यानंतर व्यवस्थापन समितीचे दिनांक १३.०३.२००५ चे सभेत निविदेतील लिफाफा क्र.०२ उघडण्यात आला होता. तसेच व्यवस्थापन समितीचे दिनांक ८.०५.२००५ चे सभेत निविदासोबतचे स्वीकारार्ह मालाचे नमूने मा.सदस्यांनी निवडून बाजूला ठेवलेले आहेत. त्याचवेळी श्रीसाईभक्तांना प्रसाद भोजनात बासमती सुंगधी तांदळाचा भात द्यावा असा निर्णय झाल्याने दिनांक २०-२२.०५.२००५ चे दरम्यान वर्तमानपत्रात जाहीरात देऊन रजिस्टर्ड ब्रॅण्डेड कंपन्यांचा आख्खा/तुकडा बासमती तांदूळ ५००० क्विंटल पुरविणेकामी दिनांक ३१.०५.२००५ अखेर नमूने व बयाणा रकमेसह निविदा मागविण्यात आलेल्या होत्या.

त्यानुसार खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव |
|---|---|
| ०१ | मे.सुपेकर प्रोव्हीजन स्टोअर्स, अहमदनगर |
| ०२ | मे.केदारनाथ लालचंद तापडीया,संगमनेर |

| | |
|---|---|
| ०३ | मे.वर्धमान ॲग्रो प्रॉडक्ट्स प्रा.लि.,धुळे |
| ०४ | मे.धनेश ट्रेडिंग कंपनी,अहमदनगर |
| ०५ | मे.सप्तश्रृंगी सप्लायर्स, नाशिक |
| ०६ | मे.वर्धमान ॲग्रो प्रॉडक्टस् प्रा.लि.,धुळे |
| ०७ | मे.जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिकरोड |
| ०८ | मे.गणेश एजन्सीज, वैजापूर |
| ०९ | मे.जयंत ट्रेडिंग कंपनी,जळगाव |
| १० | मे.संतोष ट्रेडिंग कंपनी,जळगाव |
| ११ | मे.गजाजन ट्रेडिंग कंपनी,नाशिक |
| १२ | मे.सोनम ट्रेडर्स, भिवंडी,जिल्हा ठाणे |
| १३ | मे.एम.एस.धनराज छगनलाल ॲण्ड कंपनी,वाशी |
| १४ | मे.खटोड ट्रेडिंग कंपनी,अहमदनगर (मुदतीनंतर प्राप्त झाले) |
| १५ | मे.कोचर ब्रदर्स, अमृतसर (पंजाब) |

प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत उघडण्यात येऊन, निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते.

उपस्थित सर्व निविदाधारकांना सभागृहात एकत्रित बोलावून त्यांनी देऊ केलेल्या दरामध्ये काही सूट देणार किंवा कसे याबाबत सुधारित दर बंद पाकिटात देणेबाबत सांगणेत आले.

उपरोक्त सुधारित दरपत्रकाचे पाकिटे उघडून कागदपत्रांची छाननी करुन निम्नतम दराने खरेदी करण्याचे अधिकार मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग, मा. श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे, मा. डॉ. एकनाथ भागचंद गोंदकर यांना प्रदान करण्यात आले.

( कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग)

**विषय नं.३१. सन २००५-२००६ विद्युत, पाणीपुरवठा, स्वच्छता, बगीचा व कार्यालयीन स्टेशनरी खरेदीकामी निविदासादरकर्त्यांसमवेत चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.२७५.** व्यवस्थापन समितीचे दिनांक १३.०३.२००५ चे सभेतील निर्णय क्र.११६ नुसार सन २००५-०६ करिता कार्यालयीन जनरल व संगणक स्टेशनरी, स्वच्छता व बगीचा साहित्य, विद्यूत व पाणीपुरवठा साहित्य वार्षिक खरेदीसाठी मान्यता मिळालेली आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.नं. | तपशील | अंदाजे रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१ | कार्यालयीन जनरल व संगणक स्टेशनरी | ९,४१,२१५/- |
| ०२ | स्वच्छता व बगीचा साहित्य | ५,०३,५४५/- |
| ०३ | विद्युत व पाणीपुरवठा साहित्य | २२,५०,६६७/- |

वरीलप्रमाणे मान्यतेनुसार मागविण्यात आलेल्या निविदांमधील कागदपत्रांचा लिफाफा व्यवस्थापन समितीचे दिनांक ३.०५.२००५ चे सभेत उघडण्यात आलेला असून, मूळ निविदांचा लिफाफा व्यवस्थापन समितीचे दिनांक ८.०५.२००५ चे सभेत उघडण्यात आलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

**<u>कार्यालयीन व संगणक स्टेशनरी साहित्य</u>**

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| १ | ज्योती बुक सेलर्स ॲण्ड सप्लायर्स,नाशिक |
| २ | तुळजा पेपर सप्लायर्स,कोपरगांव |
| ३ | यशोदा एंटरप्राईजेस,कोपरगांव |
| ४ | श्रृति शिप सप्लाय प्रा,लि,मुंबई |
| ५ | गेस्टेटनर (इंडिया) लिमिटेड,पुणे |
| ६ | मायक्रोमेडिया सिस्टीम्स,अहमदनगर |
| ७ | सखी इंडस्टीज लिमीटेड,पुणे |
| ८ | श्रीनाथ जनरल स्टोअर्स ,अहमदनगर |
| ९ | एशियन सेल्स कार्पोरेशन,नाशिंक |
| १० | अमृत डिस्ट्रीब्युटर्स,अहमदनगर |
| ११ | स्वदर्शन इलेक्ट्रिकल्स,नाशिक |
| १२ | प्राज कॉम्प्युटर्स,राहुरी |

| | |
|---|---|
| १३ | प्रविण एजन्सीज,नाशिक |
| १४ | आशा एजन्सीज,कोपरगांव |
| १५ | कंम्प्युलिंक्स,मुंबई |
| १६ | माटेल सेल्स कार्पोरेशन,मुंबई |

**स्वच्छता व बगीचा साहित्य खरेदी**

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| १ | पूजा सुपारी ॲण्ड जनरल स्टोअर्स,श्रीरामपूर |
| २ | साई राज,ठाणे |
| ३ | भानुशाली एंटरप्रायजेस,मुंबई |
| ४ | परफेंक्ट लॅबोरेटरीज,सोलापूर |
| ५ | यशोदा एंटरप्रायजेस, कोंपरगांव |
| ६ | साई प्रॉडक्टस,राजगुरुनगर,पुणे |
| ७ | रमण ॲण्ड वेल प्रा.लि.,मुंबई |
| ८ | भिंगारवाला एंटरप्रायजेस,अहमदनगर |
| ९ | ग्लोबल एंटरप्रायजेस,नाशिक |
| १० | सौरभ एंटरप्रायजेस,औरंगाबाद |
| ११ | व्हि.जी.प्रॉडक्टस,औरंगाबाद |
| १२ | युनायटेड टेक्नॉलॉजीस्ट,पुणे |
| १३ | निर्मल केमिकल ॲण्ड ट्रेडींग,कोपरगांव |
| १४ | गुरुकेम एंटरप्रायजेस,भेर्डापूर ता.श्रीरामपूर |
| १५ | काशिको ट्रेडींग कंपनी,कोपरगांव |
| १६ | स्पार्क केमिकल्स ॲण्ड सर्व्हिसेस,औरंगाबाद |
| १७ | एशियन सेल्स कार्पोरेशन ,नाशिक |
| १८ | आशा एजन्सीज,कोपरगांव |
| १९ | हनुमान  सोप प्रॉडक्टस,भोकर ता.श्रीरामपूर |
| २० | प्रतिमा मार्केटींग,नाशिकरोड |
| २१ | अटलांटा इंडस्ट्रीअल कार्पोरेशन,डोंबीवली |

**विद्यूत, पाणीपुरवठा साहित्य खरेदी**

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| १ | काशिको ट्रेडींग कंपनी, कोपरगांव |
| २ | आदित्य इलेक्ट्रीकल्स,अहमदनगर |
| ३ | शाह ट्रेडींग कंपनी ,श्रीरामपूर |
| ४ | मयुरेश अकोलकर,नाशिक |
| ५ | आदित्य एंटरप्रायजेस,मुंबई |
| ६ | एशियन सेल्स कार्पोरेशन,नाशिक |
| ७ | स्वदर्शन इलेक्ट्रीकल्स,नाशिक |
| ८ | राहूल इलेक्ट्रीकल्स, अहमदनगर |
| ९ | एम.आर.भिंगारवाला,श्रीरामपूर |
| १० | जाधव इलेक्ट्रीकल्स,नाशिक |
| ११ | नितीन एंटरप्रायजेस,नाशिकरोड |
| १२ | रमेश इलेक्ट्रीक  कार्पोरेशन,मुंबई |
| १३ | पूजा इलेक्ट्रीकल्स,मुंबई |

कार्यालयीन जनरल व संगणक स्टेशनरीकरिता मे.गेस्टेटनर इंडिया लि.,पुणे यांनी बयाणा रक्कम भरलेली नाही. त्यांचेकडील साहित्य कंपनी स्वत: वितरीत करीत असल्याने त्यांचेशी पत्रव्यवहार करुन खरेदी करण्यास मान्यता मिळालेली असल्याने निविदेत गेस्टेटनरचे साहित्य नमूद केलेले नाही.

मात्र त्यांनी नियमानुसार निविदा भरलेली आहे. उर्वरित सर्व निविदासादरकर्त्यांनी निविदेसोबत मागणीप्रमाणे बयाणा रक्कम तसेच कागदपत्रे सादर केलेली असल्याने कोणीही अपात्र नाही.

स्वच्छता विभागासाठी आवश्यक असणारे सेंटेड फिनेल व इतर साहित्यासाठी काही निविदासादरकर्त्यांनी नमूने दिलेले आहेत. तरी सदरील नमूने प्रत्यक्षात वापरुन तसेच यावर स्वच्छता विभाग प्रमुख यांचा अभिप्राय घेऊन न्यूनतम दराने खरेदी करता येतील. तसेच प्रसादालयाकडील डिश वॉशिंग मशिनसाठी आवश्यक लिक्विड सोप ब्रॅण्डेड खरेदी करण्यात यावे. मे.युनायटेड टेक्नॉलॉजी पुणे यांनी (Diversay Lever) व मे.रमन अॅण्ड वेल प्रा.लि.,मुंबई यांनी ब्रॅण्डेड लिक्विड सोपचे नमूने दिलेले असून, त्याचा प्रसादालयामध्ये प्रत्यक्षात वापर करुन पाहिलेला आहे. त्यानुसार दोन्हीही नमूने चांगले आहेत.

उपरोक्तप्रमाणे पात्र असलेल्या निविदासादरकर्त्यांनी दिलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता आजचे सभेत सादर करण्यात येऊन, निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते.

उपस्थित सर्व निविदाधारकांना सभागृहात एकत्रित बोलावून त्यांनी देऊ केलेल्या दरामध्ये काही सूट देणार किंवा कसे याबाबत सुधारित दर बंद पाकिटात देणेबाबत सांगणेत आले.

उपरोक्त सुधारित दरपत्रकाचे पाकिटे उघडून कागदपत्रांची छाननी करुन निम्नतम दराने खरेदी करण्याचे अधिकार मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग, मा. श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे, मा. डॉ. एकनाथ भागचंद गोंदकर यांना प्रदान करण्यात आले.

( कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग)

**विषय नं.३२. सन २००५-२००६ स्टेशनरी छपाईबाबत.**

**निर्णय क्र.२७६.** सन २००५-०६ मध्ये संस्थानचे विविध विभागांसाठी आवश्यक छापील स्टेशनरीकामी विभागांकडून माहिती मागविणेत आलेली होती. त्यानुसार विभागवार छपाई करावयाचे जनरल व प्रि-प्रिंटेड संगणक स्टेशनरीकामी खालीलप्रमाणे खर्च येईल.

| अ.नं. | विभागाचे नाव | जनरल स्टेशनरी छपाई खर्च रुपये | प्रि-प्रिंटेड संगणक स्टेशनरी छपाई खर्च रुपये | एकूण रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१. | प्रशासन शाखा | १,४४,०००/- | २,०४,५००/- | ३,४८,५००/- |
| ०२. | जनसंपर्क कार्यालय | ३,७५०/- | २५,०००/- | २८,७५०/- |
| ०३. | लेखाशाखा | १४,०५०/- | २,७१,०००/- | २,८५,०५०/- |
| ०४. | चौकशी विभाग | २८,७००/- | ८०,०००/- | १,०८,७००/- |
| ०५. | भक्तनिवासस्थान | ४४,७७०/- | ८०,०००/- | १,२४,७७०/- |
| ०६. | धर्मशाळा | ४,०००/- | १५,२००/- | १९,२००/- |
| ०७. | पाणी पुरवठा विभाग | ७५०/- | --- | ७५०/- |
| ०८. | विद्युत विभाग | २३,१७५/- | --- | २३,१७५/- |
| ०९. | ध्वनीक्षेपण विभाग | ७२०/- | --- | ७२०/- |
| १०. | संरक्षण विभाग | १०,९६५/- | --- | १०,९६५/- |
| ११. | खरेदी विभाग | ३,४३५/- | --- | ३,४३५/- |
| १२. | प्रसादालय विभाग | २८,१५०/- | १,००,०००/- | १,२८,१५०/- |
| १३. | कॅन्टीन विभाग | १,७०,२७०/- | ४०,०००/- | २,१०,२७०/- |
| १४. | वाहन विभाग | ३,२२५/- | --- | ३,२२५/- |
| १५. | कन्याशाळा | ७५,३५०/- | --- | ७५,३५०/- |
| १६. | इंग्लिश मिडीयम स्कुल | १४,९२५/- | --- | १४९२५/- |
| १७. | आय.टी.आय. | ६२,०५०/- | --- | ६२,०५०/- |
| १८. | स्वच्छता विभाग | ६००/- | --- | ६००/- |
| १९. | बगीचा विभाग | १,२५०/- | --- | १,२५०/- |
| २०. | रुग्णालय विभाग | २,४५,१८५/- | --- | २,४५,१८५/- |
| २१. | जनरल छपाई | ७१,६००/- | --- | ७१,६००/- |
| | एकूण- | ९,५०,९२०/- | ८,१५,७००/- | १७,६६,६२०/- |

उपरोक्त पैकी प्रशासनासाठी आवश्यक असणारी पाकिटे व मेंबरशीप कार्डचे खर्चास मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ३.०५.२००५ चे सभेत मान्यता मिळालेली आहे. वरीलप्रमाणे छपाईकामी स्थानिक वर्तमानपत्रात जाहीरात देऊन निविदा मागणी करुन जनरल छपाई करुन घेता येईल. तसेच प्रि-प्रिंटेड संगणक स्टेशनरी छपाईकामी पुणे,मुंबई, नाशिक, औरंगाबाद इ. ठिकाणी वर्तमानपत्रात जाहीरात देऊन निविदा मागणी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-खरेदी अधिकारी)

**विषय नं.३३. आय.टी. विभागासाठी प्रिंटर्स खरेदीकामी संबंधितांशी वाटाघाटी करुन निर्णय घेणे**

**निर्णय क्र.२७७.** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२९.०१.२००५ निर्णय क्र.१९ नुसार आय.टी.विभागासाठी आवश्यक असणारे प्रिंटर्स खरेदीकामी संस्थान जा.क्र.एसएसएस/खरेदी-आयटी/३२९३/२००५ दि.०१.०४.२००५

अन्वये दि.१५.०४.२००५ अखेर कोटेशन्स मागविणेत आलेली होती. त्यानुसार खालील कोटेशन्सधारकांनी आपली कोटेशन्स सादर केलेली आहेत.

०१. इडीपी सर्व्हिसेस, मुंबई
०२. जयश्री एंटरप्रायजेस, अहमदनगर
०३. रोहरा कॉम्प्युटर प्रॉडक्टस, मुंबई
०४. स्वदर्शन इलेक्ट्रिकल्स, नाशिक
०५. राका इन्फोटेक प्रायव्हेट लिमीटेड, नाशिक
०६. सुजाता कॉम्प्युटर्स प्रायव्हेट लिमीटेड, पुणे
०७. आयटी प्रिंटींग सपोर्ट डॉट कॉम, पुणे

वरीलपैकी अ.नं.५ ते ७ यांनी मागणीप्रमाणे बयाणा रकमेचा डी.डी.निविदेसोबत जोडलेला नसल्याने त्यांचे निविदेचा विचार करता येणार नाही. उपरोक्त कोटेशनधारकांनी सादर केलेले कोटेशन्स उघडणेत येऊन क्र.१ ते ४ यांना चर्चा तथा वाटाघाटीअंती निर्णयार्थ आजचे सभेपुढे आमंत्रित करणेत आले होते.

उपस्थित सर्व निविदाधारकांना सभागृहात एकत्रित बोलावून त्यांनी देऊ केलेल्या दरामध्ये काही सूट देणार किंवा कसे याबाबत सुधारित दर बंद पाकिटात देणेबाबत सांगणेत आले.

उपरोक्त सुधारित दरपत्रकाचे पाकिटे उघडून कागदपत्रांची छाननी करुन निम्नतम दराने खरेदी करण्याचे अधिकार मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग, मा. श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे, मा. डॉ. एकनाथ भागचंद गोंदकर यांना प्रदान करण्यात आले.

(कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग)

**विषय नं.३४. मुंबई कार्यालय, लेखाशाखा, साईनिवास, ध्वनीक्षेपण व रुग्णालय या विभागांसाठी ए.सी. खरेदीकामी संबंधितांशी वाटाघाटी करुन निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.२७८.** श्री साईबाबा संस्थानचे रुग्णालय, साईनिवास अतिथीगृह, ध्वनीक्षेपण व लेखाशाखा तसेच मुंबई कार्यालयासाठी आवश्यक असणारे स्प्लिट व विंडो एअर कंडीशनर्स खरेदीबाबतचा तपशील खालीलप्रमाणे-

**अ)** मा.व्यवस्थापन समिती सभा २१.१०.२००४ मधील निर्णय क्र.७१ नुसार रुग्णालय विभागासाठी आवश्यक असणारे ए.सी. व रेफ्रिजरेटर खरेदीस व त्यासाठी येणारे रक्कम रु.९,६८,०००/-पर्यंतचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार रुग्णालय व्यवस्थापकांचा अभिप्राय घेऊन रुग्णालयासाठी अंदाजे ९ नग स्प्लिट व विंडो टाईपचे ए.सी. खरेदीकामी जा.क्र.२२८४ दि.०३.०३.२००५ अन्वये दरपत्रके मागविणेत आलेली होती. तथापि, फक्त २ कोटेशन्स आल्याने जा.नं.४९४९ दि.११.०५.२००५ अन्वये फेरकोटेशन मागणी करणेत आलेली आहेत.

०१. शितल एअर-कंडीशनर्स, राहुरी
०२. गोदरेज ॲप्लायन्सेंस, मुंबई
०३. जी.एस.ट्रेडींग कंपनी, औरंगाबाद
०४. मोनार्क मार्केटींग, औरंगाबाद
०५. धुत एअरकंडीशनींग कंपनी, औरंगाबाद
०६. धुत कम्फोर्ट सिस्टम्स, औरंगाबाद
०७. व्हिडीओकॉन इंटरनॅशनल लिमीटेड, जि.औरंगाबाद

**ब)** मा.व्यवस्थापन समिती सभा ०३.०५.२००५ मधील निर्णयानुसार साईनिवास अतिथीगृह, ध्वनीक्षेपण कक्ष व लेखाशाखेतील मनीऑर्डर/चेक विभागामध्ये बसविणेसाठी आवश्यक असणारे एअर कंडीशनर खरेदीस व त्यासाठी येणारे रक्कम रु.१,९०,०००/-पर्यंतचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार ४ नग ए.सी. खरेदीकामी जा.क्र.५१४२ दि.१८.०५.२००५ अन्वये दरपत्रके मागविणेत आलेली आहेत.

०१. कॅरीअर एअरकॉन लिमीटेड,पुणे
०२. काशिको ट्रेडींग प्रा.लिमीटेड, कोपरगांव
०३. जी.एस.ट्रेडींग कंपनी, औरंगाबाद
०४. व्हिडीओकॉन इंटरनॅशनल लिमीटेड, जि.औरंगाबाद

**क)** मा.व्यवस्थापन समिती सभा १७.०४.२००५ मधील निर्णय क्र.१४६ नुसार मुंबई येथील साईनिकेतन इमारतीतील हॉलकरीता आवश्यक असणारे ६ नग ए.सी. खरेदीस व त्यासाठी येणारे रक्कम रु.२,२०,०००/-पर्यंतचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार जा.क्र.६०५८ दि.०९.०६.२००५ अन्वये दरपत्रके मागविणेत आलेली आहेत.

०१. आर.टी.कराचीवाला, अहमदनगर
०२. गोदरेज ॲप्लायन्सेंस, पुणे

०३. लकी रेफ्रिजरेशन, नाशिक

०४. व्होल्टास लिमिटेड, पुणे

उपरोक्तपैकी मे.व्हिडीओकॉन इंटरनॅशनल लिमीटेड, औरंगाबाद यांचेकडील व्हिडीओकॉन कंपनीचे एअर कंडीशनरमधील फॅन ब्लेड हे प्लॅस्टीकचे असून ते वारंवार तुटतात. तसेच सदरील ए.सी.सर्किटमध्ये नेहमीच बिघाड होऊन प्लेट खराब होत असल्याने कंपनीकडून मिळणा-या प्लेट मॅच होत नसल्याने मेंटेनन्समध्येही अडचणी येत आहेत असे विदयुत विभागाने कळविलेले असल्याने त्यांना चर्चा तथा वाटाघाटीसाठी आमंत्रित करण्यात आलेले नाही. उपरोक्त कोटेशनधारकांनी सादर केलेले कोटेशन्स उघडणेत येऊन निविदाधारकांना आजचे सभेपुढे चर्चा तथा वाटाघाटीसाठी आमंत्रित करणेत आले होते.

उपस्थित सर्व निविदाधारकांना सभागृहात एकत्रित बोलावून त्यांनी देऊ केलेल्या दरामध्ये काही सूट देणार किंवा कसे याबाबत सुधारित दर बंद पाकिटात देणेबाबत सांगणेत आले.

उपरोक्त सुधारित दरपत्रकाचे पाकिटे उघडून कागदपत्रांची छाननी करुन निम्नतम दराने खरेदी करण्याचे अधिकार मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग, मा. श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे, मा. डॉ. एकनाथ भागचंद गोंदकर यांना प्रदान करण्यात आले.

( कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग)

**विषय नं.३५. साईप्रसाद नं.०२ करिता लगेज रॅक बनविणेबाबत.**

**निर्णय क्र.२७९.**सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.३६. साईबाबा भक्तनिवासस्थानकडे असलेल्या कापूस गाद्यांचे नूतनीकरण करणे व सोलापूर चादरी खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.२८०.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.३७. सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प तत्वत: मान्यता देणे बाबत.**

**निर्णय क्र.२८१.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.३८. पाणीपुरवठा विभागाकडील पंपाकरिता पॅनेल बोर्ड खरेदीकामी आलेले कोटेशन्स उघडणेबाबत.**

**निर्णय क्र.२८२.** पाणीपुरवठा विभागाकडील ५०० रूमकडील पंपाकरीता पॅनेल बोर्ड खरेदी करण्यासाठीचा व त्यासाठी कोटेशन मागविणेबाबतचा प्रस्ताव दिनांक १७-०४-२००५ रोजी शिरडी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत विषय क्र.१६ निर्णय क्रमांक १५७ अन्वये मान्य करण्यात आलेला आहे.

यानुसार एसएसएस-विद्युत-४३२३-२००५ दिनांक:-२९-०४-२००५ या पत्रान्वये विविध पार्टीजकडून कोटेशन बोलाविण्यात आले होते. त्यानुसार मुदतीत खालीलप्रमाणे ०५ कोटेशन्स प्राप्त झाली आहेत.

| अ.नं. | कोटेशन्सधारकाचे नांव |
|---|---|
| ०१. | मे. न्युट्रॉनिक्स मॅन्युफॅक्चरींग कं . मुबई |
| ०२. | मे. अँटीया ईलेक्ट्रिकल्स , मुबई |
| ०३. | मे.बी.जे.इलेक्ट्रिकल्स, नासिक |
| ०४. | मे. पॉवर लिंक इंजिनियर्स,नासिक |
| ०५. | मे. मनिष स्विचगिअर्स अॅंड इलेक्ट्रिक ,सिन्नर |

उपरोक्त कोटेशनधारकांनी सादर केलेले कोटेशन्स उघडणेत येऊन त्यांना आजचे सभेपुढे समक्ष चर्चा तथा वाटाघाटीअंती निर्णयार्थ आजचे सभेपुढे आमंत्रित करणेत आलेले होते.

उपस्थित सर्व कोटेशन्सधारकांना सभागृहात एकत्रित बोलावून त्यांनी देऊ केलेल्या दरामध्ये काही सुट देणार किंवा कसे याबाबत सुधारित दर बंद पाकिटात देणेबाबत सांगणेत आले.

उपरोक्त सुधारित दरपत्रकाची पाकिटे उघडून कागदपत्रांची छाननी करुन निम्नतम दराने खरेदी करण्याचे अधिकार मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग, मा. श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे, मा. डॉ. एकनाथ भागचंद गोंदकर यांना प्रदान करण्यात आले.

(कार्यवाही - विद्यूत विभागप्रमुख)

**विषय नं.३९. सर्व्हे नं.१२४ मध्ये उभारण्यात येणाऱ्या गोडाऊनला वीजपुरवठा करणेकामी केबल खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.२८३.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.४०. रुग्णालयाच्या नव्या इमारतीतील नवीन वाढीव लोडसाठी नवीन ५०० केव्हीए जनसेटबाबत.**

**निर्णय क्र.२८४.** रुग्णालयाचे विस्तारीकरणाचे काम सध्या प्रगतीपथावर असून या विस्तारीकरणाचे कामात काही मशिनरी वाढणार असल्याने लोड वाढणार आहे. मा.व्यवस्थापन समितीसमोर , या विस्तारीकरणाचे कामात वाढणारा लोड व त्याबरोबर साईनगरच्या आजूबाजूला असलेल्या परिसरातील संस्थान

जमिनीत उभ्या राहणाऱ्या नविन इमारती, सेंट्रल स्टोअर , श्री साईनाथ माध्यमिक विद्यालयाच्या इमारतीत स्थलांतर करावयाचे रूग्णालय, इतर बांधकामे विचारात घेऊन मोठा ५०० केव्हीए क्षमतेचा जनसेट घेण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. हा प्रस्ताव दिनांक ०३-०५-२००५ च्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेत विषय क्र.३० निर्णय क्रमांक २०५ अन्वये मान्य झाला आहे. येणा-या खर्चास व दर मागविणेसाठी तत्वत: मान्यता मिळाली आहे.

प्रस्तावात २०० केव्हीएचे मशिन परत देऊन त्याऐवजी बाय-बॅंक सिस्टिम अंतर्गत नविन ५०० केव्हीए जनसेट घेण्याचे नमूद आहे. जूना जनसेट देऊन नवीन जनसेट घेण्यासाठी मान्यता मिळाली असून वर्तमानपत्रात जाहिरात देऊन जाहीर निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार खालील प्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव |
|---|---|
| ०१. | मे. मॅग्नेटिक ईले.ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स,औरंगाबाद |
| ०२. | मे.आदिती इलेक्ट्रीकल्स,नाशिक |
| ०३. | मे. बी.जे. इलेक्ट्रीकल्स, नाशिक |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत उघडण्यात येऊन निविदाधारकांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव | निविदेतील दर रक्कम रुपये | वाटाघाटीनंतरचे दर रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | मे. मॅग्नेटिक ईले.ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स, औरंगाबाद | ३३,५७,८६०.०० | अनुपस्थित |
| ०२. | मे.आदिती इलेक्ट्रीकल्स,नाशिक | ३७,३१,८९१.०० | ३७,३१,८९१.०० |
| ०३. | मे. बी.जे. इलेक्ट्रीकल्स, नाशिक | ३८,१४,७७०.०० | ३७,३८,४७४.६० |

यावर सविस्तर चर्चा होऊन मे. मॅग्नेटिक ईले.ॲण्ड इलेक्ट्रॉनिक्स, औरंगाबाद यांची निम्नतम दराची निविदा स्विकारणेत येऊन त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा असें ठरले.

(कार्यवाही-विद्यूत विभागप्रमुख)

**विषय नं.४१. श्रींच्या मूर्तीवरील सोन्याचा मुलामा दिलेल्या छत्रीबाबत.**

**निर्णय क्र.२८५.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.४२. श्री साई समाधी मंदिरातील बाबांनी हाताळलेल्या वस्तूंचे संग्रहालयात नवीन ए.सी. बसविणेबाबत.**

**निर्णय क्र.२८६.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.४३. जुनी वापरात नसलेली मेल्ट्रॉन ईपीएबीएक्स टेलिफोन सिस्टम विक्री करणेकामी आलेले कोटेशन्स उघडणेबाबत.**

**निर्णय क्र.२८७.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.४४. संस्थानच्या वतीने न्यायालयीन कामे पाहणेसाठी ॲड. भवर, ॲड. वाघ व ॲड. ठोळे यांची ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूक करणेबाबतचे आलेल्या अर्जांबाबत विचार करणे.**

**निर्णय क्र.२८८.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.४५. परिविक्षाधीन कालावधी संपत आलेल्या कर्मचाऱ्यांना संस्थान सेवेत कायम करणेबाबत.**

**निर्णय क्र.२८९.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.४६. फिजीशियन, सर्जन, व भूलतज्ञ पदावर नेमणूक केलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांचे नेमणूकीस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.२९०.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.४७. संस्थान सेवेत असताना दिवंगत झालेले कै.राजाराम कर्पे व कै मधुकर दाभाडे यांचे प्रत्येकी एका वारसास अनुकंपा तत्वावर नेमणूक द्यावयाचे अर्जाबाबत विचार करणे.**

**निर्णय क्र.२९१.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.४८. सुलभ इंटरनॅशनल सोशल ऑर्गनायझेशन यांना सुलभ प्रसाधनगृह येथील एस.टी.डी.सेवेस मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.२९२.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.४९. श्रीरामपूर दूध जिल्हा मध्यवर्ती सहकारी दूध व्यावसायिक संस्था लि.बाभळेश्वर यांना श्रीराम आईस्क्रीम व दुग्धजन्य पदार्थ विक्रीसाठी संस्थान परिसरात बुथ (स्टॉल)ठेवणेसाठी जागा देणेबाबत.**

**निर्णय क्र.२९३.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.५०. एकसामायिक मुद्रेबाबत.**

**निर्णय क्र.२९४.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.५१. प्रशासकीय बाबी आणि/ किंवा विश्वस्तनिधीच्या विनियोगाबाबत शासनाची विहीत पूर्व मंजूरी घेणेबाबत**

**निर्णय क्र.२९५.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.५२. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे अधिनियम, नियम, विनियम या संबंधात तरतूदी सुचविणे व तदनुसार प्रारुप तयार करणेचेकामी मा.श्री सुधाकर जोशी, आय.ए.एस. (निवृत्त), पुणे यांची कन्सल्टंट म्हणून नियुक्ती करणेबाबत.**

**निर्णय क्र.२९६.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.५३. श्रीसाईबाबांचे टपाल तिकीट काढणेबाबत.**

**निर्णय क्र.२९७.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.५४. श्रीगुरुपौर्णिमा उत्सव-२००५ चे मंडप कोटेशन्स वरील केलेल्या कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देणेबाबत.**

**निर्णय क्र.२९८.** श्रीगुरुपौर्णिमा उत्सव-२००५ हा दि.२०/०७/२००५ ते दि.२२/०७/२००५ अखेर साजरा करण्यात येणार असून उत्सवासाठी लागणारे मंडप, कलाकारांचे कार्यक्रमासाठी लागणारे स्टेज, मंडप इ. साठी म्हणून प्रशासन शाखा जा.नं.एसएसएस/वशी-०५/५०१४/०५, दि.१२/०५/२००५ अन्वये १२ मंडप डेकोरेटर्सकडून मंडप कोटेशन दि.१०/०६/२००५ अखेर मागविण्यात आले होते. त्यानुसार दि.१०/०६/२००५ अखेर ४ कोटेशन्स आलेली होती. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव व पत्ता | तपशील |
|---|---|---|
| ०१ | सावता मंडप डेकोरेटर्स, राहाता | श्री गुरुपौर्णिमा उत्सव मंडप |
| ०२ | किरण तरटे, मंडप डेकारेटर्स, राहाता | श्री गुरुपौर्णिमा उत्सव मंडप |
| ०३ | सप्तश्रृंगी मंडप डेकोरेटर्स, राहाता | श्री गुरुपौर्णिमा उत्सव मंडप |
| ०४ | नांव नसलेले (श्री वसंत बंडू तरटे, राहाता,) | श्री गुरुपौर्णिमा उत्सव मंडप |

सदर कोटेशन्स स्थानिक सदस्यांसमोर उघडणेबाबत ठरलेले होते, तथापि नजिकच्या काळात स्थानिक सदस्यांची सभा आयोजित करण्यात आलेली नसलेने मंडप कोटेशन्स उघडणे अत्यंत आवश्यक होते. कारण कोटेशन्स उघडलेशिवाय संबंधितांस मंडप उभारणेबाबत आदेश देणे अशक्य होते, तसेच श्री गुरुपौर्णिमा उत्सव जवळ आलेने मंडप कोटेशन उघडणे अनिवार्य होते.

म्हणून सोमवार दि.२७/०६/२००५ रोजी दुपारी १२.०० वाजता मा.कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात सर्व प्रशासकीय अधिकारी, मुख्य लेखाधिकारी, श्री देसाई, अभियंता व मा.श्री.कैलास गोविंदराव कोते, सदस्य, यांचे समक्ष मंडप कोटेशन्स उघडण्यात आली. त्यावेळी कोटेशनधारकांसही समक्ष चर्चेसाठी बोलाविण्यात आले होते.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव व पत्ता | तपशील | कोटेशन दर |
|---|---|---|---|
| ०१ | सावता मंडप डेकोरेटर्स, राहाता | श्री गुरुपौर्णिमा उत्सव मंडप | रु.१,२५,०००/- |
| ०२ | किरण वसंत तरटे,<br>मंडप डेकारेटर्स, राहाता | श्री गुरुपौर्णिमा उत्सव मंडप | **रु.१,१०,०००/-** |
| ०३ | सप्तश्रृंगी मंडप डेकोरेटर्स, राहाता | श्री गुरुपौर्णिमा उत्सव मंडप | रु.२,००,०००/- |
| ०४ | नांव नसलेले (श्री वसंत बंडू तरटे, राहाता,) | श्री गुरुपौर्णिमा उत्सव मंडप | रु.१,२५,०००/- |

कोटेशन्स समक्ष उघडली असता, श्री किरण वसंत तरटे, राहाता, यांचे दर न्युनतम असून बाजारभावाप्रमाणे रास्त होते, म्हणून श्री किरण वसंत तरटे, राहाता यांना रु.१,१०,०००/-(अक्षरी रु.एक लाख दहा हजार मात्र) ने मंडप, पत्र्याचे स्टेज, इ. उभारणीकामी आदेश देण्यात आलेले असून त्यास कार्योत्तर मंजूरी देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रशासन शाखा वशी-०५)

**विषय नं.५५. संस्थानला सुरक्षा, अकुशल, कुशल कंत्राटी कामगार पुरविण्याबाबत ठेकेदार यांचेकडून आलेली निविदा पाकिटे उघडणेबाबत.**

**निर्णय क्र.२९९.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी यांना लागणारे अकुशल,कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी मान्यताप्राप्त कंत्राटदारांची/ठेकेदारांची नेमणूक करणेसाठी वर्तमान पत्रात जाहीरात देऊन सिलबंद निविदा मागविणेत आल्या होत्या. सिलबंद निविदा फॉर्मस् विक्रीची मुदत दि. ०६-०६-२००५ पासून ते दि.१८-०६-२००५ पर्यंत अशी होती. तसेच सिलबंद निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२०-०६-२००५ रोजी सायंकाळी ५-०० वाजेपर्यंत अशी होती.

संस्थानमध्ये लागणारे अकुशल, कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणे संदर्भात मान्यताप्राप्त कंत्राटदारांकडून/ठेकेदारांकडून संस्थानचे शिरडी कार्यालयास २३ सिलबंद निविदा व मुंबई कार्यालयास १९ सिलबंद निविदा अशा एकूण ४२ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या खालीलप्रमाणे निविदा आजचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आल्या.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव व गांव |
|---|---|
| १. | श्री.महेंद्र एम.गंधे.अहमदनगर. |
| २. | महाराष्ट्र सुरक्षा रक्षक औद्योगिक सहकारी संस्था मर्यादित. गोखलेनगर, पुणे. |
| ३. | टॉपस् सिक्युरिटी लिमिटेड.अंबड, नासिक-१० |
| ४. | सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि. विलेपार्ले (प)मुंबई-४०००५६ |
| ५. | सावली फॅसिलीटी ऑर्गनायझेशन. शिवाजीनगर, पुणे-४११००५ |
| ६. | श्री साई संस्थान नोकरांची सहकारी पतपेढी लि. शिरडी |
| ७. | बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इंडिया) लि. नासिक-पुणे रोड, नासिक-४२२१०१ |
| ८. | एससीआय इंटरनॅशनल सिक्युरिटीज लिमिटेड अंधेरी (ईस्ट ) मुंबई-४०००५९ |
| ९. | संतोष केरवेल सर्व्हीसेस प्रा.लि. नासिकरोड |
| १०. | स्पेअरहेड सिक्युरिटी जामखेडरोड, अहमदनगर |
| ११. | ग्रुप ४ सिक्युरिटीज गार्डींग प्रा.लि. पौड रोड, पुणे-३८ |
| १२. | सेफ गार्ड सिक्युरिटी अॅन्ड अलाईड सर्व्हीसेस. औरंगाबादरोड, अहमदनगर. |
| १३. | जय हनुमान लेबर सर्व्हीसेस औरंगाबाद. |
| १४. | पी.जी.सिक्युरिटी एम.जी.रोड, पुणे-१ |
| १५. | मे.जय संतोषीमाता मॅनपॉवर मॅनेजमेंट सर्व्हीसेस प्रा.लि. मुलुंड (प) मुंबई-४०००२ |
| १६. | सुवर्णा एंटरप्राईझेस हडपसर, पुणे-२८ |
| १७. | सन सिक्युरिटी सर्व्हीसेस परमार नगर, पुणे-४११०१३ |
| १८. | बॅटल गार्डस् सर्व्हीसेस झणकारनगर, नागपूर-४४००१० |
| १९. | प्रशांत औद्योगिक कामगार अॅन्ड सुरक्षा रक्षक सहकारी संस्था लि. निगडी, पुणे-४११०४४ |
| २०. | जय भवानी इंटरप्रायझेस, चिंचवड, पुणे-४११०१९ |
| २१. | मे.सिध्दार्थ सर्व्हीसेस, सिडको, औरंगाबाद- ४३१००३ |
| २२. | मेडीएटर्स अॅन्ड अजंठा सिक्युरिटी प्रा.लि., सिडको, औरंगाबाद-४३१००३ |
| २३ | अविसागर लेबर सप्लायर्स, सातपूर, नासिक. |
| २४. | अल्ससिक्युअर अॅन्ड प्रोटेक्शन सर्व्हीसेस (इंडिया) प्रा.लि., जोगेश्वरी (ई ) मुंबई-४०००६० |
| २५. | श्रीकृपा सर्व्हीसेस प्रा.लि., आकुर्डी, पुणे-३५ |
| २६. | कृष्णा सिक्युरिटी सर्व्हीसेस, घाटकोपर(पुर्व) मुंबई-४०००७५ |
| २७. | एक्स सर्व्हीमेन मल्टीपल सर्व्हीसेस अॅन्ड कन्सलटंट, एरवडा, पुणे-४११००७ |
| २८. | ग्रुप सात गार्डस् (इं)प्रा.लि., वरळी, मुंबई-४०००१३ |
| २९. | डायनॅमिक सिक्युरिटी अॅन्ड डिटेक्टीव्ह एजन्सी प्रा.लि.,अंधेरी (ईस्ट),मुंबई-४०००६० |
| ३०. | फ्लॅश सिक्युरिटी अॅन्ड इंटेलिजन्स सर्व्हीसेस.कांदिवली (ई),मुंबई-४००१०१ |
| ३१. | नॅशनल सिक्युरिटी सर्व्हीसेस, पुणे-४११०१६ |
| ३२. | ईगल सिक्युरिटी अॅन्ड पर्सोनेल सर्व्हीस, अंधेरी (वेस्ट),मुंबई-४०००५८ |
| ३३. | ट्रीग डिटेक्टीव्हज (प्रा.)लि.,जुहू ,मुंबई-४०००४९ |
| ३४. | शिवा इंडस्ट्रियल सिक्युरिटी एजन्सी (गुज.)प्रा.लि.,कुर्ला (वेस्ट),मुंबई-४०००७० |
| ३५. | बीव्हीजी इंडिया लिमिटेड,शिवाजीनगर, पुणे-५ |
| ३६. | कुशांग सिक्युरिटी अॅन्ड प्रोटेक्शन सर्व्हीसेस,वडाळा (ईस्ट),मुंबई-४०००३७ |
| ३७. | क्रिस्टाल ट्रेडकॉम प्रा.लि.,सायन, मुंबई-४०००२२ |
| ३८. | सेंट्रल इन्व्हीस्टीगेशन सिक्युरिटी सर्व्हीसेस लि.,अंधेरी (वेस्ट),मुंबई-४०००५३ |
| ३९. | बी-कॅट सिक्युरिटी सर्व्हीसेस, ठाणे (वेस्ट), ४००६०१ |
| ४०. | कॅटस् फायर अॅन्ड अलाईड सर्व्हीसेस, ठाणे (वेस्ट), मुंबई-४००६०१ |
| ४१. | एक्स ट्रा लेबर फोर्स, ठाणे (वेस्ट),४०००६०१ |
| ४२. | संपूर्ण सुरक्षा आणि अलाईड सर्व्हीसेस, वाशी, नवी मुंबई-४००७०३ |

उपरोक्त निविदांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन, व्यवस्थापन समितीचे पुढील सभेत निर्णयार्थ सादर करावा, असें ठरलें.

(कार्यवाही-कामगार अधिकारी)

**विषय नं.५६. श्री गंगागिरी महाराज (सराला बेट) यांचे मौजे डिग्रज मालुंजे ता.संगमनेर जि. अहमदनगर येथे होणारे १५८ वा अखंड हरिनाम सप्ताहास शिधा सामुग्री देणेबाबत.**

**निर्णय क्र.३००** मा.श्री.राधाकृष्ण ए.विखे पाटील, यांचे दि.१८/०६/२००५ रोजीचे पत्रान्वये मौजे डिग्रस मालुंजे, ता.संगमनेर, जि.अहमदनगर येथे सद्‌गुरु श्री गंगागिरीजी महाराज (सराला बेट) यांचा १५८ वा अखंड हरिनाम सप्ताह दि.१०/०८/२००५ ते दि.१७/०८/२००५ या कालावधीत होणार असून या धार्मिक कार्यक्रमासाठी संस्थानकडून भरीव आर्थिक मदत करणेबाबत सहकार्य करावे, अश्या मसुदाचे पत्र आलेले असून याच संदर्भात मा.श्री.शंकररावजी कोल्हे, उपाध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) यांचे दि.१९/०६/२००५ चे पत्रात सप्ताहास यथायोग्य मदत संस्थानचे नियमाप्रमाणे देणेबाबत सहकार्य करावे अशी विनंती केली आहे. तसेच सदरच्या दोन्हीही पत्रावर

मा.कार्यकारी अधिकारी यांनी सदरचा विषय येत्या व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवा असा शेरा दिलेला आहे.

तसेच ज्या संस्थेस वा ग्रामस्थांना अखंड हरिनाम सप्ताहासाठी शिधा स्वरुपात मदत हवी आहे अश्या संस्थेने संस्थानकडे कोठल्याही प्रकारचा पत्रव्यवहार केलेला नाही. तसेच संस्थानमार्फत धार्मिक कार्यक्रमासाठी आर्थिक मदत देत नाहीत. धार्मिक कार्यक्रमासाठी फक्त शिधा स्वरुपात मदत केलेली आहे.

प्रस्तावित प्रकरण " ग्रॅन्ट इन एड " स्वरुपाचे आहे. विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम २१(२)(एक)(अध्यादेशान्वये सुधारित)मधील तरतुदीन्वये शैक्षणिक संस्थेस छाननी समितीच्या शिफारसीनुसार राज्य शासनाच्या मान्यतेने अनुदान देण्याची तरतूद आहे.

तथापि दि.१३/०३/२००५ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.३७, निर्णय क्र.१२९ अन्वये यापुर्वी देण्यात आलेल्या अनुदानास शासनाची मान्यता घ्यावी, ही मान्यता मिळालेनंतरच यापुढे अनुदान मागणीकामी आलेले अर्ज मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेसाठी सादर करणेत यावे असें ठरले.

तसे प्रस्ताव शासनाचे मान्यतेसाठी पाठविणेत आले असून त्यांना अद्याप मान्यता आली नाही. तसेच शासन जा.क्र.CHC1005/C.R.NO.(151)D.XVII, दिनांक १३/०५/२००५ अन्वये कार्योत्तर मान्यतेची प्रकरणे यापुढे शासनाकडे मंजूरीसाठी पाठवू नये असे कळविलेले आहे.

तथापि,मौजे डिग्रस मालुंजे, ता.संगमनेर, जि.अहमदनगर, येथे सद्‌गुरु श्री गंगागिरीजी महाराज (सराला बेट) यांचा १५८ वा अखंड हरिनाम सप्ताह दि.१०/०८/२००५ ते दि.१७/०८/२००५ या कालावधीत होणार असून या धार्मिक कार्यक्रमासाठी संस्थानकडून शिधा स्वरुपात मदत मिळावी अशी विनंती केली असून, एक विशेष बाब म्हणून त्यांना रुपये ५० हजारापर्यंत वस्तूरुपाने मदत देण्यात यावी, असें ठरलें. (कार्यवाही-प्रशासन शाखा वशी-०५)

**विषय नं.५७. कोजागिरी पौर्णिमा उत्सव-२००५**

**निर्णय क्र.३०१.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.५८. सुरक्षा तपासणीसाठी स्कॅनर मशिन खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.३०२.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.५९. सुरक्षा तपासणीसाठी मेटल डिटेक्टर खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.३०३.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.६०. प्रसादालय लाडू प्रसाद मजूरी दराबाबत.**

**निर्णय क्र.३०४.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.६१. एल.पी.जी. फायर हायड्रन्ट सिस्टिम लिकेजचे डिटेक्टर व गॅस फ्लो मिटरचे कोटेशन्स उघडून वाटाघाटीव्दारे निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.३०५.** व्यवस्थापन समितीचे दिनांक ८.०५.२००५ चे सभेत प्रसादालय एल.पी.गॅस यार्ड व परिसरातील गॅस लिकेज सारख्या धोक्यांपासून तात्काळ सूचना मिळणे व इतर आवश्यक उपाययोजना करणेकामी तातडीने करणेबाबत निर्देश देण्यात आलेले आहे. त्यानुसार सन २००१ मध्ये सदर यंत्रणेचे काम केलेले श्री.शि.बा.मुंडफन (भोसले) सॅफिकॉन फायर ॲण्ड सेफ्टी कन्सल्टट, पुणे यांना समक्ष पहाणी करुन अहवाल सादर करणेकामी दिनांक १७.०५.२००५ रोजी आमंत्रित करण्यात आलेले होते. श्री.मुंडफन यांनी दिलेल्या अहवालानुसार लागणारी यंत्रणा,साहित्य खरेदीसाठी व उभारणी साठी तातडीने कोटेशन्स मागविण्यात आलेली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे कोटेशन्स प्राप्त झालेली आहेत.

| अ.नं. | कोटेशनसादरकत्याचे नाव |
|---|---|
| ०१. | मे.ग्लोब इक्वीपमेंट इंडस्ट्री प्रा.लि.,मुंबई |
| ०२ | मे.भारती एंटरप्रायजेस, पुणे |
| ०३. | मे.इंडि इंजिनिअर्स प्रा.लि.,मुंबई |
| ०४. | मे.मनोज फायर सर्व्हिसेस, पुणे |
| ०५. | मे.द्वीप एंटरप्रायजेस, पुणे |
| ०६. | मे.युनायटेड फास्परस लि.,मुंबई |
| ०७. | मे.फायर ॲण्ड सेफ्टी सर्व्हिसेस, पुणे |
| ०८. | मे.कन्सेप्ट इंजिनिअर्स प्रा.लि.,पुणे (फॅक्स पत्र) |
| ०९. | मे.अजय इंडस्ट्री, घाटकोपर (उशीरा प्राप्त झालेले) |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली कोटेशन्स आजचे सभेपुढे उघडण्यात येऊन कोटेशनसादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते.

उपस्थित सर्व कोटेशन्सधारकांना सभागृहात एकत्रित बोलावून त्यांनी देऊ केलेल्या दरामध्ये काही सूट देणार किंवा कसे याबाबत सुधारित दर बंद पाकिटात देणेबाबत सांगणेत आले.

उपरोक्त सुधारित दरपत्रकाचे पाकिटे उघडून कागदपत्रांची छाननी करुन निम्नतम दराने खरेदी करण्याचे अधिकार मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग, मा. श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे, मा. डॉ. एकनाथ भागचंद गोंदकर यांना प्रदान करण्यात आले.

(कार्यवाही -अधिक्षक,प्रसादालय)

**विषय नं.६२. मुक बधीर विद्यालय, शिर्डी यांचेकडील विद्यार्थ्यांना मोफत प्रसाद भोजन देणेबाबत.**

**निर्णय क्र.३०६.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.६३. प्रसाद भोजनातील भाजी व चटणीबाबत.**

**निर्णय क्र.३०७.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.६४. स्कुलबस व भक्तनिवासस्थान बसेसचे कुशनकाम, कलरकाम व कापडी कव्हर शिवणे इत्यादीकामी आलेले कोटेशन्स उघडणे व चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.३०८.**श्री साईबाबा संस्थानकडे एकूण आठ बसेस आहेत. पैकी श्रीसाईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूलची मुले शिर्डी परिसरातून शाळेत ने-आण करणेकरीता पाच बसेस अल्पदरात व श्री साईभक्तांना मंदिर परिसर ते भक्तनिवासस्थान येथे ने-आण करणेकरीता तीन बसेस विनामूल्य वापरात आहेत. या आठ बसेसचे आसनांचे कुशन व त्यावरील कापडी कव्हर जास्त वापरामुळे खराब झालेले आहेत. तसेच ऊन, पाऊस व जास्त काळ वापरात असल्यामूळे कलर खराब झालेला आहे. याकामी व्यवस्थापन समितीचे दिनांक १७.०४.२००५ चे सभेत निर्णय क्र.१५९ अन्वये रुपये १,४४,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

**अ) <u>कलर काम (रंगकाम )-</u>** ०१) बस नं.एमएच१७/ए-७५९५ ०२) बस नं.एमएच१७/सी -९०१६, ०३) बस नं.एमएच१७/सी-९०९७ या तीन बसेसचे रंगकामाकरीता जा.नं.एसएसएस-वशी-वाहन-४८८३-२००५ दिनांक ०९.०५.२००५ अन्वये खालील कोटेशन्सधारकांकडून कोटेशन्स मागविण्यात आलेली होती.

| अ.नं. | कोटेशन्सधारकाचे नांव |
|---|---|
| ०१. | मे.श्रीराम ॲटोमोटीव्ह, साकुरी |
| ०२. | मे.सम्यक आर्ट ॲण्ड स्प्रे पेंटींग वर्क्स, कोपरगांव |
| ०३. | मे.शिवशक्ती इं.ॲण्ड फॅब्रीकेशन वर्क्स, बाभळेश्वर |
| ०४. | मे.न्यू स्टार बॉडी बिल्डर्स, राहूरी |

उपरोक्तपैकी खालील कोटेशन्सधारकांनी आपले कोटेशन्स सादर केलेली आहेत.

| अ.नं. | कोटेशन्सधारकाचे नांव |
|---|---|
| ०१. | मे.श्रीराम ॲटोमोटीव्ह, साकुरी |
| ०२. | मे.शिवशक्ती इं.ॲण्ड फॅब्रीकेशन वर्क्स, बाभळेश्वर |
| ०३. | मे.न्यू स्टार बॉडी बिल्डर्स, राहूरी |
| ०४. | मे.विश्वकर्मा मोटार बॉडी, श्रीरामपूर (कोटेशन फॉर्म दिलेला नाही परंतू कोटेशन आलेले आहे) |
| ०५. | मे.नित्यानंद मोटार काच सेंटर, कोपरगांव (कोटेशन फॉर्म दिलेला नाही परंतू कोटेशन आलेले आहे) |

**ब) <u>कुशनकाम व कापडी खोळी</u> -**एमएच-१७/ए-७५९५,एमएच-१७/सी-९०१६,एमएच-१७/सी-९०१७, एमएच-१७/सी-७५९३, एमएच-१७/सी-७५९४ या पाच बसेसकरीता कुशन करणे व एमएच-१७/ए-७५९५, एमएच-१७/ए-७५९५, एमएच-१७/सी-९०१६, एमएच-१७/सी-९०१७,एमएच-१७/सी-७५९३, एमएच-१७/सी-७५९४, एमएच-१७/सी-८८५१,एमएच-१७/के-९३७०, एमएच-१७/के-९३७१ या आठ बसेसकरीता कापडी खोळी शिवणे मजूरीकरीता जा.नं. एसएसएस-वशी-वाहन-४८८२/२००५ दिनांक ०९.०९.२००५ अन्वये खालील कोटेशन्सधारकांकडून कोटेशन्स मागविण्यात आलेली होती.

| | |
|---|---|
| ०१. | मे.सपना कुशन वर्क्स,श्रीरामपूर |
| ०२. | मे.शिवशक्ती इं.ॲण्ड फॅब्रीकेशन वर्क्स, बाभळेश्वर |
| ०३. | मे.अनिल कुशन वर्क्स, लक्ष्मीवाडी |

उपरोक्तपैकी खालील कोटेशन्सधारकांनी आपले कोटेशन्स सादर केलेली आहेत.

| | |
|---|---|
| ०१. | मे.सपना कुशन वर्क्स,श्रीरामपूर |
| ०२. | मे.शिवशक्ती इं.ॲण्ड फॅब्रीकेशन वर्क्स, बाभळेश्वर |
| ०३. | मे.अनिल कुशन वर्क्स, लक्ष्मीवाडी |
| ०४. | मे.नित्यानंद मोटार काच सेंटर, कोपरगांव (कोटेशन फॉर्म दिलेला नाही परंतू कोटेशन आलेले आहे) |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कलर कामाचे तसेच कुशन करणे व कापडी खोळी शिवणे मजूरीचे कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडणेत आले. तसेच उपस्थित सर्व कोटेशन्सधारकांना

सभागृहात एकत्रित बोलावून त्यांनी देऊ केलेल्या दरामध्ये काही सूट देणार किंवा कसे याबाबत सुधारित दर बंद पाकिटात देणेबाबत सांगणेत आले.

उपरोक्त सुधारित दरपत्रकाचे पाकिटे उघडून कागदपत्रांची छाननी करुन निम्नतम दराने खरेदी करण्याचे अधिकार मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग, मा. श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे, मा. डॉ. एकनाथ भागचंद गोंदकर यांना प्रदान करण्यात आले.

( कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

**विषय नं.६५.** **महिंद्रा बोलेरो कॅम्पर व महिंद्रा मॅक्स पिकअप बॉडी बांधणीकामी आलेले कोटेशन्स उघडून चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.३०९.** दिनांक ०६.०३.२००५ रोजी महिंद्रा अॅण्ड महिंद्रा कंपनीकडून एक बोलेरो कॅम्पर ही मालवाहू वाहन देणगी व महिंद्रा मॅक्स पिकअप हे वाहन डिस्काऊंट दरात संस्थानला दिलेल्या आहेत. या दोन्ही वाहनांचा वापर प्रसाद लाडू वाहतूक व प्रसादालयाचा दररोजचा माल वाहतूक करणेकरीता करावयाचा आहे. या करीता दोन्ही वाहनांची बॉडी बांधणी करुन घेणे आवश्यक आहे. सदरहू वाहनांची बॉडी बांधणेकामी खालील कोटेशन्सधारकांकडून जा.नं.एसएसएस-वशी-वाहन-५३८७/२००५ दिनांक २१.०५.२००५ अन्वये कोटेशन्स मागविण्यात आले होते.

| अ.नं. | कोटेशन्सधारकाचे नांव |
|---|---|
| ०१. | मे.परासीक ऑटो बॉडी, मुंबई |
| ०२. | मे.श्री लक्ष्मी ऑटो बॉडी, नाशिक |
| ०३. | मे.विश्वकर्मा मोटार बॉडी, श्रीरामपूर |
| ०४. | मे.नताशा मोटार इंडस्ट्रीज, पुणे |
| ०५. | मे.पुणा ऑटो बॉडी बिल्डर, कोकणगांव (संगमनेर ) |
| ०६. | मे.शिवकृपा बॉडी बिल्डर, बाभळेश्वर |
| ०७. | मे.साईगुरु बॉडी बिल्डर, कळवा (ठाणे) |

उपरोक्तपैकी खालील कोटेशन्सधारकांनी आपले कोटेशन्स सादर केलेली आहेत.

| अ.नं. | कोटेशन्सधारकाचे नांव |
|---|---|
| ०१. | मे.श्री लक्ष्मी ऑटो बॉडी, नाशिक |
| ०२. | मे.नताशा मोटार इंडस्ट्रीज, पुणे |
| ०३. | मे.शिवकृपा बॉडी बिल्डर, बाभळेश्वर |
| ०४. | मे.साईगुरु बॉडी बिल्डर, कळवा (ठाणे) |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडणेत आले. तसेच उपस्थित सर्व कोटेशन्सधारकांना सभागृहात एकत्रित बोलावून त्यांनी देऊ केलेल्या दरामध्ये काही सूट देणार किंवा कसे याबाबत सुधारित दर बंद पाकिटात देणेबाबत सांगणेत आले.

उपरोक्त सुधारित दरपत्रकाचे पाकिटे उघडून कागदपत्रांची छाननी करुन निम्नतम दराने खरेदी करण्याचे अधिकार मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग, मा. श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे, मा. डॉ. एकनाथ भागचंद गोंदकर यांना प्रदान करण्यात आले.

(कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

**विषय नं.६६.** **सिटी अॅण्ड गील्डस् व कॉन्फिडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीज चे कोर्स योजना प्रस्तावाबाबत. (Pragati Project by Pravara Initiative).**

**निर्णय क्र.३१०.** दि. ०८-०५-२००५ रोजी व्यवस्थापन समितीचे सभेमध्ये मा. आमदार श्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सिटी अॅण्ड गील्डस् व कॉन्फिडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीज चे व्यावसायीक अभ्यासक्रमाबाबदची कन्सेप्ट नोट मा. अध्यक्ष महोदय, मा. उपाध्यक्ष महोदय आणि सर्व मा.समिती सदस्य, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना सादर केली होती.

ही योजना परीसरातील अर्धवट शिक्षण सोडलेल्या विद्यार्थ्यांसाठी विशेष उपयुक्त असून त्यांना व्यावसायीक कौशल्य देऊन ते स्वावलंबी होण्यास या योजनेनुसार मदत होणार आहे. यामध्ये खालील प्रमाणे ४ महिने मुदतीचे व्यावसायीक अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

| | | |
|---|---|---|
| १. मोटार व्हेईकल इंजिनिअरींग | २. फॅब्रिकेशन वेल्डिग अॅण्ड पाईप वर्क्स | ३. रेफ्रिजरेशन अॅण्ड एअर कंडीशनींग |
| ४. मेटल मशिनिंग | ५. इलेक्ट्रीकल इन्स्टॉलेशन | ६. ब्यूटी थेरपी |
| ७. प्लंबींग | ८. टु व्हीलर रिपेअर | ९. टेलिकम्युनिकेशन |
| १०. गारमेंन्ट मेकींग अॅण्ड मॅन्युफॅक्चरींग (क्लोदिंग) | ११. वुड ट्रेडर्स | १२. अॅडव्हान्सड डिप्लोमा इन कंन्स्ट्रक्शन अॅण्ड कॉक्रीट टेक्नॉलॉजी |
| १३. स्पोकन इग्लिश | १४. अप्लाईड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी | १५. हॉस्पीटीलीटी |
| १६. फुड प्रोसेसींग | | |

सर्व सदस्यांनी यावर विचार करून सदर स्किमच्या आवश्यकतेबाबत सहमती दर्शविली व सदर योजनेस तत्वतः मान्यता दिली. त्यानुसार दि. ११-०५-२००५ रोजी मा. अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली व मा. आमदार व विश्वस्त श्री. राधाकृष्ण विखे पाटील व City & Guild चे प्रतिनिधी तसेच कॉन्फिडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीज चे प्रतिनिधी, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, अहमदनगर व जिल्हयातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे प्राचार्य यांचे उपस्थितीत विचार विनिमय करण्यासाठी सभा झाली.

यामध्ये खालील विषयांवर चर्चा करण्यात आली.

१. योजनेची आवश्यकता
२. योजनेची वैशिष्टये
३. योजनेचे फायदे
४. अभ्यासक्रमाची विशेषता
५. योजनेची अंमलबजावणी

या विषयांवर चर्चा झाल्यानंतर सर्व सदस्यांनी ही योजना श्री साईबाबा संस्थानच्या सहकार्याने सुरू करण्यास सहमती दर्शविली व प्रकल्प अहवाल तयार करणेबाबत सूचना दिल्या.

त्यानुसार City & Guild चे प्रतिनिधींनी जिल्हयातील संस्थांची पाहणी करून कोणकोणते व्यवसाय सुरू करता येतील याचे नियोजन करून याबाबत चर्चा करण्यासाठी मा. कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली दि. ०१-०६-२००५ रोजी सभेचे आयोजन केले.

यामध्ये कोणत्या संस्थांमध्ये कोणते व्यवसाय सुरू करावयाचे तसेच संस्थांमध्ये सुरू करण्यात येणाऱ्या व्यवसायांचा खर्च, प्रशिक्षण फी, विद्यार्थी संख्या याबाबतचा प्रकल्प अहवाल Co-ordinator (समन्वयक) प्राचार्य औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, लोणी यांनी तयार केलेला असून तो सादर केलेला आहे.

प्रकल्प अहवालानुसार सदरची योजना राबविण्यासाठी आर्थिक नियोजन पुढीलप्रमाणे करावे लागेल. विविध संस्थांमध्ये द्यावयाचे प्रवेश व त्याकरीता अंदाजीत खर्च एका विद्यार्थ्यासाठी असा राहील.

| अ.नं. | तपशील | आवश्यक रक्कम |
|---|---|---|
| १. | City & Guild या संस्थेची फी | १२५०/- |
| २. | Staff चे मानधन | ५००/- |
| ३. | कच्चा माल व साधन सामुग्री | १०००/- |
| ४. | प्रशासकीय खर्च | २००/- |
| ५. | किरकोळ खर्च | ५०/- |
| | एकूण खर्च | ३०००/- |

सदरच्या प्रकल्पानुसार जिल्हयातील खालील संस्थांमध्ये कोर्सेस सुरु होणार आहेत.

१. प्रवरा रूरल एज्यु. सोसा. चे आयटीआय, लोणी. ०३ कोर्सेस
२. श्री साईबाबा संस्थान, शिर्डी आयटीआय शिर्डी ०२ कोर्सेस
३. शिर्डी साई रूरल इन्स्टीटयूट, राहाता ०२ कोर्सेस
४. लक्ष्मीनारायण आयटीआय, राहुरी ०२ कोर्सेस
५. मारूतराव घुले पा. आयटीआय भेंडा ०१ कोर्स
६. सेंट झेवियर आयटीआय, श्रीरामपूर ०२ कोर्सेस
७. विखे पाटील फौंडेशनचे आयटीआय, अहमदनगर ०३ कोर्सेस
८. संजीवनी एज्युकेशन सोसायटीचे अभियांत्रिकी महाविद्यालय, कोपरगांव. ०२ कोर्सेस
९. के.बी.पी. तंत्रनिकेतन, कोपरगांव. ०२ कोर्सेस
१०. अमृतवाहिनी औ.प्र. केंद्र, संगमनेर. ०२ कोर्सेस

उपरोक्त संस्थांमध्ये एकूण २१ कोर्सेसमध्ये प्रत्येकी २५ प्रमाणे ५२५ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार असून एका वर्षात असे ३ टप्पे होत असल्याने एकूण विद्यार्थी संख्या एका वर्षाची १५७५ इतकी होते. १५७५ विद्यार्थ्यांची फी १५७५ x ३००० = ४७,२५,०००/- इतकी होते.

तसेच प्रवरा रूरल एज्यु. सोसा.चे विविध संस्थांमध्ये खालीलप्रमाणे व्यवसाय अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे.

| अ.नं. | शिक्षण संस्थेचे नांव | कोर्स संख्या |
|---|---|---|
| ०१. | प्रवरा कन्या मंदीर | ०२ कोर्स |
| ०२. | इंजि.कॉलेज, लोणी | ०२ कोर्स |
| ०३. | महिला तंत्र निकेतन, लोणी | ०१ कोर्स |

| | | |
|---|---|---|
| ०४. | तंत्रनिकेतन महाविद्यालय, लोणी | ०१ कोर्स |
| ०५. | पी.व्ही.पी. कॉलेज,लोणी | ०३ कोर्स |
| ०६. | कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, राहाता | ०३ कोर्स |
| ०७. | कॉलेज ऑफ होम सायन्स, लोणी | ०१ कोर्स |
| | एकूण - | १३ कोर्स |

वरील कोर्सेच्या एका वर्षात एकूण ३ टर्म होतात. पैकी कॉलेज ऑफ होम सायन्स या कॉलेज मधील कोर्सच्या अभ्यासक्रमाची एकच टर्म घेण्यात येईल. अशा प्रकारे एका टर्मला १२ X २५ = ३०० विद्यार्थी, एका वर्षात तीन टर्म्सचे ३०० X ३=९०० विद्यार्थी + होम सायन्स कॉलेजचे एका टर्मचे २५ विद्यार्थी असे एकूण ९२५ विद्यार्थी होतात. त्यांची फी ९२५ X ३००० = २७,००,०००/- इतकी होते.

तसेच शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी रू. ४,००,०००/- खर्च अपेक्षित आहे. सदर प्रकल्पाकरीता एका वर्षासाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | संस्थेचे नांव | कोर्सची संख्या | प्रत्येक कोर्समध्ये विद्यार्थी संख्या | एका टर्ममध्ये एकूण विद्यार्थी | एका वर्षातील एकूण विद्यार्थी | वार्षिक खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | जिल्हयातील आय. टि. आय. इंजिनिअरींग व पॉलिटेकनीक कॉलेज | २१ | २५ | ५२५ | १५७५ | ४७,२५,०००/- |
| २. | प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था | १३ | २५ | ३२५ | ९२५ | २७,००,०००/- |
| | एकुण | ३४ | | ९०० | २५०० | ७४,२५,०००/- |

तसेच या प्रकल्पासाठी येणारा खर्च

| अ.नं. | तपशील | एकूण खर्च |
|---|---|---|
| १. | सर्व संस्थांचा प्रकल्प खर्च | ७४,२५,०००/- |
| २. | शिक्षकांचा प्रशिक्षण खर्च | ४,००,०००/- |
| | एकूण खर्च | ७८,२५,०००/- |

यापैकी प्रकल्पानुसार संस्थानकडून दिले जाणारे विद्यार्थ्यांच्या फी साठी अर्थसहाय्य रु.७४,२५,०००/- च्या ७५% म्हणजेच रु.५५,६८,७५०/- व शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी रु.४,००,०००/- असे एकूण रू.५९,६८,७५०/- इतके अर्थसहाय्य होते व विद्यार्थ्यांना २५% फी स्वरूपात भरावी लागणारी रक्कम रू.१८,७५,०००/- इतकी होते.

यावर सविस्तर चर्चा होऊन, या स्किममध्ये पहिल्या वर्षात ५००० विदयार्थ्यांऐवजी केवळ २५०० विदयार्थ्यांनाच (मध्येच अर्धवट शिक्षण सोडून दिलेल्या विद्यार्थ्यांना) वेगवेगळया व्यवसायातून प्रशिक्षण द्यावे व प्रस्तावामध्ये सादर केलेल्या संस्थांव्यतिरीक्त खालील संस्थाचाही योजना सुरु करणेसाठी समावेश करण्यात यावा. असे ठरले.

०१. संजीवनी एज्युकेशन सोसायटीचे अभियांत्रिकी महाविद्यालय, कोपरगांव.

०२. के.बी.पी. तंत्रनिकेतन, कोपरगांव.

०३. अमृतवाहिनी औ.प्र. केंद्र, संगमनेर.

सदरची योजना एक वर्ष राबविण्यासाठी २५०० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी, प्रकल्प अहवालात दर्शविल्यानुसार १७ संस्थांमध्ये ३४ कोर्स सुरु करण्यात यावे, सदर प्रकल्पासाठी फी व शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी असे एकूण या प्रकल्पास संस्थानला रु.५९,६८,७५०/- खर्च अपेक्षित आहे. याप्रमाणे प्रकल्पास व खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- प्र.प्राचार्य, आय.टी.आय)

**विषय नं.६७. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील सत्र ऑगस्ट २००५ मधील प्रशिक्षणार्थी प्रवेशाबाबत.**

**निर्णय क्र.३११.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.६८. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील सत्र ऑगस्ट, २००५ ते जूलै,२००६ साठी प्रशिक्षणार्थी डांगरी खरेदीस व खर्चास मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३१२.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.६९. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे लॅबसाठी दोन ए.सी. खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.३१३.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.७०. श्रीसाईबाबा कन्या विद्यामंदिराकडे इ.१० वी ची दुसरी तुकडी सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.३१४.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.७१. इयत्ता ११वी व १२ वी कला वाणिज्य व विज्ञान या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी आकारणी करावयाचे शैक्षणिक शुल्काबाबत.**

**निर्णय क्र.३१५.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**विषय नं.७२. कवी सम्मेलन भरविणेबाबत.**

**निर्णय क्र.३१६.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**यानंतर आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१. स्कुल बस नं.एमएच-१७-ए-७५९४ चे इंजिन ओव्हर ऑल करणेबाबत.**

**निर्णय क्र.३१७.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२. प्रायोगिक तत्वावर नगरसुल रेल्वेस्टेशन ते शिरडी संस्थान बस चालू करणेबाबत.**

**निर्णय क्र.३१८.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३. संगणक प्रि-प्रिंटेड स्टेशनरी छपाईबाबत.**

**निर्णय क्र.३१९.** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०३.०५.२००५ मधील निर्णयानुसार प्रशासन शाखेसाठी आवश्यक असणारी उदी प्रसाद प्रि-प्रिंटेड पाकिटे, सभासद कार्ड, विंडो पाकिटे छपाई व स्टिकर्स खरेदीस व त्यासाठी येणारे रु.४,२३,५००/-पर्यंतचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. स्टिकर्स वार्षिक स्टेशनरी खरेदीत समाविष्ट करणेत आलेले आहेत. उर्वरीत पाकिटे व सभासद कार्ड खरेदीकामी संस्थान जा.क्र.एसएसएस/खरेदी-प्रशासन/६५११/०५ दि.२२.०६.२००५ अन्वये दि.३०.०६.२००५ अखेर कोटेशन्स मागविणेत आलेली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे कोटेशन्स प्राप्त झालेली आहेत.

०१. प्रिमीअर डाटा फॉर्म्स् प्रा.लिमीटेड, मुंबई
०२. बालाजी ऑफसेट, अहमदनगर
०३. सरस्वती प्रिंटींग प्रेस, औरंगाबाद
०४. अल्ताफ पेपर ट्रेडींग कंपनी, नाशिक
०५. एस.डी.एंटरप्रायजेस, कोपरगांव
०६. लक्ष्मी प्रिंटर्स ऑफसेट, अहमदनगर
०७. क्लासिक ऑफसेट, श्रीरामपूर

उपरोक्त कोटेशनधारकांनी सादर केलेली कोटेशन्स उघडणेत येऊन त्यांना चर्चा तथा वाटाघाटीअंती निर्णयार्थ आजचे सभेपुढे आमंत्रित करणेत आलेले होते.

उपस्थित सर्व कोटेशन्सधारकांना सभागृहात एकत्रित बोलावून त्यांनी देऊ केलेल्या दरामध्ये काही सूट देणार किंवा कसे याबाबत सुधारित दर बंद पाकिटात देणेबाबत सांगणेत आले.

उपरोक्त सुधारित दरपत्रकाचे पाकिटे उघडून कागदपत्रांची छाननी करुन निम्नतम दराने खरेदी करण्याचे अधिकार मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग, मा. श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे, मा. डॉ. एकनाथ भागचंद गोंदकर यांना प्रदान करण्यात आले.

(कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४. माहे जुलै- २००५ साठी प्रसादालय किराणा माल खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.३२०.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५. लाडू पॅकिंग पिशवीवरील श्रीसाईबाबांचे नाव, मंदिर कळस छायाचित्र व लाडूचे वजन यांचे संख्येबाबत.**

**निर्णय क्र.३२१.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६. घनकचरा विल्हेवाट करणे प्रकल्पाबाबत.**

**निर्णय क्र.३२२.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७. अपारंपारिक उर्जेअंतर्गत हायब्रीड सिस्टम (सोलर + विन्ड) उभारणेबाबत.**

**निर्णय क्र.३२३.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८ श्री समाधी मंदीरात नंदी हॉल व गाभारा यामध्ये असलेल्या हॉलमध्ये फ्लोअरस्टॅंडींग टॉवर टाईप एअरकंडीशनर बसविणे.**

**निर्णय क्र.३२४.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९ अ) श्री पंढरीनाथ सावंत मुंबई यांचे वैद्यकीय आर्थिक अनुदान मागणी अर्जाबाबत**
**ब) श्री पांडुरंग कृष्णा कदम, मुंबई यांचे वैद्यकीय आर्थिक अनुदान मागणी अर्जाबाबत**

**निर्णय क्र.३२५.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०. नर्सिंग स्कूल सुरु करणेबाबत.**

**निर्णय क्र.३२६.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११. रुग्णालयात फिजीओथेरापिस्ट हे पद भरणेबाबत.**

**निर्णय क्र.३२७.** आपल्या रुग्णालयात आर्थोपेडीक हा विभाग कार्यरत आहे. रुग्णालयात येणाऱ्या अस्थिव्यंग रुग्णांची संख्या जास्त आहे. त्याबरोबर महिन्याला साधारणत: ५० ते ५५ अस्थिव्यंग रुग्णांवर शस्त्रक्रिया केल्या जातात. त्याकरिता ऑपरेशन पूर्व व ऑपरेशननंतरची काळजी घेणेकामी प्रामुख्याने फिजीओथेरापिस्टची आवश्यकता असते.

सध्या रुग्णालयात एक Physiotherapist हे पद मंजूर आहे. शिवाय राज्य शासनाच्या शासन निर्णय क्र.एचएसपी-१०८७/प्र.क्र.२२३/आरोग्य ३, दि.३१.१०.१९९१ नुसार दोनशे ते तीनशे खाटापर्यंतच्या रुग्णालयात एक Physiotherapist हे पद भरणे आवश्यक आहे.

श्रीसाईनाथ रुग्णालय नगर-मनमाड या राज्यमार्गालगत आहे. शिर्डी परिसरात कोठेही ॲक्सिडेंट झाला की रुग्ण अग्रक्रमाने श्रीसाईनाथ रुग्णालयात उपचारार्थ दाखल होत असतात. या राज्यमार्गावर अपघातांचे प्रमाणही जास्त आहे. अपघातामध्ये हाडांची मोडतोड होत असते.

रुग्णालयात शिर्डी आणि शिर्डी परिसरातील मोठ्या प्रमाणात हाडांचे रुग्ण यात वयोवृद्ध व तरुण यांचा समावेश असतो. यामध्ये शस्त्रक्रिया करावी लागणारे रुग्ण जास्त असतात. ऑपरेशन पुर्वी व ऑपरेशन नंतर रुग्णांची योग्य काळजी घेण्यासाठी Physiotherapist ही सेवा रुग्णालयात उपलब्ध नाही.

त्या दृष्टीने रुग्णालयात Physiotherapist ची नेमणूक करणे व रुग्णांना आवश्यक ती सेवा उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. तसेच रुग्णालयात देणगी स्वरुपात फिजीओथेरापीची इक्विपमेंटस् उपलब्ध असून ती वापराअभावी पडून आहेत. रुग्णालयासाठी एक Physiotherapist मिळाल्यानंतर गरजू रुग्णांना Physiotherapist ची वैद्यकीय सेवा उपलब्ध होईल व आपणाकडे असलेल्या इक्विपमेंटस्‌चा सदर सेवेसाठी वापर करता येईल.

रुग्णालयामध्ये Physiotherapist हे पद भरल्यानंतर त्यांचे सल्ल्यानुसार संस्थान रुग्णालयामार्फत Physiotherapist हे महाविद्यालय सुरु करणेबाबत विचार करता येईल, असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन रुग्णालयाकरिता Physiotherapist हे पद भरण्यास मान्यता देण्यात आली. संस्थान रुग्णालयामार्फत Physiotherapist महाविद्यालय सुरु करणेकामी किती खर्च येईल याकरिता कन्सल्टंटची नेमणूक करण्यात येऊन प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करण्यात यावा, असें ठरलें.

(कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२. श्री एस.बी.पटणी माजी प्राचार्य आय.टी.आय. यांचे न्यायालयीन प्रकरणाबाबत.**

**निर्णय क्र.३२८.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३. संस्थान कर्मचाऱ्यांच्या पाल्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या परताव्याचे निर्णयात बदल करणेबाबत.**

**निर्णय क्र.३२९.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४. श्री मोहन यादव, ग्रंथपाल तथा प्र.जनसंपर्क अधिकारी यांचा जनसंपर्क अधिकारी हे पदनाम व या पदाची वेतनश्रेणी मिळणेचे अर्जाचा विचार करणेबाबत**

**निर्णय क्र.३३०.** श्री.श्यामसुंदर शहाणे,स्वागत अधिकारी हे जनसंपर्क विभाग प्रमुख पदाचे काम पहात होते.वयाची ६० वर्षे पूर्ण झाल्याने ते दि.३१/०८/२००४ अखेर सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यामुळे कामाचे सोईनुसार श्री मोहन जगन्नाथ यादव, ग्रंथपाल शैक्षणिक संकुल यांचेकडे दि.२७/०८/२००४ पासून जनसंपर्क अधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आलेला आहे.

श्री यादव यांनी दि.०६/०७/२००५ रोजी सादर केलेल्या विनंती अर्जाने खालील प्रमाणे मागणी केलेली आहे.

"श्री साईबाबा संस्थानमध्ये प्रशासनातील संबंधीत पदाची जबाबदारी बघून अर्हता बघून शासकीय नियमानुसार वेतनश्रेणी दिली जाते.शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने जिल्हास्तरावरील त्यांचे जनसंपर्क कार्यालयात जिल्हा माहिती अधिकारी या पदासाठी रु.७४५०-२२५-११५०० ही वेतनश्रेणी निर्धारित केलेली आहे.तर या कार्यालयातील माहिती अधिकारी या पदासाठी रु.६५००-२००-१०५०० ही वेतनश्रेणी निर्धारीत केलेली आहे.संस्थानच्या जनसंपर्क अधिकारी पदाच्या

कामाची व्याप्ती,स्वरुप विचारात घेऊन मला किमान शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने जिल्हा स्तरावरील त्यांचे जनसंपर्क कार्यालयातील माहिती अधिकाऱ्याला असलेली रु.६५००-२००-१०५०० ही वेतनश्रेणी मिळावी अशी विनंती केली आहे. "

जनसंपर्क विभागाचे प्रशासकीय अधिकारी यांनी,श्री यादव यांचे अर्जावर खालील प्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत.

"माहे ऑगष्ट २००४ पासून या पदाची जबाबदारी त्यांचेवर टाकण्यात आलेली आहे. त्यावेळेपासून जनसंपर्कासंबंधीची कामे,मिडीयाशी असलेले संबंध यात मोठया प्रमाणात सुधारणा झालेली आहे.संस्थानचे विविध उपक्रमांना विविध प्रसार माध्यमांचे मदतीने ठळक प्रसिध्दी मिळालेली असून,संस्थान उपक्रमांना जागतिक पातळीवर पोहचविण्यात यश आलेले आहे.या पदाच्या कामाचे स्वरुप हे सर्वथा वेगळे,जबाबदारीचे त्याचप्रमाणे संस्थान व्यवस्थापना विषयी भक्तांचे मनात आदर निर्माण करण्याचे आहे.ही विशेष बाब लक्षात घेता,त्यांचे मागणीचा विचार करुन त्यांना वेतनश्रेणी देण्याची शिफारस आहे.तथापि,सदरचा विषय व्यवस्थापन समितीपुढे ठेवावा लागेल. "

तसेच "सदरचा विषय येत्या मिटींगपुढे ठेवणे." असे निर्देश मा.अध्यक्ष महोदय यांनी श्री यादव यांचे अर्जावर दिलेले आहेत.

श्री यादव यांचेबाबतची सर्वसाधारण माहिती खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| संस्थान सेवेत हजर झालेची तारीख :- | १०/१०/२००२ |
| पदनांम | ग्रंथपाल |
| वेतनश्रेणी | ४५००-१२५-७०००<br>(या वेतनश्रेणीत मूळ वेतन रु.५१२५ ) |
| शैक्षणिक पात्रता | बी.ए.,बी.लिब. (सायन्स)<br>सर्टिफिकेट इन जर्नालिझम. |

अनुभव

| |
|---|
| लायब्ररी असिस्टंट,कॉलेज ऑफ इंजिनियअरीग कोपरगांव दि.०३/१०/१९८९ ते १०/१०/१९८९. |
| ज्यु.असिस्टंट लायब्ररियन,दि.११/१०/१९८९ ते दि.३१/०३/१९९२. |
| लायब्ररिन के.बी.पी.पॉलिटेक्नीक कॉलेज कोपरगांव दि.०१/०४/१९९२ ते ०९/१०/२००२ |
| याच संस्थेत दि.०१/०५/२००० ते दि.०९/१०/२००२ या कालावधीत रु.१२०००-३७५-१६५०० या वेतनश्रेणीत सह.सचिव या पदाची जबाबदारी. |
| दि.१०/१०/२००२ पासून रु.४५००-७००० या वेतनश्रेणीत संस्थानचे शैक्षणिक संकुलाकडील मध्यवर्ती ग्रंथालयात ग्रंथपाल या पदावर कार्यरत |
| दि.२७/०८/२००४ पासून संस्थानमध्ये "ग्रंथपाल" या पदाचे काम सांभाळून जनसंपर्क अधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळत आहेत. |

श्री यादव यांना ग्रंथपाल पदावर नेमणूक देतांना ग्रंथपाल या पदाचे कामाशिवाय त्यांना संस्थान कामाचे सोईनुसार जनसंपर्कासंबंधीत कामे पहावे लागतील असे त्यांचे नेमणूक पत्रात नमूद केलेले आहे.

श्रींच्या दर्शनासाठी देशाच्या व जगाच्या कानाकोपऱ्यातून भावीक शिर्डी येथे येत असतात त्यांचे दर्शन व्यवस्थेची महत्वाची जबाबदारी जनसंपर्क अधिकाऱ्यावर असते याशिवाय संस्थानचे विविध उपक्रमांना प्रसिध्दी देण्याचे महत्वाचे कामही जनसंपर्क अधिकारी यांना करावे लागते.अलिकडच्या काळात श्री साईभक्तांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ झालेली असून जनसंपर्क विभागाचे कामाची व्याप्ती वाढलेली आहे.जिल्हा माहिती अधिकारी या पदाएवढीच कामाची व्याप्ती संस्थान जनसंपर्क अधिकाऱ्यांची असल्यामुळे,शासनाकडील माहिती अधिकारी या पदाची रु.६५००-२००-१०५०० ही वेतनश्रेणी मिळावी अशी श्री यादव यांची मागणी आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम १९९८ नुसार माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडील माहिती अधिकारी या पदासाठी खालील प्रमाणे वेतनश्रेणी निर्धारीत केलेली आहे.

माहिती अधिकारी (राजपत्रीत ) रु.६५००-१०५००

माहिती अधिकारी (अराजपत्रीत) रु.५५००-९०००

श्री साईबाबा संस्थानचे सन.१९९१ चे कर्मचारी आकृतीबंधानुसार जनसंपर्क अधिकारी या पदासाठी (सुधारीत) वेतनश्रेणी रु.५५००-९००० ही वेतनश्रेणी निश्चित केलेली आहे.

श्री यादव यांचेकडे जनसंपर्क विभागाचे कामाचा कार्यभार दि.२७/०८/२००४ पासून सुपूर्द केलेला असून, तेव्हापासून त्यांनी संस्थानच्या सर्व उपक्रमांना, उत्सवांना देशभर वेगवेगळया वृत्तपत्रांद्वारे, वेगवेगळया दूरचित्र वाहिन्यांच्या माध्यमाद्वारे योग्य प्रकारे प्रसिध्दी दिलेली आहे.श्री यादव यांचेकडे जनसंपर्क विभागाचा कार्यभार सुपूर्द केल्यानंतर त्यांनी केलेल्या कामाचे मूल्यमापन प्रशासकीय अधिकारी यांचे अभिप्रायात वर टिपणीत नमूद केलेले आहे.

श्री यादव यांची शैक्षणिक पात्रता,त्यांचा आजवरचा एकूण अनुभव,संस्थानमध्ये ते सध्या करीत असलेली कामे व संस्थान जनसंपर्क विभागाचे कामाचा व्याप या सर्व बाबी विचारात घेता,त्यांना "जनसंपर्क अधिकारी हे पदनाम/ पदावर नियुक्ती देऊन या पदाची वेतनश्रेणी देण्याबाबत विचार होणेस विनंती.तसेच,त्यांना कोणती वेतनश्रेणी द्यावयाची याबाबतही निर्णय होणेस विनंती.

यावर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, श्री मोहन यादव हे ग्रंथपाल या पदावर नियुक्त असले तरी दिनांक २७.०८.२००४ पासून ते प्रत्यक्ष जनसंपर्क विभागाची कामे व पूर्णपणे जबाबदारी सक्षमपणे पार पाडीत आहेत. जनसंपर्क अधिकारी या पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक पात्रता व अनुभव त्यांचेकडे आहे. संस्थानमध्ये ते एकमेव जर्नालिझम पदविकाधारक कर्मचारी आहेत हे विचारात घेऊन दिनांक १०.०७.२००५ पासून ग्रंथपाल या पदाऐवजी श्री यादव यांचे पदनांमात जनसंपर्क अधिकारी असा बदल करुन त्यांना या पदाची रुपये ५५००-१७५-९००० ही वेतनश्रेणी देण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही- अधिक्षक, आस्थापना )

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५.** **मा.विश्वस्त श्री के.सी.पाण्डेय यांचे पत्राबाबत.**

**निर्णय क्र.३३१** मा.विश्वस्त श्री के.सी.पाण्डेय यांनी मा.सदस्य श्री अशोक भि.खांबेकर यांचे बद्दलचे तक्रार स्वरुपातील एक गोपनीय पत्र मा.अध्यक्ष महोदय, मा.उपाध्यक्ष महोदय यांचेकडे सादर केले ते पुढीलप्रमाणे-

**CONFIDENTIAL**

4 th July, 2005

To,
Honourable Shri Jayant Sasane Ji
Honourable Chairman
Shri Sai Baba Trust
Shirdi, Ahmednagar
Maharashtra

Sir,

"Very humbly I would like to submit my grievances against Mr.Ashok Khambekar, Trustee, Shri Shirdi Sai Baba Sansthan, Shirdi. Since the new trust has come in existence, I have personally noticed that Mr. Khambekar has been spreading a lot of rumors in Shirdi about me. This I will take as a character assassination of mine without rhyme and reasons. It has been also observed that he becomes super active and tries to project himself as a spokesperson of the trust in front of the media as well as with the honourable guest visiting Shirdi Baba temple. He creates a lot of communication gap amongst the trustees also by misinforming and exaggerating the simple incidence by twisting it like a rumormongers. The situation may arise, I am afraid that it might mislead to a conflicting situation, which will be unpleasant.

Honourable Sir, to avoid such situation I would like to request you to investigate about his miscounduct and behaviours in the premises of the temple. His media exposure for representing the trust in his own style should be stopped . I have incidences on record were he has mis-conducted, misbehaved. Hope that you will take initiatives to correct him.

With very best wishes and warm regards".

K.C.Pandey
Trustee
Shri Sai Baba Sansthan, Trust, Shirdi

Copy to:
01. Vice Chairman Shri Sai Baba Trust, Shirdi
02. Executive Officer, Shri Sai Baba Sansthan, Shirdi

सदर पत्राचा थोडक्यात आशय पुढीलप्रमाणे-

प्रति,
मा.अध्यक्ष साो.
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,
शिरडी, जि.अहमदनगर

महोदय,

मी उपरोक्त आशयाने श्री अशोक भिमाशंकर खांबेकर, विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांचे विरुध्द तक्रार आपल्याकडे मांडत आहे. नवीन व्यवस्थापन समिती स्थापन झाल्यापासूनच ते माझ्याविषयी वेगवेगळ्या अफवा पसरवित आहेत. हे माझे चरित्रहनन आहे. ते संस्थानचे प्रवक्ते म्हणून मिरवतात तसेच व्ही.आय.पी. समोर जास्तच ॲक्टीव्ह होण्याचा प्रयत्न करतात. ते विश्वस्तांमध्ये एकवाक्यता आणण्याचा प्रयत्न करीत नसून सामान्य घटनेला अफवांचा दर्जा देतात. ही बाब अव्यवहार्य असून हिचे पर्यावसान आव्हानात्मक स्थितीत होऊ शकते.

तरी, मी आपल्याला विनंती करतो की, आपण या बाबतीत व्यक्तिशः लक्ष घालून त्यांचे हे अवकृत्य थांबवावे. माझ्याकडे या संदर्भात आवश्यक ते सर्व पुरावे आहेत.

आपला नम्र
के.सी.पाण्डेय
विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी

**अ)** श्री पाण्डेय यांनी सभेस असे सांगितले की, " ते एका गुरुवारी शिरडीस आले असता अधिक्षक, मंदिर विभाग यांना आरतीचे वेळी श्रींना त्यांनी आणलेले कपडे अर्पण करणेची विनंती केली व कपडे अर्पण करण्यांत आले. मात्र श्री खांबेकर यांनी ते कपडे उतरवून श्री शर्मा, यांचे कपडे श्रींना अर्पण करण्यास भाग पाडले ही पध्दत चुकीची आहे. यावर श्री खांबेकर यांनी असे काही मी सांगितले नाही " असे म्हटले त्यावेळी मा. उपाध्यक्ष सो यांनी उपरोक्त श्री पाण्डेय यांचे पत्र वाचण्यास सांगितले असता मा.अध्यक्ष महोदय व मा.विखे पाटील यांनी सदरचे पत्र वाचले.मा.श्री शंकररावजी कोल्हे साहेब उपाध्यक्ष यांनी मिटींगमध्ये कोणीही खोटे बोलू नये असे आपले मनोगत व्यक्त केले असता मा.विखे पाटील यांनी श्री खांबेकर हे खोटे बोलतात. तसेच व्ही.आय.पी. आल्यावर त्यांचे कायम पुढे-पुढे करीत असतात, हे विश्वस्तांचे काम नाही, असे म्हटले. त्याच वेळी विश्वस्त श्री पाण्डेय यांनी सभेस श्री खांबेकर यांचे बद्दल हा माणूस कोण आहे? हा आम्हाला जेवणासाठीही जाऊ देईना यांचेपासून आमची सुटका करा अशा प्रकारची तक्रार एका मान्यवर साईभक्तांने त्यांच्याकडे समक्ष केली असल्याचे सांगितले. यावर मा. अध्यक्ष महोदय यांनी हा सगळा प्रकार कमी केला/थांबविला पाहिजे असे सांगितले.

त्याचवेळी मा.श्री शंकररावजी कोल्हे, उपाध्यक्ष यांनी सभेस असे सांगितले की, श्री अशोक खांबेकर हे गैरसमज पसरवितात व ते स्वत: पत्रकार असल्याने वर्तमानपत्रातही उलटसुलट बातम्या देतात. वर्धा येथे श्री साई मंदीरात श्रीसाईबाबांच्या पादूका संस्थानतर्फे घेऊन गेले असता त्यांनी विनाकारण चुकीच्या बातम्या प्रसृत करुन गैरसमज निर्माण करण्याचा प्रयत्न केला हे अत्यंत निषेधार्ह आहे.

मा.श्री.अशोक भि.खांबेकर यांचेकडून घडलेली कृती संस्थानचे दृष्टीने खचितच योग्य नसल्याने उपस्थित सदस्यांनी त्याबाबत तीव्र नापसंती व नाराजी व्यक्त केली. भविष्यात त्यांचेकडून याची पुनरावृत्ती होऊ नये असे त्यांना सांगण्यात आले.

**ब)** यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांनी श्री खोत यांना मंदिरात श्रींची खरी समाधी नाही वगैरे शब्द कोणत्या साईभक्ताने वापरले किंवा कसे याबाबत विचारणा केली असता श्री खोत यांनी याबाबतीत त्यांना कसलीही माहिती नसल्याचे सांगितले. यावर सभेने त्यांना पुजारी, चोपदार यांच्याकडे चौकशी करुन मा.कार्यकारी अधिकारी यांना माहिती देणेबाबत सांगितले तसेच मा.उपाध्यक्ष महोदय यांनी वर्तमानपत्रात आलेल्या बातमीवरुन त्या माणसाचे नांव, पत्ता घेऊन ॲक्शन घेणेबाबत सांगितले तर श्री पाण्डेय यांनी हे काम पी.आर.ओ चे असल्याचे सांगितले. मा.सदस्य श्री विखे पाटील यांनी मंदिर प्रमुख यांनी दोन दिवसात चौकशी करुन माहिती देणेबाबत निर्देश दिले.

सत्य प्रत

कार्यकारी अधिकारी,
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)
(कार्यवाही- मंदिर प्रमुख / जनसंपर्क अधिकारी )

वरील निर्णय क्र. २४५ ते ३३१ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.
यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरीत/-
(भाऊसाहेब रा.वाकचौरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी )

स्वाक्षरीत/-
(जयंत मुरलीधर ससाणे)
अध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी )

*Thursday*
*21072005*